सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०९ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२५ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘ईडीपासून मुक्तीसाठी भाजपासोबत गेलो : भुजबळ

### राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकातील दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ; भुजबळांकडून वक्तव्याचे खंडन

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी



मुंबई, दि .८ ऑक्टोबर : विधानसभा निवडणुकीचा प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली असताना ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकातील दाव्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्याचा आनंद पक्षाच्या सर्वच नेत्यांना झाला होता. कारण अर्थातच त्यामुळे ईडीपासून सुटका झाली होती. माझ्यासाठी तर ईडीपासून सुटका म्हणजे एक प्रकारे पुनर्जन्मच होता, अशी नि:संदिग्धपणे कबुली व राज्याचे अन्न आणि नागरीपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली होती, असा दावा त्यात करण्यात आला आहे. या पुस्तकावरून विरोधकांनी भाजपा व महायुतीच्या नेत्यावर टिकेची झोड उठवली आहे. त्याचा फटका भाजपा व महायुतीच्या निवडणूकत बसून’ सेटबॅक’ बसण्याची शक्यता आहे.

#### पहिल्यांदा पूर्ण पुस्तक वाचावे: सरदेसाई

माझे पुस्तक हे केवळ महाराष्ट्रा चा राजकारणापूर्ती नाही तर देशातील सर्व तत्कावे घडामोडीचा आढावा घेणारा आहे त्यामध्ये केवळ एक प्रकरण महाराष्ट्र बाबतचे आहे त्यामुळे ते प्रत्येकाने पहिल्यांदा पूर्ण वाचावे त्यानंतर आपली मते बनवावीत

: राजदीप सरदेसाई (जेष्ठ पत्रकार व पुस्तकाचे लेखक)

दरम्यान, भुजबळांनी पुस्तकातील आपल्या मुलाखतीचा इन्कार केला असून याबाबत लेखक सरदेसाई यांच्या विरोधात न्यायालयीन कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. राजदीप सरदेसाई यांच्या ‘२०२४ : द इलेक्शन दॅट सरप्राइज्ड इंडिया’ या पुस्तकाने ही खळबळ उडवून दिली आहे. या पुस्तकात ‘हमारे साथ ईडी है’ या शीर्षकाच्या एक प्रकरण असून यामध्ये महाराष्ट्रातील राजकीय सत्तांतर राष्ट्रवादी काँग्रेसचे फूट त्यामागील कारणाबाबत भुजबळ यांनी रोखठोकपणे मते मांडली आहेत.

‘अजित पवार, त्यांची पत्नी सुनेत्रा, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, अनिल देशमुख, नवाब मलिक अशा विविध नेत्यांना ईडीच्या चौकशांना सामोरे जावे लागले होते. मला, देशमुख व मलिकांना ईडीने अटक केली होती. अशा वेळी पंतप्रधान मोदी वा भाजपबरोबर हातमिळवणी केल्याशिवाय सुटका नाही ही साऱ्यांचीच भावना झाली होती. हा विषय आम्ही पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याकडे मांडला. पवारांना हे सारे समजत होते. पण ते भाजपबरोबर जाण्यास अनुकूल नव्हते. तेव्हा अखेर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या आमदारांनी भाजपबरोबर हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय पक्षाच्या बहुतांशी नेत्यांना मान्य होता. भाजपबरोबर गेल्याने ईडीच्या जाचापासून साऱ्यांची सुटका झाली. मी ओबीसी असल्यामुळे मला जाणीवपूर्वक खूप त्रास देण्यात आला .अगर उच्च जातीचा असतो तर काहीही झाले नसते, अशी भावना भुजबळांनी त्यात व्यक्त केली आहे.

अजित पवार यांचीही ईडीने चौकशी सुरू केली होती. साखर कारखान्याच्या विक्रीवरून त्यांना घेरण्यात आले होते. या कारखान्यात सर्वाधिक भागभांडवल हे पत्नी सुनेत्रा पवार यांच्या नावे होते. त्यामुळे

– पान ३ वर

# भाजपा-शिंदेचा विरोध डावलून अजित पवार नवाब मलिकांसाठी मैदानात!

### मानखुर्द, अनुशक्तीनगरात बाप- लेकीसाठी घेतली रॅली

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई दि.७ ऑक्टोबर : सत्ताधारी महायुतीतील घटक पक्ष एकजुटीने व एकमताने निवडणुकीला सामोरे जात असल्याचे वारंवार सांगत असलेतरीही त्यांच्यासाठी स्वतःच्या आमदारांचे संख्याबळ सर्वात महत्त्वाची असल्याचे आत्तापर्यंतच्या निवडणूक प्रचारातून स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात त्यांच्या समर्थकांनी भाजपाविरोधात उघडपणे बंड पुकारले असताना दुसरीकडे भाजपा व शिंदे गटाचा प्रखर विरोध असतानाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या उमेदवारांच्या विजयासाठी शर्तीने प्रयत्न करीत आहेत .मानखुर्द शिवाजी नगर विधानसभा मतदार संघातील पक्षाचे उमेदवार नवाब मलिक यांना भाजपाने कळवा विरोध करूनही अजित पवार यांनी आज त्यांच्यासाठी शिवाजीनगर व अणुशक्तीनगर मतदारसंघात प्रचार रॅली केली. इतकेच नव्हे तर नवाब यांच्या कार्याचा ,संघर्षाचा गौरवपूर्ण उल्लेख करीत ते आदर्शवादी नेते असून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. गुरुवारी मलिक बापलेकींनी दोन्ही मतदारसंघांत पवार यांच्यासमवेत उघड्या जीपमधून मिरवणूक काढत प्रचंड शक्ती प्रदर्शन केले .



दाऊद इब्राहिम याच्या नातेवाईकांकडून मालमत्ता खरेदी केल्याच्या आरोपावरून नवाब मलिक हे गेल्या अडीच वर्षापासून केंद्रीय तपास यंत्रणेच्या रडारवर आहेत. सुमारे वर्षभरापूर्वी त्यांना वैद्यकिय कारणास्तव जामीन मिळाला. राष्ट्रवादी फोडलेल्या अजित पवार यांना समर्थन देत सत्तेत राहणे पसंद केले. त्यांना सोबत घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना जाहीर पत्र लिहून नाराजी व्यक्त केली होती.मात्र पवार यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.इतकेच नव्हे विधानसभा निवडणुकीसाठी त्यांची कन्या सना मलिक हिला अनुशक्तीनगर मतदारसंघातून उमेदवारी दिली.तर मलिक यांना शेजारच्या मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघातून उमेदवारीचा एबी फॉर्म दिला. भाजपाने त्याला विरोध करीत महायुतीचे उमेदवार म्हणून शिंदे गटाचे बुलेट पाटील यांना समर्थन करीत असल्याचे जाहीर केले आहे.तरीही पवार यांनी त्याकडे डोळेझाक करीत मलिक यांच्या प्रचारात हिरीरीने भाग घेतला

#### नवाब मलिक आदर्श नेते - अजित पवार

अजित पवार यांनी आज सकाळी मलिक यांच्या विरोधात अद्यापपर्यंत कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही, त्यामुळे त्यांना दोषी समजू शकत नाही, असे स्पष्ट करीत त्यांच्यासाठी प्रचार करणार असल्याचे स्पष्ट केले होते.गुरुवारी पुण्यातील प्रचार आटोपून दुपारी मुंबईला पोहचले. नवाब मलिक व सना मलिक यांच्यासाठी रोड शो केला. यावेळी भाषणात ते म्हणाले,नवाब मलिक व सना मलिक हे त्यांच्या जनहित कार्यासाठी आदर्श नेते आहेत. मलिक यांनी प्रदीर्घ राजकीय संघर्ष करीत जनतेची सेवा केली आहे. त्यांच्या नेतृत्व क्षमतेमुळेच शिवाजी नगरमधील अमली पदार्थ आणि गुंडगिरीचा नायनाट करणे शक्य होईल. परिसरात विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांना जनतेने मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन ही त्यांनी केले.

#### भाजपाचा वरवरचा विरोध असल्याची टीका

नवाब मलिक यांच्या उमेदवारीला भाजपाने तीव्र विरोध दर्शवूनही अजित पवार हे त्याला जुमानत नाहीत त्यामुळे भाजपाचा केवळ जनतेला भ्रमित करण्यासाठी वरवरचा विरोध करीत आहे ,अशी टीका सपाचे नेते व उमेदवार आ. अबू आझमी आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे.

गुरुवारी सायंकाळी काढलेल्या रॅलीत मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता मानकुर्द इंदिरा नगर येथून निघालेली ही रॅली पिचनाल, कोवन बेकरी, सनी जामे मशीद, दत्त मंदिर, देवनार पूल आदी भागातून मार्गक्रमण करत टाटा कॉलनी अजीज बागे पर्यंत काढण्यात आली.

विविध मार्गावर त्यांच्यावर फुलांच्या पाकळ्याची उधळण करीत स्वागत केले.

# रवी राणांना रेकॉर्ड मताने निवडून आणू : फडणवीस

अमरावती, ८ नोव्हेंबर – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी बडनेरा विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रवी राणा यांना रेकॉर्ड मताने निवडून आणू. ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. त्यांनी भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना रवी राणा यांच्या प्रचारासाठी कामाला लागायचे आदेश सुध्दा यावेळी दिले. फडणवीस यांनी सांगितले की, ज्यांच्या प्रचारा करता आपण सगळे या ठिकाणी उपस्थित झाले आहेत, ते या बडनेरा मतदार संघाचे तरुण तडफदार लोकप्रिय आणि कार्यसम्राट आमदार रवी राणाजी यांना आपण सर्व मनापासून आशीर्वाद द्यावा. रवी भाऊ का काम ही बोलता है. प्रत्येक जनतेच्या मनामध्ये ते आहेत आणि जे मनामध्ये असतात तेच मतांमध्ये दिसतात. अशा प्रकारचे रविभाऊ राणा हे भाजपच्या कोट्यातून महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत. भारतीय जनता पक्षाला महायुतीमध्ये १५२ जागा मिळाल्या आणि १५२ जागांपैकी चार जागा आम्ही आपल्या मित्र पक्षांकरिता सोडल्या त्यातली एक जागा युवा स्वाभिमान करिता सोडली आहे.

महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्यांनी दिली ती जागा म्हणजे रविभाऊ राणा करिता बडनेरा मतदारसंघाची आहे. रवी भाऊचा निवडूक जे चिन्ह आहे तो फार जोरदार आहे. पाना आता कोणाकोणाचे नट कसतील. रविभाऊ आम्हालाही काही लोकांचे नट कसायचे आहे. गरज पडली तर तुमचा पाना घेऊ आणि काही लोकांचे नट आम्ही देखील कसू. विशेषता आम्हाला या महाविकास आघाडी वाल्यांच्या डोक्याचे नट कसायचे आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी दुपारी ४ वाजता गोपाल नगर चौकात देवेंद्र फडणवीस यांची जंगी सभा झाली. खासदार डॉ. अनिल बोंडे ग्रामीण भाजपा जिल्हा अध्यक्ष, आमदार रवी राणा बडनेरा, प्रभुदासजी भिलावेकर जयंत डेहनकर प्रदेश सचिव, शिवराय कुळकर्णी, श्री. किरण पातुरकर, रवींद्र खांडेकर मंचावर उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची आज लोह्यात सभा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०८ नोव्हेंबर**



लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात शिवसेना उबाठा गट, भारतीय काँग्रेस पक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, आम आदमी पार्टी, रिपाइं महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ शिवसेनाचे पक्षप्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची आज शनिवारी सकाळी ११:०० वाजता मोंढा परिसर बैल बाजाराच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन केल्याची माहिती माजी आ.रोहिदास चव्हाण यांनी दिली .यावेळी शिवसेनेचे लातुर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे,काँग्रेस लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोहा तालुकाध्यक्ष प्रा. प्रभाकर पाटील पवार,शिवसेनेचे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, माजी पं.स. सदस्य बापू चव्हाण, भिमराव पाटील शिंदे,माजी जि.प.सदश्य बालाजी परदेशी, कंधार न.पा.चे माजी नगरसेवक शाहू नळगे, भाऊसाहेब पाटील कदम, सुरेश पाटील हिलाल, विक्रम कदम , संजय पाटील ढाले, विठ्ठल शेटकर, सचिन पेटकर, खंडू पाटील पवार, अतुल पापीनवार, योगेश पाटील नंदनवनकर, सतीश पाटील बाबर, गजानन पाटील मोरे, बाबासाहेब बाबर,रूद्रा पाटील भोस्कर, रामेश्वर पाटील पवार, बाबाराव पाटील, दत्ता शेटे, सुभाष पाटील भालेराव, प्रकाश चव्हाण आदी उपस्थित होती. लोहा -कंधार मधील वातावरण हे महाविकास आघाडी सोबत आहे. माजी आ.रोहीदास चव्हाण यांचे स्वागत करतो त्यांनी माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले त्यांनी १९८८ पासून लोहा -कंधार तालुक्यात गाव वाडी तांड्यावर शिवसेना पक्ष वाढविला. त्यांच्यामुळे मतदारसंघात शिवसेना आहे हि त्यांच्या कामाची पावती आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय होणार आहे. यापुढे सर्वच निवडणुका महाविकास आघाडी एकत्रितपणे लढविणार आहोत म्हणाले.

# भाजपाने केलेल्या ऐतिहासीक कामगिरीमुळे देश दहशतवादमुक्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**



देशातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीच्या सरकारने केलेल्या ऐतिहासिक कामगिरीमुळे देश दहशतवादमुक्त ,आतंकवादमुक्त, नक्षलवादमुक्त होत आहे . त्यामुळे आगामी काळातही देशात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी आपण सर्व कायदे तज्ञ आहात त्यामुळे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या उमेदवारास प्रचंड मतांनी विजयी करा अशी विनंती भाजपा लोकसभेचे उमेदवार डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी केले. ते आज जिल्हा सत्र न्यायालय परिसरात येथील वकील आणि कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधत होते.

नांदेडलोकसभेच्यापोटनिवडणुकीचे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे उमेदवार डॉ. संततुकराव हंबर्डे यांनी आज विविध कायदे तज्ञांची भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. देशात मोदी सरकार तिसऱ्यांदा स्थापन झाले आहे . त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संपूर्ण भारतवासीयांचा विश्वास आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच कलम ३७० रद्द होऊ शकले. जम्मू-काश्मीरमध्ये पहिल्यांदाच भारताचा तिरंगा फडकला. खऱ्या अर्थाने राष्ट्राची एकता आणि अखंडता जपण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने केले आहे. ही बाब लक्षात घेता आगामी काळातही आपला देश एकसंघ राहिला पाहिजे यासाठी नांदेड लोकसभेचा खासदारही आपला हवा. नांदेड लोकसभेचा खासदार भारतीय जनता पार्टीचा निवडून आला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात अधिक बळकट होतील आणि आपल्या इथे मोठ्या प्रमाणात विकास साधता येईल त्यासाठी मला पाठबळ द्या असे आवाहनही हंबर्डे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबर १०९८ ची मदत घ्या

**नांदेड**-आपल्या आजूबाजूला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके, सापडलेली बालके, सोडून दिलेली बालके, बालविवाह, संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरीत आवश्यक मदत कुठून कशी मिळवून देता येईल, याकरीता कुठे संपर्क करावा याबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. यासाठी आता चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ कार्यान्वित करण्यात आली आहे. संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास विभागामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणी व संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४ तास हेल्पलाइन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वतः घेऊ शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकांना मदत मिळवून देऊ शकतात. या संबधी माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते. याद्वारे संकटग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी संबंधीतांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, महिला व बालविकास अधिकारी श्रीमती आर. पी. रंगारी यांनी केले आहे.

### IMA महास्पोर्ट्स क्रीड़ा प्रतियोगिता नांदेडमध्ये



**नांदेड**-इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने नुकत्याच आयएमए महास्पोर्ट्स स्पर्धा घेण्यात आल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व एसजीजीएस महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर पार पडलेल्या स्पर्धेत विविध जिल्ह्यातून आलेल्या डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. डॉक्टरांमध्ये क्रीडाप्रेम जागृत करण्याच्या आणि एकात्मता वाढवण्याच्या करण्यात आले होते.. दर वर्षी IM MHSPORTS एका जिल्ह्यात डॉक्टर्स साठी आयोजित केले जाते. यावेळी ही स्पर्धा नांदेड खच तर्फे आयोजित केली होती. यात फायनल सामन्यात डॉ. प्रमोल हंबर्डे यांनी ३३ चेंडूमध्ये नाबाद ७८ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला. त्यांना 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेदरम्यान आयएमए मावेरिक्सच्या सर्व खेळाडूंनी अपवादात्मक कामगिरी केली. यावेळी हंबर्डे म्हणाले, सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या उत्कृष्ट योगदानामुळेच आम्हाला हा विजय मिळवता आला. प्रत्येकाने आपल्या भूमिकेला योग्य प्रकारे न्याय दिला आणि एकत्रित प्रयत्नातून विजेतेपद प्राप्त केले. राज्यभरातील डॉक्टरांनी स्पर्धेत सहभाग घेतल्यामुळे स्पर्धे चा उत्साह द्विगुणित झाला. यासाठी आयएमएचे डॉ. प्रल्हाद कोटकर, डॉ. राजेश नुने, डॉ. राहुल लव्हेकर, डॉ. वीरेंद्र अवधिया, डॉ. तजमूल पटेल आदी पदाधिकाऱ्यांसह मेडिकल असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी पुढाकार घेतला.

# जन आरोग्य अभियानने प्रकाशित केले नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेचे रिपोर्ट कार्ड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**



जन आरोग्य अभियान, नांदेडच्यावतीने आज दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी विसावा हॉटेल येथील कार्यक्रमात 'नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेचे रिपोर्ट कार्ड व जाहीरनामा' प्रकाशित केला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष जन स्वास्थ अभियानाचे सह संयोजक डॉ. अभय शुक्ला हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व नांदेड येथील आरोग्यवस्थेचा आढावा डॉ. राजेश माने सर्वांसमोर सादर केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवाजी गावंडे, डॉ. अशोक बेलखोडे, दीपक जाधव, परमेश्वर पौळ, दत्ता तूमवाड, के.के.जामकर, उपस्थित होते.

नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय येथे ऑक्टोबर २०२३ मध्ये २४ तासात २४ मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. त्यामध्ये नवजात बाळांची संख्या ११ इतकी होती. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटून आरोग्य व्यवस्थेच्या कारभारावर टीकेची झोड उठली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री गिरीश महाजन यांनी इथल्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची अनेक आश्वासने दिली होती. मात्र या घटनेला एक वर्ष उलटून गेल्यानंतर, प्रत्यक्षात फार बदल झाल्याचे दिसून येत नाही. जन आरोग्य अभियानाच्यावतीने एकूण १० निकषांच्या आधारे नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेत झालेल्या बदलांचे मूल्यांकन करण्यात आले, त्यामध्ये १०० पैकी केवळ २४ गुण इथल्या आरोग्य व्यवस्थेला मिळू शकले आहेत.

नांदेड शहर व जिल्ह्यासाठी नांदेड हेल्थ क्शन प्लॅन तयार करण्यात यावा. यामध्ये स्थानिक डॉक्टर, सार्वजनिक आरोग्य तज्ञ, सामजिक संस्था व संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असावा. हेल्थ क्शन प्लॅन मध्ये खालील मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजनांचा समावेश असावा. लोकाधारित देखरेख प्रक्रिया राबविण्यात यावी, नांदेडच्या सिव्हील हॉस्पिटल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बजेटमध्ये वाढ करावी या मागण्या यावेळी करण्यात आल्या. लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी उभा राहिलेल्या उमेदवारांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्या मध्ये आरोग्याचा प्रश्न किती जणांनी घेतलाय हा देखील प्रश्न जन आरोग्य अभियान तर्फे यावेळी करण्यात आला आहे.

# सोनखेड पोलीस गाडीच्या धडकेत युवक ठार

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ०८ नोव्हेंबर**

५ ऑक्टोबर रोजी दुपारी एकच्या दरम्यान सोनखेड पोलीस गाडीच्या धडकेत युवक जागीच ठार झाल्याची घटना घडली.

नांदेड बिदर रोडवर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर किवळा शिवारात दुपारी १ च्या दरम्यान एम एस २६ बी एक्स ५३५९ या क्रमांकाची सोनखेड पोलिसांची गाडी ही उस्माननगर कडून नांदेडकडे भरधाव वेगात जात असताना व समोरून येणारी एम एच २६ बी एल ७६८४ या क्रमांकाच्या दुचाकीची समोरासमोर धडक झाली व त्यानंतर तो दुचाकीस्वार वीस फूटवर उडून खाली पडला व त्यामध्ये दत्ता शंकर हंबर्डे वय २५ वर्ष रा.गुंडेगाव ता. जि.नांदेड हा जागीच गतप्राण झाला

या घटने दरम्यान अपघात स्थळाच्या ठिकाणी पोलीस वाहनाच्या धडकेत युवक ठार झाल्यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु इतवारा विभागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी सुशील कुमार नायक संजय पाटील घोगरे यांच्या मदतीने वाद निवळलाय. अपघाता वेळी रस्त्याने जाणारा एक हायवा देखील सोनखेड पोलिसांनी ताब्यात घेतला आहे परंतु या चालकाने सांगितले की या अपघाताचा आणि माझा तीळ मात्र संबंध नाही कोणत्याही कारणाशिवाय मला पोलीस ठाण्यात आणून बसवले आहे.

# माहूर ग्रामीण रुग्णालयात अधिकारी डॉ.बिपीन बाभळे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०८ नोव्हेंबर**



माहूर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाचे अत्यंत मृदूभाषी मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्ती मात्र तेवढेच वैद्यकीय कर्तव्यात प्रामाणिक व निष्णात असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.बिपीन बाभळे (पूर्व प्रभारी वैद्यकीय अधिक्षक ) यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा छोटेखानी अभिष्टचिंतन सोहळा आज गुरुवार दि.०७ नोव्हेंबर रोजी दुपारी वाजता ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे, पत्रकार बजरंगसिंह हजारी, इव्हेंट प्लॅनर अजयसिंह हजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत साधेपणाने बर्थडेजेंटलमॅन डॉ.बिपीन बाभळे यांना शॉल, श्रीफळ पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन तुम जियो हजारो साल साल के दिन हो पचास हजार! हॅपी बर्थडे टू यू डियर डॉ.बिपीनजी!असे अभिष्टचिंतन करत आपुलकीचा केक भरवून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रमीण रुग्णालयाचे डॉ.अभिजीत अंबेकर, डॉ.वसीम डॉ.दोनकलवार,बोथींगे सिस्टर,पि.आर. कचकलवार सिस्टर,पि, बि.खरे सिस्टर,१०८ म्ब्युलन्स पायलट (ड्रायव्हर) पांडुरंग धोंगडे,राम केंद्रे,आकाश मुंडे आदिंची उपस्थिती होती. मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या! पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांचे प्रतिपादन; पवननगर येथे दीपावली समारोप कविसंमेलन रंगले

नांदेड - आपल्या मुला मुलींचा कल कोणत्या क्षेत्रात आहे हे पाहूनच त्यांना पालकांनी आपले क्षेत्र निवडू द्यावे. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होत असतात. पालकांनी आपल्या अपेक्षा, इच्छा किंवा आकांक्षा त्यांच्यावर लादू नयेत. विशेषतः मुलींना अधिक बंधनं घातली जातात. परंतु अभिनय क्षेत्रात मी माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळेच माझे करिअर करु शकले. म्हणूनच मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या असा सल्ला पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी पंडित पाटील बेरळीकर, प्रमुख पाहुणे म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक कवी अनुरत्न वाघमारे, कवी प्रल्हाद घोरबांड, राजेश लोकरे, मीनाक्षी कोकुलवार, संयोजक तथा आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलचे संचालक कवी पांडुरंग कोकुलवार, निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती होती.

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने शहरातील मालेगाव रोड स्थित पवननगर येथे दीपावली समारोप कार्यक्रम आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने दीपावली निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर दि. ७ रोजी समारोप कार्यक्रम संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीचे पुष्पपुजन केल्यानंतर रीतसर कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या सत्कारानंतर माधुरी लोकरे, नागोराव डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर झालेल्या गीतगायन आणि कविसंमेलन कार्यक्रमात पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, प्रल्हाद घोरबांड, गझलकार चंद्रकांत कदम, शरदचंद्र हयातनगरकर, थोरात बंधू, साहेबराव कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, प्रशांत गवळे, योगेश गच्चे, अशोक कुबडे, रुपाली वागरे वैद्य, पंचफुला वाघमारे, पांडुरंग नलबलवार यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण व गीतगायन केले.

# पूर्ण दिवस सुटी अथवा किमान २ तास मतदानाला वेळ द्या !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यातील लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे या दिवशी अत्यावश्यक सेवेपासून तर कर्मचाऱ्यांपर्यंत आणि कामगारांपासून शेतमजूर, मेकॅनिक, वेटर या सर्वांना एक तर पूर्ण दिवसाची सुट्टी अथवा मतदान करण्यासाठी दोन तासाची सवलत द्या, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने सर्व कामगार आस्थापनांना दिले आहे.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत आहे. नांदेड विधानसभा मतदान क्षेत्रात असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे.

ही सुट्टी सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, इत्यादीना लागू राहील. उदा. राज्य शासन, केंद्र शासन व खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिग सेंटर, मॉल्स,रिटेलर इ. अपवादात्मक परिस्थीतीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादीना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल.

मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची भरपगारी सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना,कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी , व्यवस्थापनाने या आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानासाठी योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करणे शक्य न झाल्याबाबची तक्रार आल्यास , त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# राष्ट्र आणि धर्माच्या रक्षाणासाठी भाजपाला साथ द्या: डॉ. संतुक हंबर्डे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

विश्वविख्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे अडीच हजार वर्षांपासून ज्या राम मंदिराची आपण प्रतीक्षा करत होतो . त्या राम मंदिराचा प्रश्न मार्गी लागला आहे. हिंदू धर्म रक्षणासाठी भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकार काम करत आहे. शिवाय सर्वांचा समान विकास साधण्याचा प्रयत्न सुरू आहे.त्यानुसार आपणा सर्वांना आता भाजपा महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे लागेल. राष्ट्राचे आणि धर्माच्या रक्षणासाठी आता ही निर्वाणाची वेळ आली आहे . त्यासाठी भाजपा महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन नांदेड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले.

नांदेड क्लब, नांदेड व सायन्स कॉलेज मैदान वर सकाळ च्या वेळी फिरायला आलेला जेष्ठ नागरिक व नांदेड क्लब पदाधिकाऱ्यांसह संवाद व भेट करताना लोकसभेचे उमेदवार डॉक्टर संततुकराव हंबर्डे , नांदेड दक्षिणचे उमेदवार आनंदराव बोंढारकर यांच्यासह मतदारसंघातील उमेदवार, प्रविण भाऊ साले, चैतन्यबापू देशमुख, माजी.महापौर अजय बिसेन, बाळु खोमणे, जगंमवाडी मंडळाचे अध्यक्ष आशिष नेरळकर, छत्रपती शिवाजी नगर मंडळाचे अध्यक्ष सुयोग कवडगे, आशितोष धर्माधिकारी बरबडेकर आदी उपस्थित होते. यावेळी नागरिकांशी संवाद साधताना डॉ. संतुकराव हंबर्डे पुढे म्हणाले की, देशात नरेंद्र मोदींचे भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. भाजपा सरकारमुळे गेल्या दहा वर्षात देशाचा कायापालट झाला आहे. शेतकऱ्यांपासून तर नोकरदारापर्यंत प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी मोदी सरकारने केलेले कामाची यादी अत्यंत मोठी आहे . भ्रष्टाचार मुक्त प्रशासन भारतीय जनता पार्टीने देऊन या देशातील शोषित पीडित वंचित तळागाळातील लाभार्थ्यांना खऱ्या अर्थाने लाभ मिळाला आहे. हागणदारीमुक्ती पासून ते निराधारापर्यंत प्रत्येक योजना यशस्वीरित्या राबवून देशाची आर्थिक स्थिती जागतिक दर्जावर पाचव्या स्थानापर्यंत नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे झाले आहे. येत्या पाच वर्षाच्या काळात देश जागतिक तिसरी अर्थ मात्र महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे. त्यामुळे देशाचा चौफेर विकास होणार आहे. यात आपला नांदेड जिल्हा ही मागे राहिला नाही पाहिजे. नांदेड जिल्ह्यात केंद्र सरकारच्या जास्तीत जास्त योजना राबवून आपल्या भागाचा कायापालट करण्यासाठी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत कमळ या निशाणी समोरील बटन दाबून भाजपला प्रचंड मतांनी विजयी करा. एका शेतकरी कुटुंबातील आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सदैव निस्वार्थपणे काम करणाऱ्या आपल्या लेकराला , भावाला निवडणूकित विजयी करा असे आवाहन डॉ. हंबर्डे यांनी यावेळी केले.

# मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या!

## अभिनेत्री माधुरी लोकरे यांचे प्रतिपादन; पवननगर येथे दीपावली समारोप कविसंमेलन रंगले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**



नांदेड - आपल्या मुला मुलींचा कल कोणत्या क्षेत्रात आहे हे पाहूनच त्यांना पालकांनी आपले क्षेत्र निवडू द्यावे. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होत असतात. पालकांनी आपल्या अपेक्षा, इच्छा किंवा आकांक्षा त्यांच्यावर लादू नयेत. विशेषतः मुलींना अधिक बंधनं घातली जातात. परंतु अभिनय क्षेत्रात मी माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळेच माझे करिअर करु शकले. म्हणूनच मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या असा सल्ला पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी पंडित पाटील बेरळीकर, प्रमुख पाहुणे म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक कवी अनुरत्न वाघमारे, कवी प्रल्हाद घोरबांड, राजेश लोकरे, मीनाक्षी कोकुलवार, संयोजक तथा आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलचे संचालक कवी पांडुरंग कोकुलवार, निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती होती.

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने शहरातील मालेगाव रोड स्थित पवननगर येथे दीपावली समारोप कार्यक्रम आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने दीपावली निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर दि. ७ रोजी समारोप कार्यक्रम संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीचे पुष्पपुजन केल्यानंतर रीतसर कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या सत्कारानंतर माधुरी लोकरे, नागोराव डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर झालेल्या गीतगायन आणि कविसंमेलन कार्यक्रमात पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, प्रल्हाद घोरबांड, गझलकार चंद्रकांत कदम, शरदचंद्र हयातनगरकर, थोरात बंधू, साहेबराव कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, प्रशांत गवळे, योगेश गच्चे, अशोक कुबडे, रुपाली वागरे वैद्य, पंचफुला वाघमारे, पांडुरंग नलबलवार यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण व गीतगायन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. भूमिका पांडुरंग कोकुलवार यांनी मांडली. सूत्रसंचालन रणजित गोणारकर यांनी तर आभार शंकर गच्चे यांनी मानले. दरम्यान माधुरी लोकरे यांचा अभिनय क्षेत्रातील यशाबद्दल चॅनलच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी शिवाजी कोकुलवार, मनोहर संगमवार, नागभूषण दुर्गम, गणेश भुसा, राजीव राचा, अभय कुरपतवार, अनंत नातेवार, दिलिप डांगे, गजानन पावडे, संजय मोरे, माधव कांबळे, एकनाथ कार्लेकर, धुसे, गंदेवाड, जयंती ढवळे, युवराज ढवळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठका



भोकर- विधानसभेच्या उमेदवार श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारार्थ भोकर तालुक्यातील पिंपळढव सर्कल मधील पोमनाळा तांडा, जामदरी तांडा, सोनारी तांडा, सावरगाव मेट तांडा, कांडली तांडा आदी ठिकाणी कॉर्नर बैठका घेण्यात आल्या.

या बैठकीस माजी जिल्हा परिषद सदस्य रोहिदास जाधव, जयश्रीताई राठोड, सुनीता राठोड, अनिता जाधव, सुमन पवार, डॉ. आशुतोष राजुरकर, दिलीप चव्हाण, गणेश राठोड, साईनाथ राठोड, उल्हास जाधव, दर्शन राठोड, विठ्ठल जाधव तसेच उमेदवार श्रीजया चव्हाण यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उमेदवार श्रीजया चव्हाण म्हणाल्या की, तरुणांना रोजगारभिमुख व्यवसायाची निर्मिती करण्याबरोबरच सर्वात महत्त्वाचा प्रश्न असलेल्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार, महिला , जेष्ठ नागरिक, अपंग, विद्यार्थी यांच्यासाठी कल्याणकारी योजना तसेच जिल्हा परिषद शाळेच्या दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. भोकर मतदारसंघ विकासाचे मॉडेल बनविणार असल्याचे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रोहिदास जाधव यांनी देखील मनोगत व्यक्त केले.भाजप सरकारच्या काळात पोहरादेवीच्या मंगारा भावनासाठी १२० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. तीर्थक्षेत्र पोहरा देवीच्या संपूर्ण विकासासाठी ७२० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळेच नांदेड शहरात कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याची मागणी पूर्ण झाली आहे. बंजारा समाजासाठी भारतीय जनता पार्टीने भरपूर निधी उपलब्ध करून दिला असून जनतेने भाजपाला साथ द्यावी असे आवाहन यावेळी करण्यात आले. भोकर विधानसभा उमेदवार श्रीजया चव्हाण यांच्यासह लोकसभेचे उमेदवार संतूक हंबर्डे यांना साथ देण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले.

# उद्याची निवडणूक उद्धव ठाकरेच्या नेतृत्वात : शरद पवार



सेलू:मागील दहा वर्षाच्या काळात मोदी सरकारने महत्वाच्या घटकाकडे दूर्लक्ष केल्यामूळे लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्राने भरभरून प्रतिसाद दिला आहे. म्हणून आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये देखील उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडी निवडणूक लढवत आहे त्यामूळे जिथे जिथे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची मशाल ,कॉंग्रेसचा हात आणि राष्ट्रवादी शरदपवार गटाचा तूतारी वाजवणारा माणूस ही चिन्हे असतील ते बटन दाबून महाविकास आघाडीच्या हाती सत्ता देण्याचे अवाहन राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे ते सेलू येथील नूतन विद्यालयाच्या मैदानावर आयोजीत प्रचार सभेदरम्यान शूकवार ८ नोव्हेंबर रोजी बोलत होते.यावेळी बोलतांना ते म्हणाले की,महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर राज्यातील महिलांसाठी महालक्ष्मी योजनेअंतर्गत प्रतीमाह तीन हजार दिले जातील तसेच सर्व महिलांना मोफत एसटीचा प्रवास सूरू करण्यात येईल .राज्यातील शेतक-यांना कर्जमाफी देण्यात येईल .नियमित कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांना ५० हजार प्रोत्साहनपर देण्यात येईल.राज्यात जातीनिहाय जनगणना करण्यात येईल ५० टक्के आरक्षण मर्यादा काढून टाकण्यात येईल.सूशिक्षित तरूणांना दरमाह ४ हजार रूपये भत्ता देण्यात येईल आणि आजारी नागरीकांना वैद्यकिय उपचारासाठी २५ लाख रूपये पर्यंतची मदत करण्यात येईल आशा प्रकारे शरद पवार यांनी मोठी अश्वासन देवून राज्याची सत्ता महाविकास आघाडीच्या हाती देण्याचे अवाहन करून महाराष्ट्राचे राजकारण बदलून दाखविण्याचे अश्वासन दिले आहे.यावेळी सभेसाठी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

### नूतनचा गौरव

**सेलू शहरातील नूतन विद्यालय शिक्षण संस्था व तत्कालीन स्वातंत्रसैनानी गोविंदभाई श्रॉफ व श्रीरामजी भांगडीया यांचा नाम उल्लेख करत ही संस्था व नूतन महाविद्यालय यांची गौरवशाली परंपरा असून एका प्रेरणेने व त्यागाने उभारलेल्या नूतन महाविद्यालयाचा राज्यातील चांगल्या महाविद्यालयामध्ये आजही नाम उल्लेख होत असल्याचे मत शरद पवार यांनी यावेळी व्यक्त करत नूतन संस्थेचा गौरव केला.**

खासदार संजय जाधव,फौजीया खान,विजय गव्हाणे,उमेदवार विजय भांबळे,सोनाली देशमूख ,संजय साडेगावकर,राजेंद्र लहाने,अशोक उफाडे रामेश्वर पौळ आदींनी मनोगत व्यक्त केले तर अशोक काकडे यांनी आभार मानले.

# कॉंग्रेसला शिव्या देणाऱ्या बेईमान माणसाला मतदार साथ देणार नाही हा माझा विश्वास : नानाभाऊ पटोले

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. ०८ नोव्हेंबर



१६ नांदेड लोकसभा पोटनिवडणुक महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रविंद्र वसंतराव चव्हाण आणि ८५ भोकर विधानसभा निवडणुकीचे उमेदवार तिरुपती पप्पू पाटील कोंढेकर यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य जाहीर सभा दि. ७ नोव्हेंबर रोजी मुदखेड शहरातील गणपती मंदिरा समोर पार पडली. या जाहीर सभेत माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांनी बोलताना म्हणाले कि आजपर्यंत अशोक चव्हाण यांनी मॅनेज करूनच निवडणुका जिंकल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून अशोक चव्हाण यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवला नाही त्यांनी फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर दलित समाजाचे मतं घेतली आहेत.

यानंतर भोकर मतदारसंघतील अधिकृत उमेदवार तिरुपती कोंढेकर यांनी म्हटले आहे कि कॉंग्रेसनी सर्वसामान्य शेतकरी कुटूंबातील कार्यकर्त्याला उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मतदार मायबापानी मला अशिर्वाद दिला तर या धन दांडग्या प्रस्थापिताना हा शेतकऱ्यांचा मुलगा चारी खाण्या चित् करणार असे पप्पू पाटील कोंढेकर यांनी जाहीर सभेत बोलताना म्हणाले.

या सभेला संबोधित करताना महाविकास आघाडीचे दोन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे अशी विनंती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी केली. पुढे बोलताना म्हणाले की या हुकूमशहाला सत्तेतुन बाहेर काढले पाहीजे कारण हे मॅनेजमेंट गुरु आहेत त्यांनी शिवसेना फोडली राष्ट्रवादी फोडली आणि कॉंग्रेसचा वापर करून कॉंग्रेसला बर्बाद करण्याचा प्रयत्न केला आणि त्याच कॉंग्रेसला शिव्याशाप देत आहेत अशा बईमान माणसाला कोणीच साथ देणार नाही हा माझा विश्वास आहे सांगायचा तात्पर्य असाकी या व्यक्तीने भोकर विधानसभेतील जनतेच्या मतावर निवडून आला तोच व्यक्ती भोकर विधानसभेच्या जनतेच्या आशा अपेक्षा विकल्या आहेत. असे त्यांनी जाहीर सभेत बोलताना म्हणाले.

या जाहीर सभेला माजी आमदार मिर्झा वजाहात, प्रदेश सदस्य बालाजी सोंडार, सुरेंद्र घोडजकर, शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष भगवान पाटील आलेगांवकर, नांदेड जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, शिवसेना जिल्हा प्रमुख बबन बारसे, कॉंग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, तालुका कार्यध्यक्ष महमद गौस, डॉ रेखा चव्हाण, यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारोंच्या संख्येने मतदारसंघातील मतदारांची उपस्थिती होती.

# व्यवस्थापन परिषद सदस्य हणमंत कंधारकर यांना पीएच.डी. प्रदान

**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य, सामाजिकशास्त्रे संकुलातील संशोधक विद्यार्थी हणमंत नारायण कंधारकर यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी समाजकार्य या विषयात डॉ. घनश्याम येळणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठवाड्यातील बालगृहातील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका' या विषयावर संशोधन केले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, उपकुलसचिव डॉ. रवि एन. सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ.जी. एस. येळणे, संकुलातील प्रा. डॉ. शालिनी कदम, प्रा. डॉ. बी. एस. जाधव, डॉ. प्रमोद लोणारकर, प्रा. एन. बोधगिरे, डॉ. नितीन गायकवाड, डॉ. राहुल सरोदे, डॉ. आनंद घोडवाडीकर, डॉ. शंकर जाधव, प्रा. रोहिदास दुधाटे, प्रा. बुद्धभूषण शिरसे आदींनी अभिनंदन केले.

# संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबर १०९८ ची मदत घ्या

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

आपल्या आजूबाजूला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके, सापडलेली बालके, सोडून दिलेली बालके, बालविवाह, संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरीत आवश्यक मदत कुठून कशी मिळवून देता येईल, याकरीता कुठे संपर्क करावा याबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. यासाठी आता चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ कार्यान्वित करण्यात आली आहे.

संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास विभागामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणी व संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४ तास हेल्पलाइन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वतः घेऊ शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकांना मदत मिळवून देऊ शकतात. या संबधी माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते. याद्वारे संकटग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी संबंधीतांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, महिला व बालविकास अधिकारी श्रीमती आर. पी. रंगारी यांनी केले आहे.

# मराठवाडा साहित्य परिषद कार्यकारी मंडळ निवडणुकीची आज मतमोजणी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळ निवडणुकीची मतमोजणी शनिवार, ९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सकाळी नऊ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. राज्य आणि परराज्यातील मतदारांनी मतपत्रिका पोस्टाने पाठवून आणि व्यक्तिशः येवून मतदान केले आहे. मतमोजणीसाठी निर्वाचन अधिकारी, तज्ज्ञ सल्लागार, प्रगणक, गणक आदी ५० कर्मचारी मतमोजणी करणार आहेत. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी निवडणुकीचा निकाल जाहीर करून निवडून आलेल्या २२ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येतील, असे निर्वाचन अधिकारी डॉ. राम चव्हाण यांनी कळविले आहे.

# म्हणावा तसा विकास धर्माबाद तालूक्याचा झाला नाही

## पंचवीस वर्षांपासून अनेक कामे प्रलंबित, राजकीय पुढाऱ्यांचे ,बोलाची भात,बोलाची कढी, केवळ फुसके आश्वासने

तभा वृत्तसेवा
**धर्माबाद,दि. ०८ नोव्हेंबर**

धर्माबाद तालुका हा महाराष्ट्र- तेलंगणा राज्याच्या सीमेवर आहे.महाराष्ट्राचे शेवटचं टोक असलेला धर्माबाद असुन म्हणावं तसा विकास धर्माबाद तालुक्याचा झाला नाही. आजही पंधरा पंधरा वर्षे, पुर्वीचे धर्माबादच्या समस्या प्रलंबित आहेत. येथील अर्धवट शासकीय इमारती, इसापूर कालव्याचे काम सतरा वर्षांपासून काम चालू आहे ते पुर्णत्वास गेले नाही, रोजगारांना काम मिळण्यासाठी नवीन उद्योग नाही, तसेच मिरची संशोधन केंद्र धर्माबादहुन पळाले, अखेर पाच वर्षे उलटले, पण याकडे राजकीय आमदार , खासदार यांनी लक्ष दिले नाही.

धर्माबादकरांचा केवळ मताचा वापर केला जातो ज्यांनी पाच वर्षे खासदार , आमदार म्हणून पद भोगले पण धर्माबाद च्या प्रलंबित कामाकडे डुकुंनही कोणी पाहिले नाही. ही शोकांतिका आहे. राजकीय पुढारी निवडणुकीसमोर नौटंकी ला सुरुवात करतात.असे सर्व सामान्य नागरीकातुन बोलले जात आहे. धर्माबाद तालुका होऊन पंचवीस वर्षे उलटली आजही धर्माबादचे विविध शासकीय कार्यालय विविध समस्यात जैसे थे पडुन आहेत. कोटी रुपये खर्च करून विविध शासकीय कार्यालयांच्या बांधकाम इमारती करुन पंधरा पंधरा वर्षा पासून निधी अभावी अर्धवट अवस्थेत आहेत.तर काही शासकीय कार्यालयांच्या बांधकाम इमारती साठी निधी येऊन पडला पण जागेअभावी अनेक वर्षांपासून निधी धुळखात पडुन आहे तर काही विविध शासकीय कार्यालय व ,वस्तीग्रह पन्नास पन्नास वर्षांपासून भाड्याच्या इमारतीत असल्याने, शासनालाच आर्थिक फटका बसत आहे.

आणी खासदार, आमदार यावर काहीच बोलत नाही, नको तिथे निधी देऊन शुभारंभ करतात पण अर्धवट , रेंगाळत पडलेले शासकीय इमारतीकडे मौन का ? यांना अर्धवट इमारत दिसत नाही का ? या रेंगाळत पडलेल्या इमारतींना निधी देता येत नाही का? नायगाव मतदार संघात राजेश पवार हे पाच वर्षे आमदारकी केली पण यावर काहीच बोलले नाही, की इमारतीसाठी निधी आणला नाही.त्यामुळे धर्माबादेत आमदार बद्दल नाराजी पसरली आहे.

असा समस्यात असणारा जिल्ह्यातील पहिला धर्माबाद तालुका असेल अशी चर्चा होत आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटिआय) मुलांचे वसतिगृह बांधकाम इमारतीसाठी एकूण पाच कोटी पाच लाख रुपये खर्च झाला. पुढे निधी अभावी २०१६ पासुन काम बंद पडले आहे.व

पंचायती समिती इमारतीचे बांधकाम सन २०१० मध्ये कामाला सुरु करुन सन २०१४ मध्ये बंद केले आहे.आज तब्बल दहा वर्षे होत आहे पुढील काम बंद आहे.धर्माबाद पंचायत समितीला तब्बल बावीस वर्षांपासून स्वताची इमारत नाही. एवढेच नसुन उपविभागीय कार्यालय, रजिस्ट्री कार्यालयांच्या बांधकाम इमारती साठी निधी येऊन पडला पण जागेअभावी निधी धुळखात आहे.

तालुका कृषी कार्यालय, दुय्यम निबंधक,रजिस्ट्री कार्यालय, आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह हे अनेक वर्षांपासून भाड्याच्या इमारतीत असुन शासनाला आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.तर

एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय, तालुका आरोग्य कार्यालय,उपविभागीय कार्यालय, या कार्यालयांना स्व:ताची इमारती नाहीत हे कार्यालय दुसऱ्याचा इमारती जाऊन अतिक्रमण केलेले आहेत.

# 'ईडीपासून मुक्तीसाठी भाजपासोबत गेलो': भुजबळ

**पान १ वरून –**

कदाचित त्यांना अटक होऊ शकते, असे अजित पवारांच्या निदर्शनास आणून देण्यात आले तेव्हा त्यांनाही घाम फुटला होता, अशी माहिती राष्ट्रवादीच्याच एका नेत्याने दिली. यानंतर अजित पवार यांनी लगेचच प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासह शरद पवारांची भेट घेतली होती. यावर तोडगा कसा काढायचा यावर खल झाला. प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधात ईडीची कारवाई झाली. त्यांच्या इमारतीमधील चार मजले ईडीने जप्त केले. सुनील तटकरे यांचीही ईडी चौकशी सुरू झाली होती. या तिन्ही नेत्यांनी भाजपबरोबर हातमिळवणी करू, अशी शरद पवारांकडे बाजू मांडली होती. शरद पवारांनी भाजपबरोबर जाण्यास नकार दिल्यावर अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल यांनी भाजपच्या नेत्यांबरोबर पुन्हा वाटाघाटी सुरू केल्या. भाजपबरोबर हातमिळवणी करण्याच्या बदल्यात ईडीची चौकशी सुरू असलेल्या नेत्यांची प्रकरणे बंद केली जातील वा त्यासाठी यंत्रणेकडून पाठपुरावा केला जाणार नाही. असे ठरले असल्याचे पुस्तकात म्हटले आहे .मात्र प्रफुल्ल पटेल यांनी या दाव्याचा इन्कार केला असून 'आमच्यासमोर विखुरलेले विरोधक की स्थिर सरकार देणारे मोदी असे दोन पर्याय होते. आम्ही स्थिर सरकारला प्राधान्य दिले' असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, छगन भुजबळ यांनी पुस्तकातील दाव्याचा इन्कार केला. ते म्हणाले,' मी अशा पद्धतीची कोणतीही मुलाखत दिलेली नाही. ईडीपासून सुटका करण्यासाठी आम्ही सगळे सरकारसोबत गेलो असे आरोप आमच्यावर सातत्याने केले गेले. मात्र मला कोर्टाने महाराष्ट्र सदन घोटाळ्यात क्लीन चीट दिली आहे. उद्धव ठाकरे यांचे सरकार असतानाच मला कोर्टाने क्लीनचीट दिली होती. त्यानंतर मी त्यांना आणि पवार साहेबांना पेढेही दिले होते. आम्ही सर्वजण विकासाच्या मुद्द्यावर पक्षातून बाहेर पडलो. पक्ष फुटला त्यावेळी मी एकटाच नव्हतो. ५४ आमदारांनी त्यावर सह्या केल्या होत्या. आपण सरकारमध्ये गेले पाहिजे असं अनेकांना वाटत होते. त्या सर्वांवर ईडीच्या केसेस नव्हत्या. आमच्यासोबत आजही जे आहेत त्या सर्वांवर ईडीच्या केसेस नाहीत, आम्ही सर्वांनी जो निर्णय घेतला, त्याचा फायदा आम्हाला विकास करण्यासाठी होत आहे. मात्र पुस्तकात असे का छापले. ?निवडणुकीच्या वेळेल मुद्द्यांवरुन लक्ष भरकटवण्यासाठी असे केले जातेय का? मला माहिती नाही. मी पुस्तक अजून वाचलेले नाही. त्यानंतर वकीलांसोबतही चर्चा करेन. त्यात चुकीचे जे जे काही असेल त्यावर निवडणुकीनंतर कायदेशीर कारवाई करेन, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ४८०/२०२४

अर्जदार : १) अप्पासाहेब आसाराम औताडे, वय. ५३ वर्षे, धंदा, शेती, रा. देर्डा ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) बाळु आसाराम औताडे, वय. ५० वर्षे, धंदा, शेती, रा. देर्डा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) लताबाई रामभाऊ केरे, वय. ४८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. गवळी शिवरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी अॅड. जी. बी. चव्हाण व अॅड. एस.एस. बनसोडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अनुसयाबाई आसाराम औताडे ही दि. २३/०८/२०२४ रोजी मौजे देड ता. गंगापूर येथे मयत झालेली आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे अनुसयाबाई आसाराम औताडे यांना अर्जदार क. १ ते २ हे मुले असून अर्जदार क. ३ ही विवाहीत मुलगी असून मयताचे पती पहिलेचे मयत झालेले असून या व्यतिरिक्त मयत अनुसयाबाई आसाराम औताडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणात पुढील तारीख १८/१२/२०२४ करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :- ०८/११/२०२४

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क.४९१/२०२४

अर्जदार : १) कलाबाई भ्र. ताराचंद घंटे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. मांडवा ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ह.मु. बेगमपुरा, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद २) पोपट ताराचंद घटे, वय ५२ वर्षे, धंदा. शेती, रा. मांडवा ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ह.मु. बेगमपुरा, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ३) संजय ताराचंद घंटे, वय. ५० वर्षे, धंदा. शेती, रा. मांडवा ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ह.मु. बेगमपुरा, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ४) कमलबाई नंदु कंदे, वय. ५५ वर्षे धंदा. घरकाम, रा. महालक्ष्मीखेडा ता. गंगापूर जि. औरंगाबाद,

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी, वरील अर्जदारांने अॅड. पी.आर. बरडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे रहिवाशी असुन अर्जदार क १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई असून मयत नामे ताराचंद चंद्रभान घटे यांची पत्नी आहे. तसेच अर्जदार क. २ व ३ हे मुले असून अर्जदार क. ४ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील नामे ताराचंद चंद्रभान घंटे हे दिनांक १०/१०/२०१६ रोजी अल्पशाः अजाराने मौजे बेगमपुरा, औरंगाबाद येथे मयत झाले आहे. मयतांना अर्जदार क १ ते ४ हेच मयताचे एकमेव कायदेशीर वारसदार आहे. मयतास अर्जदार क १ ते ४ हे एकमेव वारस आहे. अर्जदारांना मयत नामे ताराचंद चंद्रभान घटे यांच्या मृत्युमुळे शासकीय निमशासकीय व इतर कार्यालयामध्ये अर्जदारांना मयताचे वारस असल्याबाबत वांरवार मागणी होत असते त्यामुळे अर्जदार हे मयताचे एकमेव वारस असल्याबबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. अर्जदारांशिवाय मयत ताराचंद चंद्रभान घटे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. तसेच मयत ताराचंद चंद्रभान घटे यांच्या नावे मौजे शिवार मांडवा ता. गंगापूर येथील शेत जमिन गट नं. ९१ मध्ये ९ गुंठे क्षेत्र असून सदरील शेतजमिनीचे वारसदार यांना त्यांच्या मुत्युनंतर अर्जदार यांना सदरील क्षेत्र त्यांच्या नावे करणे करीता मयताचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :- ०८/११/२०२४

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

## जाहिर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. २८०/२०२४.
पुढील तारीख २२/११/२०२४.

अर्जदार : १. लालबी भ्र. शब्बीरखा पठाण, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. रऊफ पिता शब्बीरखा पठाण, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. फेरोजखा पिता शब्बीरखा पठाण, वय ४६ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. शाहीद पिता शब्बीरखा पठाण, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. फारुकखा पिता शब्बीरखा पठाण, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. जाहेदाबी भ्र. अरमानखा पटेल, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. गोलवाल सईदा बी जाविद खाँ मेवाती, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. माहोली, अडगाव, ता. व जि. औरंगाबाद. ८. शबाना बी सईद पठाण, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील एच. जी. शेख यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत शब्बीरखा सांडेखा पठाण यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ५ हे मुले असून अर्जदार क्र. ६ ते ८ ह्या मयताच्या विवाहित मुली आहे. अर्जदार क्रं. २ ते ८ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत शब्बीरखा सांडेखा पठाण यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ८ यांचे वडील नामे शब्बीरखा सांडेखा पठाण हे दि. २६/१०/२०२१ रोजी मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. तसेच मयताची आई ही सन १९८१ मध्ये व वडील हे सन १९९७ मध्ये मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे मरण पावले आहे. आम्ही अर्जदार क्रं. १ ते ८ यांना मयत शब्बीरखा सांडेखा पठाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महसूल दप्तरी, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ८ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत शब्बीरखा सांडेखा पठाण हे मौजे कुंजखेडा, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ८ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१६/०८/२०२३ रोजी मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २५/१०/२०२४.

आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कन्नड.

## अग्रलेख...

# उजवी बाजू...

आजकाल फॅशन म्हणून अंगीकारल्या जाणाऱ्या विचारहीन पुरोगामित्वामध्ये ईश्वर या संकल्पनेस फारसे स्थान नसले, तरी या संकल्पनेचे पाईक श्रद्धाळू मात्र खचितच असतात. काहीतरी चमत्कार घडेल आणि आपल्या पुरोगामी विचारसरणीस जनमताचा पाठिंबा मिळून कधी ना कधी, पुन्हा एकदा सत्ताप्राप्तीचे स्वप्न साकारेल, यावरही त्यांचा विश्वास असतो. परंपरावादी लोक अशा चमत्कारादी कल्पनांवर विसंबून न राहता प्रयत्नांवर भर देतात. म्हणूनच 'प्रयत्नांती परमेश्वर' या परंपरागत विचारांवर त्यांचा विश्वास अधिक असतो. त्यांचा परमेश्वरावर विश्वास असतोच, पण 'प्रयत्न हाच परमेश्वर' या विचारावर अधिक विश्वास असल्याने परंपरावाद्यांचे प्रयत्नप्रधान पुरोगामित्व आज लोकांस अधिक भावते, असे दिसून येऊ लागले आहे. हे एकट्या भारतातलेच चित्र आहे असे नाही. जगातील अनेक देशांत, अनेक समाजघटकांत असेच काहीसे वारे वाहू लागले असल्याने अनेक समाजव्यवस्थांचा कल उजवी बाजू अंगीकारण्याकडे झुकू लागला आहे. नव्या पुरोगामित्वासाठी ही काहीशी अस्वस्थता वाढविणारीच बाब म्हणावी लागेल. सर्व तऱ्हेचे प्रयत्न करूनही आपली विचारधारा लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नांस फारसे यश येत नाही, असे दिसू लागले की, अस्वस्थता वाढीसच लागते. कधी कधी नैराश्यदेखील वाढते. अशा वेळी नको असलेल्या घडामोडींतील अप्रिय भागाकडे दुर्लक्ष करून आपल्या मनातील अतृप्त इच्छांना सुखावणारे काही सापडते का, याचा शोध सुरू होतो आणि त्यातील आनंद अनुभवण्याची सामूहिक लाट येते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे निकाल बुधवारी निःसंदिग्धपणे स्पष्ट झाले आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने अमेरिकेने भरभरून कौल दिला. खरे म्हणजे हे काही अगदीच अनपेक्षित नव्हते, हे निकालांनंतरच्या विविध विश्लेषणांवरूनच दिसते. ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यातील लढतीत सुरुवातीपासूनच ट्रम्प यांची बाजू उजवी आहे, हे जवळपास स्पष्ट झाले होते. विद्यमान राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन यांची कारकीर्द अमेरिकेच्या वर्तमानकाळापुढील अनेक समस्या सोडविण्यात यशस्वी ठरली नाही, ही सर्वसाधारण अमेरिकनांची भावना होतीच; उलट या काळात अनेक समस्यांमध्ये नवी गुंतागुंत झाल्याने जागतिक महासत्ता म्हणून मिरविणारे हे राष्ट्र अधिकच दिशाहीन होत गेल्याची भावनाच वाढीस लागली. अनावश्यकपणे जागतिक प्रश्नांत स्वतःचे स्थान प्रस्थापित करण्याची अमेरिकेची नीती नवी नाही. पण कोणे एकेकाळी जगातील अन्य अनेक देश मागासलेले किंवा अन्यांच्या मदतीवर विसंबून होते तेव्हा याच नीतीमुळे अमेरिकेस महासत्तेच्या स्थानापर्यंत पोहोचणे शक्य झाले होते. आज जागतिक स्थिती तशी राहिलेली नाही. विविध क्षेत्रांतील प्रगतीमुळे जग जवळ येऊ लागल्याने अनेक देश विकसनशीलतेचा उंबरठा ओलांडून विकसितपणाच्या टप्प्यावर पोहोचू पाहात असल्याने अमेरिकेचा तो जुना दबदबाही आता उरलेला नाही, हे वास्तव स्वीकारण्याऐवजी अजूनही त्याच काळाचा धागा धरून बसलेल्या बायडेन प्रशासनाने रशिया व युक्रेन यांच्यातील युद्धात युक्रेनच्या बाजूने कौल देत स्वतःसमोरील समस्यांत भर टाकली. त्यामुळे अमेरिकेच्या समस्यांत अधिक भर पडली, असे सांगितले जाते. युक्रेनसारख्या देशास साह्य केल्याने अमेरिकेतील युद्धखोरीस प्रोत्साहन देणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन मिळेल व त्यातून मिळणाऱ्या पैशातून देशातील समस्या सोडविणे सोपे होईल, असा कदाचित बायडेन प्रशासनाचा होरा असावा. पण युक्रेनची आर्थिक स्थिती तशी नाही, त्यामुळे त्यांच्या तिजोरीतून अमेरिकेच्या तिजोरीत पैसा येण्याची शक्यता कमीच असल्याने, अमेरिकेवरील खर्चाचा बोजा वाढत गेल्याने समस्या अधिक तीव्र झाल्या. बेरोजगारीसारख्या समस्यांवर तोडगा निघू शकला नाही, अन्य प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीचा प्राधान्यक्रमही बदलावा लागला आणि कारभार दिशाहीन होऊ लागल्याने बायडेन प्रशासन फसल्याची जनभावना बळावत चालली. खरे म्हणजे, निसटता का होईना, ट्रम्प यांचाच पराभव करून अमेरिकेत सत्ता स्थापन केलेल्या बायडेन प्रशासनाकडून जनतेची चमकदार कारभाराची अपेक्षा होती. तशी संधीही जनतेने त्यांना सत्ता सोपवून दिली होती, पण तिचे सोने करणे बायडेन प्रशासनास साधले नाही. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेपुढील चिंता, बेकायदा घुसखोरांचा प्रश्न, पुरुष मतदारांची मानसिकता, महागाईची समस्या अशा विविध मुद्यांचा या निवडणुकीवर प्रभाव होता. पण बायडेन यांच्या पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना या मुद्यांवरची नेमकी भूमिका स्पष्ट करणे साधले नाही, असा ताज्या निकालांचा अर्थ आहे. असे असले तरीही, परंपरावाद्यांच्या प्रयत्नांपुढे चमत्काराचा प्रभाव उजवा ठरेल, असा विश्वास असलेल्या पुरोगाम्यांना ट्रम्प यांच्या पराभवाची अपेक्षा होती. ईश्वरवादावर विश्वास नसूनही ट्रम्प यांच्या पराभवासाठी अनेकांनी पाण्यात ठेवलेल्या देवांनाही तो कांगावा लक्षात आला असावा, म्हणूनच त्यांना अपेक्षित असलेला कौल न मिळता, ट्रम्प यांच्या विजयावर सहज शिक्कामोर्तब होऊ शकले. असा धक्का बसला की, त्यातून सावरण्याचा एखाद्या आशेच्या आभासी किरणाचा शोध सुरू होतो. इकडच्या काही नवपरंपरावाद्यांस तो सापडला आणि आनंदाला आभासी मंचावर उधाणदेखील आले. ट्रम्प यांच्यासमोर लढणाऱ्या कमला हॅरिस विजयी झाल्या असत्या तर अमेरिकेत कमळाबाई, म्हणजे कमला हॅरिस हरल्या, अशा आरोळ्यांनी आपल्याकडचा आभासी आसमंत दणाणून गेला असता.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील डोनाल्ड ट्रम्प यांच्या सहज विजयाचे भारतात उमटलेले हे सामाजिक पडसाद अनपेक्षित नव्हते. ट्रम्प यांचा विजय म्हणजे भारतातील मोदी सरकार ज्यांना मित्र मानते त्यांचा विजय असल्याच्या भावनेतून बळावलेल्या द्वेषामुळे ते तसे होणे साहजिकही होते. अमेरिकेतील ट्रम्प यांच्या विजयानंतर तेथील मतदारांच्या मानसिकतेवरच प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या प्रतिक्रियाही आपल्याकडे उमटू लागल्या आहेत. आजकाल समाजमाध्यमे हे व्यक्त होण्याचे सहज साधन उपलब्ध असल्याने अशा प्रतिक्रिया सर्वांना दिसतात आणि क्वचित त्यांचाही अन्यांच्या मानसिकतेवर प्रभाव पडू लागतो, असे समूहाचे मानसशास्त्र मानते. प्रयत्नवादाऐवजी आशावादावर विश्वास ठेवणाऱ्या प्रवृत्ती या मानसशास्त्राचा आधार घेऊनच आपल्या आशावादाची बीजे रोवत असल्याने, ट्रम्प यांच्या विजयानंतर भारतातील काही समूहांत आभासी मंचांवर व्यक्त होणाऱ्या भावना ही भारताची सामाजिक प्रतिक्रिया आहे, असे मानण्याचा काळच आता कालबाह्य झाला. त्यामुळे ट्रम्प यांच्या विजयाकडे सकारात्मकपणे पाहून अमेरिकेतील बदललेल्या राजकीय स्थितीचा भारताला सामाजिक, औद्योगिक, राजकीयदृष्ट्या नेमका कसा लाभ घेता येईल, याचा विचार सुरू झाला आहे. ही प्रयत्नवादावर विश्वास ठेवणाऱ्या प्रवृत्तींची उजवी बाजू म्हणावी लागेल. ट्रम्प हे मोदी यांचे मित्र आहेत, म्हणजे मोदी विरोधकांचे साहजिक शत्रू ठरतात. त्यामुळे अमेरिकेतील सत्तापालटाने काहींचे चेहरे सुतकी झाले असले, तरी या परिवर्तनामुळे भारतास अनेक अंगांनी नव्या संधी प्राप्त होण्याची शक्यता बळावली आहे, यात शंका नाही.

काहीही असले तरी ट्रम्प यांनी जोरदार मुसंडी मारून अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये पुनरागमन केले आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापक जागतिक आणि धोरणात्मक बाबींवरील सहकार्याची पायाभरणी मोदी यांनी ट्रम्प प्रशासनाच्या पहिल्या पर्वात केली होती. आता त्यावर नवी इमारत उभारण्याच्या भारताच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. जागतिक शांतता, दहशतवादास विरोध, जगाच्या समृद्धीसाठी परस्पर सहकार्य अशा त्रिसूत्रीवर आधारित असलेली राजनीती करण्याकडे भारताचा गेल्या दशकभरातील कल राहिला आहे. ट्रम्प यांनीही दहशतवादाविरोधात उघडपणे घेतलेल्या भूमिकेस अमेरिकेच्या जनतेने कौल दिला आहे. भारत हा अमेरिकेचा व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा देश असल्याची ट्रम्प यांची भूमिका जुनीच आहे. भारताची गेल्या दशकभरातील प्रगती आणि जगाच्या पाठीवर उंचावणारी प्रतिष्ठा तसेच अमेरिकेच्या उभारणीतील तेथील भारतीयांचे योगदान या उभय देशांतील संबंध दृढ करणारा धागा ट्रम्प यांनी मान्य केला आहेच; त्यामुळे आता जागतिक राजकारणात अमेरिकेसोबतच्या नात्याने उजवे वळण घेण्यास सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यास हरकत नाही. ▮


## दखल

# शिक्षण-करीअर परस्पर संबंध; गरज मनोवृत्ती बदलण्याची

**विजय पांढरीपांडे**

शिक्षणाचा आणि करीअरचा नेमका संबंध आहे का, असायला हवा का, मुळातच प्लेसमेंट ही कॉलेज-विद्यापीठाची जबाबदारी आहे का? हे असे किंवा तत्सम प्रश्न अधूनमधून चर्चेचा विषय होतात. आजकालच्या नोकरी देणाऱ्या कंपन्यांची तक्रार असते कायमची. ती ही की, आजचे पदवीधर हे बहुतांशी नोकरी देण्याच्या लायकीचेच नसतात. म्हणजे आजच्या उद्योगांना, कंपन्यांना जे स्किल्स हवे असतात ते अभ्यासक्रमाचा भागच नसतात. मुळात आपल्याकडील पारंपरिक, पूर्वापार चालत आलेली अभ्यासक्रमाच्या आखणीची रूपरेखा आपण तपासली तर ती बहुतांशी ॲकेडेमिक कवायत असते. म्हणजे आधी प्रत्येक सत्राचे विषय ठरवायचे अन् सत्रात उपलब्ध असलेले विषयाचे एकूण तास लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्या वेळात किती अन् काय शिकवता येईल याचा अंदाज घेऊन, त्याप्रमाणे पुस्तकाची (टेक्स्ट बुक) निवड करून आखणी करायची. आपल्या विद्यापीठाचा व्याप, विस्तार, लाखोंची विद्यार्थी संख्या लक्षात घेता, काळाची गरज असली तरी वारंवार अभ्यासक्रमात बदल करणे केवळ अशक्य असते. कारण त्याचा परिणाम परीक्षा पद्धतीवर होत असतो. पेपर काढताना जुना अभ्यासक्रम, नवा अभ्यासक्रम, कोणता विद्यार्थी कोणती परीक्षा देणार असा गोंधळ निर्माण होऊ शकतो. म्हणूनच पाच वर्षे तरी तोच अभ्यासक्रम राहतो.

इंजिनीअरिंग, मेडिकलसारख्या क्षेत्रात नवनवे तंत्रज्ञान वेगाने येत असल्याने अभ्यासक्रम, प्रयोगशाळा फार लवकर कालबाह्य होतात. या बदलाला सामोरे जाण्याचे खरे आव्हान शिक्षण तज्ज्ञापुढे आहे. मुळातच कोणतेही शिक्षण, कुठलाही अभ्यासक्रम हा सर्व करीअर क्षेत्राची, सर्व उद्योग क्षेत्रातील गरजांची दखल घेऊच शकत नाही. तुम्ही एखादा विषय शिकता, एखाद्या क्षेत्रात पदवी घेता म्हणजे नेमके काय करता? तर, त्या किंवा तत्सम विषयाचे अध्ययन करताना तार्किक विचार करायला शिकता. प्रश्न, शंका निर्माण करायला शिकता. शिस्तीने विचार करून वेगवेगळे पर्याय तपासायला शिकता. खरे तर आपण एखाद्या विषयात पदवी घेतो, याचा अर्थ त्यात आपण तज्ज्ञ होतो, असे मुळीच नाही. उलट सर्वस्वी नव्या विषयाला हात घालण्याची क्षमता या अध्ययनातून अपेक्षित असते. आजकाल लर्निंगपेक्षा लर्निंग-रीलर्निंग-आजीवन लर्निंग या त्रयींचे महत्त्व वाढले आहे. आजच्या-उद्याच्या उद्योगाला, करीअर क्षेत्राला हेच अपेक्षित आहे. नेमके येथेच आपली विद्यापीठे कमी पडताहेत.



आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बरेच चांगले, सकारात्मक बदल झाले असले, अपेक्षित असले, तरी त्याच्या अंमलबजावणीत अडचणी आहेतच. कारण प्रत्येक राज्याचा अभ्यासक्रम वेगळा, भाषा माध्यम वेगळे, प्रत्येक राज्याचे शिक्षण धोरण (सरकार पक्ष) वेगळे. असा सगळा गोंधळ आहे. करीअर, उद्योग, नोकऱ्या याचा विचार मात्र राष्ट्रीय स्तरावर होतो. तिथेच मिस-मॅच दिसून येते. संघ राज्याची कल्पना ही अस्मितेसाठी, पक्षीय राजकारणासाठी सोयीची असली, तरी शिक्षणाचा विचार हा एकसंध राष्ट्रीय पातळीवरच व्हायला हवा. त्यासाठी पक्ष, जात, धर्म, भाषा अशा संकुचित परिघाबाहेर जाऊन खुल्या आकाशात संचार केल्यासारखे देशपातळीवर विचार मंथन व्हायला हवे.

एक गोष्ट, एक सत्य आपण लक्षात घेतले तर हा गुंता सुटेल. आपण शाळा, महाविद्यालय, विद्यापीठात जो काही अभ्यासक्रम शिकतो त्याचा; आपण जी नोकरी-व्यवसाय करतो किंवा करीअर निवडतो त्याचा परस्पर काहीही संबंध नसतो. डॉक्टर असलेले घाणेकर उत्तम नट होतात. इंजिनीअर असलेले महेश काळे शास्त्रीय संगीतात करीअर करून जागतिक पातळीवर प्रसिद्धी, सन्मान मिळवतात. चेतन भगत मेकॅनिकल इंजिनीअरिंग, एमबीएची पदवी मिळवून लेखक म्हणून नाव कमावतो. केमिकल इंजिनीअर असलेले अच्युत गोडबोले संगणक क्षेत्रात काम करतात; आता मराठीत वेगवेगळ्या विषयांवर जाडजूड ग्रंथ लिहितात. डॉक्टर असलेले सलील कुलकर्णी संगीतकार होतात, चित्रपट निर्मिती करतात. अशी अनेक उदाहरणे देता येतील, जे विद्यार्थी संशोधन क्षेत्राकडे जातात किंवा शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर होतात तेच फक्त आपण जे शिकलो त्याचा थोडाफार उपयोग करतात. तसेही आता प्रत्येक क्षेत्रातच अपडेट होण्याची, सातत्याने नवनवे शिकण्याची गरज निर्माण झाली आहे. पुढच्या काळात येऊ घातलेला कृत्रिम बुद्धिमत्ता या राक्षसाचा शिरकाव लक्षात घेता परिस्थिती अधिकच बिकट, गंभीर होण्याची शक्यता आहे. आता भविष्यात निरुपयोगी माणसांचा समाज निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जातेय. म्हणजे आता दोन-तीन दशकांनंतरच्या पिढीला अध्ययन, करीअर या बाबतीत अधिकच सतर्क राहावे लागण्याची शक्यता आहे.

आपण अधूनमधून बेकारीच्या समस्यांबद्दल ऐकतो. नोकऱ्या नाहीत, अनेक शिकलेले तरुण बेकार आहेत, सरकार या विषयी काहीच करत नाही. अशा तक्रारी ऐकतो. यासाठी अधूनमधून सरकार विरोधात आंदोलनेदेखील होतात. मुळात नोकऱ्या नाहीत, संधी नाहीत हा समज चुकीचा आहे. सरकारी नोकऱ्या अर्थातच मर्यादित आहेत. तिथे लालफितीमुळे प्रत्येक क्षेत्रात, विभागात अनेक पदे वर्षानुवर्षे रिकामी राहतात. याच नोकरीचा आग्रह करणाऱ्यांना आरामाचे जीवन अपेक्षित असते. पण सरकारी नोकरीचा आग्रह सोडला तर इतर क्षेत्रांत बऱ्याच संधी आहेत. त्यासाठी नवे स्किल्स शिकण्याची, मेहनत करण्याची, आळस झटकून नावीन्यपूर्ण क्षेत्रात पाय रोवण्याची जिद्द अंगी पाहिजे. मला हे येत नाही, मी हे काम करणार नाही, मी नवे काही शिकणार नाही अशी मनोवृत्ती भविष्यात चालणार नाही. उलट 'लाथ मारीन तिथे पाणी काढीन,' अशा जिद्दीची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत हा बदल घडवून आणणे हे शिक्षक-प्राध्यापकांपुढे खरे आव्हान आहे. ▮

७६५९०८४५५५

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# निवडणुकीची हास्यजत्रा

निव्वळ मनोरंजन असलेली महाराष्ट्रात 'निवडणुकीची हास्यजत्रा' सुरू झाली आहे. या हास्यजत्रेतील पात्र तुमच्या आमच्या सरावातील आहेत. जत्रा चांगलीच भरात आली आहे. आगामी पाच दिवसांत अजून तापेल आणि शेवटच्या आठवड्यात ही जत्रा कुठल्या स्तरावर जाईल, हे सांगता येत नाही. सत्ताधारी आणि विरोधक समोरासमोर आले आहेत. अक्षरशः चिखलफेक सुरू आहे. अनेकदा तर आरोपासाठी मुद्दा नसताना पुढे कॅमेरा दिसताच तथ्यहीन आरोप होताना दिसतात. मतदारांना ते आता समजू लागले आहे. राजकीय शिरोमणी शरद पवार यांनी राजकारणाचा चोथा करून ठेवला आहे. राज्यातील राजकारणाला गलिच्छ करण्यात शरद पवार यांचा मोठा वाटा आहे. 'तोडा, फोडा आणि राज्य करा' या धोरणाने ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचून त्या खुर्चीवर बसू शकले नाहीत. सोनिया गांधी यांचा विदेशीचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला नसता तर कदाचित ते त्या खुर्चीवर बसू शकले असते. सोनिया गांधी पंतप्रधान होत असल्याचा काटा त्यांना रुतला होता. त्यानंतर त्यांना जिव्हारी लागले ते देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्री होणे! त्यावेळी त्यांनी भट, ब्राह्मण वगैरेपर्यंतची टोकाची टीका केली. वाढत्या वयाचा अनुभव लक्षात घेता त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र उद्धव यांना गळाशी लावले. त्यांना मुख्यमंत्रीही केले. (मुलगी सुप्रिया, पुतण्या अजित पवार यांची अट न ठेवता). जगात ज्या माणसाची 'दादा' म्हणून ओळख होती. अख्खा महाराष्ट्र ज्या व्यक्तीच्या शब्दाला मान देत होता आणि विरोधक थरथर कापत होते. ज्यांच्यापुढे भल्याभल्यांची मान वर करून बोलण्याची हिंमत नव्हती त्या शिखराएवढ्या उंच माणसाचा मुलगा किंगमेकरऐवजी शरद पवारांच्या इशाऱ्यावर नाचणारे बाहुले झाले. बाळासाहेबांचा 'बाणा' चिरंजिवांनी मातोश्रीच्या आडावर बांधून मुख्यमंत्रिपद पदरात पाडून घेतले. त्या पदाला साजेसे असे काम केले असते तर उद्धव ठाकरेंचीही उंची वाढली असती. परंतु, त्यांना तेही सुचले नाही. त्यांच्या तोंडातून केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांचाच उद्धार होत होता. बाळासाहेब हिंदुत्व जगले अन् उद्धव हिंदुत्व विसरून गेले. नव्हे ज्यांना स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यातही लाज वाटते अशांसोबत हातमिळवणी केली. एकनाथ शिंदे यांनी सहकाऱ्यांसह बाहेर पडून उद्धव ठाकरे यांची नशा उतरवली. त्यामुळे उद्धव ठाकरे अधिकच चिडले. पण, ज्यांच्यासोबत त्यांनी हातमिळवणी केली, त्यांच्या लेखी उद्धव ठाकरे यांच्या शब्दाला मान नसल्याचे स्पष्ट झाले. तिकीट वाटपाच्या वेळी मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्याची मागणीही महाविकास आघाडीतील दोन मित्र पक्षांनी कचऱ्यासारखी उडवून लावली. महाविकास आघाडीत असलेल्या काँग्रेस आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्याच डोक्या(विचार)च्या अकबरुद्दिन ओवैसी यांनी उद्धव ठाकरे यांना केलेला सवाल म्हणजे तोंडात 'शेण' घालण्याचाच प्रकार म्हणावा लागेल. अकबरुद्दिन यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित जाहीर सभेत, ''हिंदुत्व विचारधारेच्या शिवसेनेचे दोन तुकडे झाले. आता काँग्रेस आणि शरद पवार यांनी उद्धव ठाकरेंना जवळ केले. तीन पक्षांची आघाडी झाली. उद्धव ठाकरे हिंदुत्वाचा धडा राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांना शिकवण्यात यशस्वी झाले की नाही,'' असा प्रश्न केला. अकबरुद्दिन यांनी उपस्थित केलेला प्रश्न ज्या ज्या ठिकाणी उद्धव ठाकरे महाविकास आघाडीच्या सभेला जातील त्या त्या ठिकाणी साऱ्या महाराष्ट्राने विचारून त्यांना सळो की पळो करून टाकले पाहिजे. निवडणुकीच्या काळात महिनाभर २४ तास चालणाऱ्या या महाराष्ट्राच्या हास्यजत्रेतील किस्सेही गंभीर आहेत. आता शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी निवडून आल्यास बेरोजगारीची चिंता व्यक्त करीत मतदार संघातील 'तरुणांचे लग्न' लावून देणार असल्याचे आश्वासन दिले. अरे तुम्ही राज्यात विधानसभेत लाख-दोन लाख नागरिकांचे प्रतिनिधित्व करणार आहात. तुमच्या बोलण्यातून तुमची उंची, तुमचा दृष्टिकोन समजला पाहिजे. पण, तुम्ही 'इंटरटेन्मेन्ट' करताय! काय अपेक्षा करावी तुमच्याकडून महाराष्ट्राच्या विकासाची! काल सदाभाऊ खोत यांनी शरद पवार यांच्यावर टीका करताना त्यांच्या तोंडाचा उल्लेख केला. शरद पवार हे कुच्छित राजकारणी आहेत वगैरे वगैरे... पण, त्यांच्या आजारावर बोलून काय साध्य केले तर फक्त टाळ्या... आम्ही १०० टक्के मतदान करू! पण, विकास सांगणाऱ्यांनाच! फक्त टाळ्यांसाठी बोलून तोंडाची वाफ दवडण्यात अर्थ नाही... विरोधक एकवटले आहेत. सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या हाती आयते कोलीत देण्याचे धाडस करू नये... अकबरुद्दिनसारखे आहेत तोंडात शेण घालायला... ▮


९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# शरद पवार कितीदा निवृत्त होणार?

**मोरेश्वर बडगे**

'शिल्लक राष्ट्रवादी'चे सुप्रीमो शरद पवार यांनी परवा संसदीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले. त्यांचा नातू युगेंद्र पवार आपले काका अजित पवार यांच्याविरुद्ध बारामती विधानसभा मतदारसंघातून लढतो आहे. त्याच्या प्रचार सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, ''किती निवडणुका लढवायच्या? नव्या पिढीकडे जबाबदारी दिली पाहिजे. ३०-३५ वर्षे मी बारामतीची जबाबदारी पाहिली, नंतर अजितदादांकडे दिली. पुढच्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज आहे. माझ्या राज्यसभा सदस्यत्वाची दीड वर्षे बाकी आहेत.'' तरीही कुठेतरी थांबायची गोष्ट करून शरद पवारांनी निवडणूक भावनात्मक वळणावर नेण्याचा प्रयत्न केला. पवार जे बोलतात ते करीत नाहीत. करायचे नाही ते बोलतात, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यांनी निवृत्तीची गोष्ट केली म्हणजे पवार अजिबात रिटायर होणार नाहीत. मग 'कुठेतरी थांबले पाहिजे,' म्हणजे पुतण्याने थांबले पाहिजे, असे त्यांना म्हणायचे आहे का? पण हेच शहाणपण दोन वर्षांआधी सुचले असते तर आज पुतण्या त्यांच्यासोबत दिसला असता. मात्र, तेव्हा त्यांना आपल्या मुलीच्या हाती पक्ष द्यायचा होता. सत्ता हे पवारांचे टॉनिक आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा हातची सत्ता निसटतेय्, असे त्यांना जाणवले तेव्हा तेव्हा त्यांनी लोकांच्या भावनेशी खेळ केला आहे. 'ही माझी शेवटची निवडणूक आहे,' असे ते मागेही म्हणाले होते. मात्र, त्यांची ती शेवटची निवडणूक उजाडलीच नाही. पुतण्याच्या महत्त्वाकांक्षेला उकळ्या फुटू लागल्या तेव्हा पवारांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा जाहीर करून हंगामा केला होता. पुढे दोन दिवसांनी कार्यकर्त्यांचा आग्रह सांगून त्यांनी तो परतही घेतला. आपल्या ५०-५५ वर्षांच्या राजकारणात कधी राजीनामा तर कधी निवृत्त होण्याचा धाक दाखवून पवारांनी राजकारण हातात ठेवले. त्यामुळे पवार कितीदा निवृत्त होणार? हा त्यांच्याच कार्यकर्त्यांना प्रश्न पडत असणार. आज त्यांचे वय ८३ वर्षे आहे. राजकारणात हे वय फार नाही. नरसिंहराव याच वयात पंतप्रधान झाले होते. मात्र, शरद पवारांना तो राजयोग संभवत नाही. तरीही त्यांची सत्तेची हाव सुटत नाही. त्यासाठी इतरांचेच नव्हे तर स्वतःचे घरही फोडायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठे राजकीय पवार घराणे दुभंगलेले आपण पाहतो आहोत. मात्र तुम्ही लिहून ठेवा, पवार जेवढा उशीर करतील तेवढी त्यांची निवृत्ती अडचणीची होणार आहे. आज पुतण्या आडवा आला. कोणी सांगावे? पुढे कन्या, नातू, पणतूही दावे सांगू



लागतील. शेवटी पवारांच्याच संस्कारात ते वाढत आहेत. एक सांगू का? पवारांचे बुरे दिन सुरू झाले आहेत. त्यांनी टाकलेले पत्ते उलटे पडत आहेत.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे त्याचे उदाहरण सांगता येईल. जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी तब्बल वर्षभर जिवाची बाजी लावली. त्यांना चालवणारे मराठवाड्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेते कोण होते, हे उघड गुपित आहे. जरांगे यांनी मोठा लढा दिला. मात्र, त्यांना ऐन निवडणुकीच्या मध्यात माघार घ्यावी लागली. निवडणूक लढवण्याची सारी तयारी जरांगे यांनी केली होती. त्यासाठी मराठा, दलित आणि मुस्लिम अशी जातीची समीकरणेही त्यांनी जुळवली होती. सारे फिस्कटले. मराठा समाजही बुचकळ्यात पडला. मराठा समाजाच्या शेकडो इच्छुकांनी पाटलाकडे अर्ज दिले होते. त्यांची घोर निराशा झाली आहे. हे कसे घडले? 'जरांगे लढले असते तर भाजपाचा फायदा झाला असता,' अशा शब्दात शरद पवारांनी आनंद व्यक्त केला. एका समाजाच्या जोरावर निवडणूक जिंकता येत नाही, असे सांगून जरांगेंनी माघार घेत मोठा समजूतदारपणा दाखवला. त्याबद्दल त्यांचे कौतुकच केले पाहिजे. पण सुरुवातीला २५० जागांवर मराठ्यांची ताकद आहे, असे ते म्हणत होते, त्याचे काय? मुळात जरांगे पाटील यांचे आंदोलन काय होते? ते त्यांनाही नीटसे कळले नसावे. कारण, प्रत्येक उपोषणात त्यांच्या मागण्या वाढत गेल्या. आता नेहमीच्या सवयीप्रमाणे शरद पवार यांनी 'महाआघाडीचा संबंध नाही,' असे जाहीरपणे सांगितले. पण कोण विश्वास ठेवणार? शरद पवार नाही तर तेवढा पॉवरफूल दुसरा मराठा नेता आहे तरी कोण? आंतरवाली सराटी या मराठवाड्यातील एका खेडेगावात त्यांनी आंदोलन सुरू केले. सुरुवातीला ते कोणाच्या गावी नव्हते. जरांगे यांची तब्येत बिघडली, सरकारी डॉक्टर त्यांना दवाखान्यात न्यायला आले तेव्हा विरोध झाला. त्यातून पोलिसांनी लाठीमार झाला आणि जरांगे यांचे आंदोलन देशभर उजेडात आले. लाठीमार झाला नसता तर हे आंदोलन जगाला कळलेही नसते. जरांगे यांनी तब्बल सहा वेळा उपोषण केले. प्रत्येक वेळी सरकारकडून काही मागण्यांचे आश्वासन पदरात घेऊन जरांगे उठत आले. दर उपोषणाला त्यांच्या मागण्या वाढत गेल्या. एके वेळी तर 'मला गोळ्या घाला,' असे म्हणत ते देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईतील 'सागर' बंगल्यावर जायला निघाले होते. दुसऱ्या एका प्रसंगात त्यांनी सारा समाज मुंबईवर नेऊन पाहिला. मुंबईच्या वेशीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुठलासा कागद त्यांच्या हाती दिला तेव्हा त्यांनी गुलाल उधळला होता. त्या कागदात काही दम नाही, हे पुढे त्यांच्या लक्षात आले. त्यांना ओबीसींमधून आरक्षण हवे होते. तसे देता येत नाही, हे शरद पवार यांनाही ठाऊक आहे. तरीही विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आंदोलन पेटवले गेले. प्रसार माध्यमांनी ते पेटवत ठेवले. या निमित्ताने देवेंद्र फडणवीस हे लक्ष्य होते. ओबीसींमधून आरक्षण हवे होते तर 'फडणवीस यांचा सुपडासाफ करू'ची भाषा जरांगे वारंवार का वापरत होते? जरांगे यांना कोण उचकवत होते? याचे कोडे अजून उलगडायचे आहे. आता 'लढायचे नाही, पाडायचे' असे जरांगे यांनी म्हटले आहे. जरांगे यांचे मराठा समाज किती ऐकतो, जरांगे किती जागा पाडतात ते २३ नोव्हेंबरला कळेल. मात्र, या निमित्ताने भाजपाला तडाखा देण्याचा विरोधकांचा डाव फसला आहे. ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष टळला आहे, ही त्यात जमेची बाजू. जरांगे नावाचा फुगा फुटला आहे. महायुतीसाठी रस्ता मोकळा आहे.

विधानसभा निवडणुका काही दिवसांवर आल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत आणि या निवडणुकीत मोठा फरक दिसतो. सर्वच राजकीय पक्षांमध्ये मोठी बंडखोरी आहे. अपक्ष उमेदवारांची संख्या मोठी आहे. लोकसभा निवडणुकीत आढळली तशी विरोधी हवा नाही. हिंदू जागा झाला आहे. 'बटेंगे तो कटेंगे' हे हिंदूंच्या लक्षात आले आहे. देवेंद्र फडणवीस यांची ही सहावी निवडणूक आहे. ते आरामात छक्का मारतील. त्या हवेचा नागपुरातच नव्हे, तर राज्यभर महायुतीला फायदा होताना दिसतो आहे. पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येताना दिसते आहे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे


### लोकशाहीचा भ्रमनिरास

युरोपीय आणि अमेरिकन देश भारतातील लोकशाहीचा आणि सरकारचा आदर करतात. संसदीय सरकार पक्षनिष्ठ मताधिक्याने निवडले जाणे हेच पथ्यावर पडत असल्याचे सिद्ध झाले आहे. उमेदवारांचे आयाराम-गयाराम होत असल्याने विविध पक्षांच्या राष्ट्रनिष्ठा प्रामाणिक आहेत का? घराणेशाहीतील उमेदवार का लादल्या जातात? कोणताही पक्ष सामान्य शेतकरी किंवा कामगारांना आपला उमेदवार म्हणून का निवडत नाही? यातून लोकशाहीचा भ्रमनिरास नाही का? आता तर काही धार्मिक प्रतिष्ठान, अमक्या एका पक्षाला मतदान करा, असे आवाहन समाज माध्यमातून करीत असतील तर धर्मनिरपेक्षतेला अर्थ उरत नाही. त्यामुळे आचारसंहिता भंगाचे एक सबळ कारण ठरते. जातीच्या बहुमताने राजकारण केल्या जात असेल तर देशातील लोकशाहीचे हे एक वैगुण्य आहे. या देशात सामाजिक समानतेसाठी काही जाती आणि जनजातींना राजकीय आरक्षण दिले, परंतु त्याच क्षेत्रात इतर असंख्य जातीचेही लोक राहतात; यांचा विचार व्हायला नको का?

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### २०३६ साली ऑलिम्पिक स्पर्धा भारतात झाल्यास अनेक फायदे

आता २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेचे नियोजन आंतरराष्ट्रीय पातळीवर झाले आहे. या स्पर्धेसाठी जगातील अनेक देश इच्छुक आहेत. त्यामध्ये तुर्की, चिली, इंडोनेशिया, इजिप्त, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, कतार, सौदी अरेबिया, हंगेरी, इटली, डेन्मार्क, कॅनडा आदी देश इच्छुक आहेत. भारताने आपल्या ऑलिम्पिक संघटनेतर्फे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेला पत्र दिले असून स्पर्धा भरविण्याची तयारी दर्शविली आहे. ही स्पर्धा भारत भरविल्यास त्याचे अनेक फायदे होऊ शकतात. त्यामुळे आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती होऊ शकते. भारतात अनेक नवीन उद्योगाला चालना मिळू शकते. यामध्ये वाहतूक, रेस्टारंट व्यवसाय, राहण्याच्या सोयी इत्यादींचा समावेश आहे. मोठी आर्थिक उलाढाल होईल. भारतात स्पर्धा झाल्यास त्यांचे अनेक फायदे खेळाडूंनासुद्धा मिळू शकतात. योगा, खो-खो, कबड्डी, बुद्धिबळ, टी-२० क्रिकेट स्पर्धा, स्क्वॅश या खेळांचा समावेश होऊ शकेल. अनेक खेळाडूंना उत्तेजन तर मिळेलच; शिवाय भारताची जगात मोठी ताकद असल्याचे सिद्ध होईल. कदाचित त्याचा उपयोग आपणास संयुक्त राष्ट्र संघाचे स्थायी समितीचे सभासदत्व मिळण्यास एक सपोर्ट म्हणून होऊ शकेल, असे वाटते. खेळाडूंना खेळाविषयी आत्मीयता निर्माण होईल. या स्पर्धा भारतातील अहमदाबाद येथे होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास अहमदाबाद हे एक आंतरराष्ट्रीय शहर म्हणून उदयास येईल. २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्याच्या प्रयत्नामध्ये भारत कोणतीही कसूर सोडणार नाही. हे १४० करोड भारतीयांचे स्वप्न आहे, ते आम्हास पूर्ण करावयाचे आहे, असे पंतप्रधान मोदींनी नुकतेच म्हटले आहे. मोदींच्या या प्रयत्नाला यश मिळो, ही साऱ्या भारतीयांची इच्छा आहे.



**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

### कौटुंबिक राजकीय पक्ष अन् राजकारणी

आपल्या राज्याचा अन् देशाचा भूतकाळाचा विचार करता काही क्षमता असणाऱ्या राजकारण्यांनी कौटुंबिक पक्षाच्या दावणीला स्वतःला बांधून घेऊन त्यांचं स्वतःचं, गावाचं, तालुक्याचं, जिल्ह्याचं, राज्याचं शेवटी देशाचं वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक नुकसान केले आहे. भरून न येणारं नुकसान आहे, पण जनता काय करणार? लोकशाहीचा राजा फक्त मतदानाच्या दिवशीचा राजा आहे, असं राजकारण्यांना वाटतं. बाकी उरलेल्या दिवसांत हे वरील प्रकारातील राजकारणी जनतेचा किती विचार करतात, हे फक्त त्यांनाच माहीत. मला असं वाटतं, काही लोकांना त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर सभागृहामध्ये समस्या मांडून लोकांना, समाजाला व देशाला फायदा करून देता आला असता; जे कौटुंबिक पक्षाच्या दावणीला बांधल्यामुळे करता येत नाही. मग त्याचे परिणाम सर्वांना स्वीकार करून भोगावे लागतात. यावर जनतेने विचार केला पाहिजे; पर्याय शोधला पाहिजे.

**गणेश धर्माजी शेवते**/९०९६१५२९४९

### असाही एक सुखद अनुभव

शासकीय कार्यालयातून सामान्य अर्जाद्वारेही जी माहिती मागितली ती मिळते, असा सुखद अनुभव मला नुकताच आला. बऱ्याच नागरिकांना ही माहिती नसेल पण जर आपण एखाद्या साध्या कागदावर रितसर माहिती मागितली तर त्यावर कार्यवाही होते व माहितीही मिळते, प्रत्यक्षात जरी बऱ्याच कार्यालयात असे होत नसेल तरी मला याचा एक सकारात्मक अनुभव अशाप्रकारे आला आहे. मी काही दिवसांपूर्वी ५० पैशांच्या एका साध्या पोस्ट कार्डवर विद्युत निरीक्षक, अमरावती यांच्याकडून एक माहिती मागविली होती. विद्युत निरीक्षकांनी त्यावर सविस्तर, रितसर व त्वरित मला पूर्ण माहिती दिली. मी त्यांचा या कार्यपद्धतीसाठी त्यांचे आभार मानतो. या विषयाचा दुसरा भाग म्हणजे बऱ्याच कार्यालयात माहिती अर्जाची तर माहिती मिळतच नाही. या उलट आरटीआयमधूनही ही माहिती वेळेवर मिळत नाही. संबंधितांनी या विषयाकडे लक्ष द्यावे, हेच विनंती. ▮

**पद्माकर नानोटे**/७२१८८९७४५२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप वसंतराव पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४९२९८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आदिवासी भागात विकास योजना आणण्याचे काम प्रामाणिकपणे केले : शिवाजीराव कर्डिले

### भाजपचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचा वावरथ जांभळी परिसरातील गावांमध्ये प्रचार दौरा, ग्रामस्थांनी केले पुष्पवृष्टी करून स्वागत



राहुरी: वावरथ जांभळी परिसरातील नागरिकांची दळणवळण यांची सोय व्हावी यासाठी पुलाचा प्रलंबित प्रश्न आमदार होताच प्राधान्याने मार्गी लावण्याचे काम करणार आहे. या भागातील नागरिकांचा राहुरीशी संपर्क होण्यासाठी स्वखर्चातून दळणवळणासाठी बोट उपलब्ध करून दिली . त्यानंतर प्रशासनाकडे पाठपुरावा करत २५ लाखांची अत्याधुनिक बोट देण्याचे काम केले. २०१९ ला आमदार न झाल्यामुळे विकासाची कामे होऊ शकली नाहीत. आदिवासी, धनगर समाज तांडा, वस्त्यांवर राहत असून त्यांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्याचे काम केले आहे. भावनेचे राजकारण संपले असून आता अफवांवर विश्वास ठेवू नका. आपल्याला विकासाची कामे मार्गी लावायचे आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

राहुरी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी तालुक्यातील वावरथ, जांभळी, जांबुळबन, शेरी चिखलठाण, म्हैसगाव, कोळेवाडी, दरडगावथडी, गाडकवाडी, ताहराबाद, बेलकरवाडी, वाबळेवाडी, वरशिंदे आदी गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधला. ठिकठिकाणी कर्डिले यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. शेरी चिखलठाणा ग्रामस्थांच्या वतीने माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांना विधानसभा निवडणूक खर्च म्हणून २१ हजार रुपयांची आर्थिकत देणगी देण्यात आली. म्हैसगाव येथील नागरिकांच्या वतीने बाईक रॅली काढण्यात आली व कर्डिले यांच्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टी करण्यात आली.

या प्रचार दौऱ्यात देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे अध्यक्ष सत्यजित कदम, माजी जिल्हा परिषद सदस्य धनराज गाडे, अण्णासाहेब बाचकर, अविनाश बाचकर, दादा पाटील बाचकर, शिवाजी सागर, गोपीनाथ दुधाडे, पांडुरंग शेलार, भीमराव काकडे, बाळासाहेब काकडे, सारंग काकडे, अरुण पवार, दत्तात्रय काकडे, बापू जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शिवाजीराव कर्डिले पुढे म्हणाले,जांभूळबन, जांभळी वावरथ या आदिवासी गावांमध्ये कधीही आमदार, खासदार, मंत्री, प्रशासन आले नव्हते. मात्र मी २००९ मध्ये आमदार झालो आणि या भागाचे प्रश्न समजून घेण्यासाठी आलो.

तेव्हापासून आत्तापर्यंत या गावकऱ्यांची ऋणानुबंध कायम ठेवले आहे. शासनाच्या विविध योजना गावापर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले. गावात पहिल्यांदा तात्कालीन जिल्हाधिकारी पी. अन्बलगन यांना आणण्याचे काम केले. ढवळपुरी ते जांभूळबन रस्त्याचे काम मार्गी लावले. विजेचा प्रश्न गंभीर होता तो देखील मार्गी लावला.

#### मंत्री असूनही तनपुरेंना आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवता आले नाहीत

वावरथ जांभळी, जांभूळबन ही दुर्लक्षित गावी होती. या गावाकडे स्वातंत्र्योत्तर काळात कोणीही लक्ष दिले नाही. मात्र माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले हे राहुरी तालुक्याचे आमदार झाल्यानंतर पहिल्यांदा गावामध्ये आले आणि प्रशासनाच्या माध्यमातून विविध योजना गावापर्यंत घेऊन आले. त्यामुळे गावाला गाव पण मिळाले. राहुरी तालुक्याचे लोकप्रतिनिधी आदिवासी खात्याचे मंत्री असताना देखील आदिवासी समाजाचे प्रश्न मार्गी लावू शकले नाही. त्यांनी केलेल्या विकास कामांची यादी वाचून दाखवावी अशा आव्हान अविनाश बाचकर यांनी दिले.

#### राहुरी कारखाना पुन्हा सुरू करू: कर्डिले

तनपुरे कुटुंबियांनी सत्तेच्या माध्यमातून राहुरी तालुक्याचे वाटोळे केले. सहकारी संस्था बंद पाडण्याचे काम केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. आता राहुरी सहकारी साखर कारखाना सुरु करण्यासाठीची जबाबदारी सत्यजित कदम यांच्यावर देतो. त्यांना जी काही मदत लागेल ते केली जाईल. शेरी चिखलठाणा ग्रामस्थांनी मला २१ हजार रुपयाची निवडणुकीसाठी मदत केली ही मला २१ कोटी सारखी आहे, असे कौतुकोद्गार कर्डिले यांनी काढले.

#### गावकरीच भाजपच्या कामांची यादी वाचून दाखवत आहेत: सत्यजित कदम

राहुरी तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी गेल्या पाच वर्षांमध्ये कुठलेही विकासाचे भरीव काम केलेले दिसत नाही. मात्र गावोगावी भाजपच्या वतीने करण्यात आलेल्या विकास कामाची गावकरी यादीच वाचून दाखवीत आहेत. तालुक्यातील युवकांनी निवडणूक हाती घेतली असल्यामुळे परिवर्तन अटळ आहे. कुठल्याही भूलथापांना व अफवांवर विश्वास न ठेवता भाजपचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांना मतदान करावे असे आव्हान देवळाली प्रवारा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी केले.

## उद्धव ठाकरेंची मशाल क्रांतीची नसून घराघरात आग लावणारी!

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची बोचरी टीका



सोलापूर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षातील उमेदवारांच्या जंगीसभा होत आहेत. अशातच आज सोलापूर येथे परांडा विधानसभेचे उमेदवार तानाजी सावंत यांच्या प्रचारासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची मशाल क्रांतीची नसून घराघरात आग लावणारी आहे, अशी बोचरी टीका केली.

दूध का दूध पाणी का पाणी होऊन जाऊदे

बाळासाहेबांनी कमावलेला धनुष्यबाण उद्धव ठाकरेंनी विकून टाकला असता. बाळासाहेब यांचे विचार विकायला निघाल्यावर आम्ही उठाव करण्याचे धाडस केले, त्यावेळी तानाजीराव माझ्यासोबत खांद्याला खांदा लावून उभे होते. आम्हीच शिवसेना वाचवली आहे. बाळासाहेबांनी कमावलेल्या धनुष्यबाणाची आण-बान-शान नियतीने आपल्यावर सोपवली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीने केलेली काम बघून दूध का दूध पाणी का पाणी होऊन जाऊदेत, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

## काश्मीरमध्ये चकमक; लष्कराकडून दोन दहशतवाद्यांचा खात्मा!

जम्मू काश्मीर : मागील काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये हल्ला सुरु असल्याचे दिसून येत आहे. अशातच कालपासून उत्तर काश्मीरमधील सोपोरमध्ये सुरू असलेली चकमक आजही सुरूच होती. यामध्ये लपून बसलेल्यांपैकी दोन दहशतवाद्यांचा सुरक्षा दलांनी खात्मा केला, अशी माहिती मिळत आहे.

## रिलायन्सच्या कंपनीवर तीन वर्षांसाठी बंदी, शेअर गडगडले!

### बोगस कागदपत्र सादर करणे भोवले



मुंबई : अनिल अंबानींच्या रिलायन्स पॉवर कंपनीवर सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने कारवाई केली. निविदेत सहभागी होण्यासाठी अनिल अंबानींच्या कंपनीतर्फे बोगस कागदपत्र सादर केली गेली, यासाठी त्यांच्या कंपन्यांवर ही कारवाई होत असल्याचे निवेदन सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने दिले आहे.

त्यामुळे शुक्रवारी बाजार उघडताच रिलायन्स पॉवरच्या शेअरमध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. ३ ऑक्टोबर रोजी रिलायन्स पॉवरचा शेअर ५४ रुपयांवर गेला होता. मात्र कारवाईनंतर आता शेअरची किंमत पडली असून तो ४१.४७ रुपयांवर आला. रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स छण इएडड लिमिटेड या कंपनीला तीन वर्षांसाठी सरकारी कंपनीच्या निविदेत सहभागी होण्यापासून बंदी घातल्यामुळे आता अनिल अंबानी यांना धक्का बसला आहे.

मिंट वृत संकेतस्थळाने यासंबंधी बातमी दिली. या बातमीनुसार, महाराष्ट्र एनर्जी जेनरेशन लिमिटेड ज्याचे नाव आता रिलायन्स NU BESS लिमिटेड असे आहे. या कंपनीकडून सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या होत्या. विदेशी बँकाद्वारे अर्नेस्ट मनीसाठी जी बँक गॅरंटी देण्यात आली होती, ती बोगस असल्याचे लक्षात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने आपल्या निवेदनात म्हटले की, निविदा भरणारी कंपनी मेसर्स रिलायन्स पॉवर लिमिटेडची उपकंपनी असल्यामुळे त्यांनी मूळ कंपनीच्या ताकदीचा वापर करून आर्थिक पात्रता पूर्ण केल्या होत्या. जेव्हा या प्रकरणाची तपशीलवार तपासणी करण्यात आली तेव्हा आढळले की, रिलायन्स NU BESS ने घेतलेले सर्व निर्णय हे त्यांची पालक कंपनी रिलायन्स पॉवरच्या सल्ल्यानुसार घेतले होते.

## आळंदीत १५० वर्षे जुन्या रथातून होणार माउलींचा रथोत्सव!



पुणे : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मोत्सव सप्त शतकोत्तर वर्ष (७५० वे वर्षे) सुरू असून त्यानिमित्ताने वर्षभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन आळंदी देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. सप्त शतकोत्तर वर्षाचे औचित्य साधून आळंदी देवस्थानने भाविकांसाठी अनोखी पर्वणी उपलब्ध करून दिली आहे. दरवर्षी चांदीच्या रथातून होत असणारा हा रथोत्सव यंदा १५० वर्षे जुना लाकडी रथातून होणार आहे.

तब्बल २३ फूट उंच आणि अंदाजे १ हजार २०० किलो वजन असलेल्या या रथातून माउलींचा आळंदी शहरातून रथोत्सव पार पडणार आहे. सध्या देवस्थानकडून रथाची डागडुजी व रस्त्यावर चालण्याचा सराव सुरू आहे. यामुळे ज्या रथातून रथोत्सव सुरू करण्यात आला अशा मूळ लाकडी रथातून यंदाचा रथोत्सव पाहण्याचे साक्षीदार भाविक ठरणार आहेत. ही अनोखी पर्वणी असून, याचे स्वागत आळंदीसह राज्यभरातील भाविकांकडून होत असल्याचे दिसून येत आहे.

लाकडी रथाचे वैशिष्ट्य

इ.स. १८७३ मध्ये श्रीगुरू नरसिंह सरस्वतीस्वामी महाराज आळंदीला आले. इ.स.१८८६ ला त्यांनी आळंदीत समाधी घेतली. आपल्या ११ वर्षे आळंदीतील कार्यकाळात त्यांनी माऊलींच्या वैभवात भर टाकण्यात मोठे योगदान दिले. माउलींच्या कार्तिकी उत्सवात रथोत्सव त्यांनी सुरू केला. त्यासाठी सुरेख नक्षीकाम असलेला शिसम लाकडाचा भव्य रथ त्यांनी माऊलींसाठी बनविला. त्यातून पुढील काही दशके रथोत्सव या रथातून सुरू होता. मात्र, तत्कालीन रस्त्यांची अवस्था आणि रथाची भव्यता पाहता पुढे देवस्थानने हजेरी श्रीमारुती मंदिर चौकात भव्य रथ उभारणी मंडप बांधला व त्यात हा रथ अनेक वर्षे ठेवण्यात आला.

अलीकडे काही वर्षांपूर्वी तेथील मंडप पाडून हा रथ आळंदी-वडगाव रस्ता येथील विश्रांत वड या देवस्थानच्या बागेत भाविकांना पाहण्यासाठी संवर्धित करत ठेवण्यात आला होता. त्यानंतर आता हा रथ यंदाच्या कार्तिकी वारी सोहळ्यात रथोत्सवासाठी बाहेर काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून याबाबतची तयारीही सुरू झाली आहे.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 89- Naigaon | Rajesh Sambhajirao Pawar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 12-District Judge-2, Addl. Sessions Judge, Beed. ABC No. 3/2018 | U/s. 420, 409, 406, 471 of IPC & Sec.13C & 13 D IPC. Code Cheating in payment of dues. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | RCC Special Judicial Magistrate, Pune. RCC No. 0404255/ 2015 | U/s. 15 R/W 16 Water (Prevention and control of pollution act) (Deley obtaining EC Clearance) | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 89- Naigaon**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 111 - Gangapur | Prashant Bansilal Bumb | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Judicial Magistrate First Class Court, Gangapur. RCC No. 64/2022 Pending. | U/s. 420, 406, 467, 468, 469, 471, 472, 474, 34, 120Bof IPC. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrate, Aurangabad. CC No. 4351/2024 Pending. | U/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 111 -Gangapur**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गुंडगिरी कोण करतो हे सर्वांना ठाऊक; माझा परिवार माळकरी -अर्जुन खोतकर



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

गुंडगिरी आणि दडपशाही कोण करतो हे जालनेकारांना ठाऊक आहे. खोतकर परिवार हा निर्व्यसनी, माळकरी आणि वारकरी आहे. पंढरपूरच्या आषाढी वारीची आमच्या कुटुंबाची नियमित परंपरा आहे. ज्यांचा दिवस दुपारी १२ ला सुरू होतो आणि रात्र संध्याकाळी ०६ वाजता त्यांनी आमच्या बदनामीचा कितीही प्रयत्न केला तरी त्याचा काहीच परिणाम होणार नाही, असा टोला माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी लगावला. दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी उमेदवार खोतकर यांनी राममूर्ती ,मजरेवाडी ,शिंधी काळेगाव, साळेगाव घारे,सोमनाथ ,जळगाव तांडा, पिरकल्याण कल्याण सीड इत्यादी ग्रामीण भागातील गावाचा दौरा केला. त्यावेळी प्रचार सभेमध्ये बोलताना व मार्गदर्शन करताना खोतकर यांनी सांगितले .या प्रसंगी शिव-



सेना जिल्हासंपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, सह संपर्कप्रमुख फिरोज लाला तांबोळी, कैलास गिराम , सुधाकरराव गिराम, निवृत्ती मुळे, रहीमभाई चौधरी, गब्बर चौधरी, साळुराम गिराम, तुकाराम खर्जुले, संदीप घारे, आप्पासाहेब, आरेकर तुकाराम तुकाराम महाराज गुलगे , अशोक चव्हाण, विठ्ठल एखंडे ,राम एखंडे, राम राठोड, परमेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर माऊली पडोळे, रमेश शिंदे प्रमोद वाघमारे, शिवाजी शेळके यांच्यासह ग्रामस्थ शिवसैनिक मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सच्चे शिवसैनिक हे हिंदुत्वाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी कधीच आयुष्यात पंजाला मतदान केलेले नाही. त्यामुळे ते कुणाच्याही आमिषाला बळी न पडता धनुष्यबाणालाच मतदान करतील, असा आपला ठाम विश्वास आहे, असे अर्जुनराव खोतकर यांनी स्पष्ट केले.

जालना मतदारसंघातून आपण अपक्ष उमेदवारी दाखल केली होती. परंतु राज्यात महायुतीचे सरकार यावे यासाठी आपण आपला अर्ज मागे घेतला आहे. युतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विजयी करावे असे आवाहन भास्कर आबा दानवे यांनी जाहीरपणे केले आहे.

## संक्षिप्त

### मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची जालन्यात जाहीर सभा



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

जालना १०१ जालना विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यांच्या प्रचारार्थ दि. ११ नोव्हेंबर २०२४ सोमवारी ४.३० वा शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे साहेब यांची जालना शहरात आझाद मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. तरी या विशाल प्रचार सभेला महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी, शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.

### पिंपळगाव रे.येथील पाझर तलावातील अवैध पाणी उपसा थांबवण्यासाठी शेतकऱ्यांनी दिले तहसीलदारास निवेदन

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील गावा लगत असलेल्या पाझर तलावातील अवैध पाणी उपसा थांबण्यासाठी शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय भोकरदन येथे निवेदन देऊन पाणी उपसा करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी तहसीलदारास निवेदन द्वारे केली आहे. भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील गावा लगत असलेल्या पाझर तलावातून गेल्या अनेक दिवसांपासून सर्रास पाणी उपसा केला जात असल्याने त्याकडे संबंधित विभागाचे मात्र दुर्लक्ष होत असल्याने धरणातील पाणीसाठा कमी होत चालला असून विहिरीची पाणीपातळी खालावली आहे त्यामुळे सदरील धरणातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे इतर कोणत्याही ठिकाणी जनावरांच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने याच पाझर तलावातून सर्वस्वी अवलंबून आहे तसेच पाणी उपसा केल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरीची पाणी पातळी देखील कमी होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. या संदर्भात माननीय तलाठी यांना फोन द्वारे माहिती दिली असता त्यांनी अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच या संदर्भात संबंधित अधिकार्याकडून शेतकऱ्यांना उडवा

उडवीची उत्तरे दिले जात आहे .तसेच कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही.त्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय जालना, भोकरदन येथील तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मा.उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प. सिंचन उपविभाग भोकरदन , मा, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व संधारण उपविभाग भोकरदन, व मां जिल्हाधिकारी साहेब कार्यालय जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना, येथे प्रत्यक्ष भेटून निवेदन देऊन पाझर तलाव येथे प्रशासनाने भेट देऊन पाहणी करावी व पाण्याचा चोरी करून सुरू असलेला पाणी उपसा तातडीने बंद करून तलावातील पाणी उपसा करणाऱ्या वर कठोरात कठोर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी पिंपळगाव रेणुकाई येथील शेतकरी पुंजाजी सास्ते, फकीरा सास्ते, सुधाकर सास्ते, बाळाभाऊ आहेर, अरुण आहेर, गणेशराव खिस्ते, कमलाकर मयुरे,शंकर गुप्ता, शाम मयूरे, रमेश सास्ते, यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी निवेदन देऊन पाझर तलावातील चोरी करून पाणी उपसा करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. पिंपळगाव रेणुकाईच्या पूर्व भागामध्ये असणाऱ्या पाझर तलावातून जनावरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध असते. शिवाय या पाझर तलवामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरींना देखील पाण्याची आवक वाढते. मात्र आता या पाझर तलावातून अवैध पाणी उपसा जोरात सुरू आहे. त्यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन हा अवैध पाणी उपसा रोखावा. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.- कमलाकर मयूरे (ग्रामस्थ,पिंपळगाव रेणुकाई)

### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात प्रत्येकी ७५०० जमा -आ.बबनराव लोणीकर

# लोणीकरांची विजयाची सुत्रे घेतली जनतेनेच हाती

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.



परतूर तालुक्यातील रंगोपंत टाकळी, लिंगसा, काऱ्हाळा, लिखित पिंपरी, आकोली, ब्राम्हणवाडी, रायगव्हाण, फुलवाडी, पळसी, आनंदगाव, हास्तूर तांडा, परतवाडी, सूरमगाव, श्रीष्टी तांडा या चौदा गावात आज दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी शुक्रवारी भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिवसेना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) रयत क्रांती संघटना महायुतीचे परतूर विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदारांशी संपर्क साधून संवाद साधला यावेळी आयोजित जाहीर बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांच्या समवेत सदरील दौऱ्यात भाजपा महाराष्ट्र प्रदेश निमंत्रित सदस्य माजी आमदार विलास बापू खरात, परतूर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक आमदार संजय डीडी, भाजपा तालुका अध्यक्ष परतुर क्षत्रगुण कणसे, संपत टकले, संभाजीआप्पा वारे, रवी सोळंके, माजी सभापती माणिकराव वाघमारे, तुकाराम सोळंके, उद्धव गुंजाळ, नंदू गांजे, सिद्धेश्वर केकान, रंगनाथ येवले, बंकटराव सोळंके, काकासाहेब चौधरी, बाबाराव थोरात श्रीसर गांजाळे, मधुकर मोरे, नसरुल्ला काकड, गजानन लोणीकर, सिताराम राठोड, बाळासाहेब लहाने, अर्जुन राठोड, लक्ष्मण ठोंबरे यांची उपस्थिती. या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यावर ७५०० जमा झाले असून परतून विधानसभा मतदारसंघातील १ लाख १० हजार पेक्षा अधिक महिलांचा यामध्ये समावेश आहे महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असताना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यामुळे माता भगिनी महाविकास आघाडीला नक्कीच त्यांची जागा दाखवतील असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत महिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिली.

### लोक प्रतिनिधी हा घर फोडणारा नसावा, माणसे जोडणारा असावा -रमेश महाराज वाघ



तभा वृत्तसेवा
अंबड/घनसावंगी

येथे विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने निवडणूक लढवित अस ह.भ.प . रमेश महाराज वाघ यांनी दिनांक ६ रोजी घनसावंगी येथील त्यांच्या निवडणूक प्रचार कार्यालय पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना वाघ महाराज यांनी मीच या मतदारसंघाचा आमदार होणार असल्याचे सांगत माझा खरा प्रतिस्पर्धी या मतदारसंघाचे विद्यमान आमदार राजेश टोपे हे असून माझी खरी लढत इतर कोणत्याही उमेदवारासी नसून माझी खरी लढत ही राजेश टोपे यांच्या शी असुन काहीही झाले तरी गुलाल आपल्याच अंगावर पडणार आहे घनसावंगी विधानसभा निवडणुक लढवायची म्हणजे उंटाचा मुका घेतल्या सारखे आहे या मतदारसंघाचे विद्यमान आमदार यांनी समर्थ रामदास स्वामी यांच्या नावाने साखर कारखाना, समर्थ बॅक चालवतात परंतु त्यांना रामदास स्वामी यांच्या जन्मभुमी चा गेली पंचवीस वर्षे विसर पडला आहे तसेच या मतदारसंघात जसा शेतकरी वर्षभरात बैलाकडून शेतात काबाडकष्ट करून घेतो आणि केवळ पोळ्याच्या दिवशी त्यांची पुजा करतो अशाच प्रकारे या मतदारसंघात संत महंत मंडळीचा वापर करून घेतला जातो याच बरोबर घनसावंगी मतदार संघ हा बारामती करण्याचे नुसते आश्वासन असून बारामती ऐवजी या मतदारसंघात भानामती केल्याचे सांगितले नुसते नारळ फोडण्याचे श्रेय घेण्यामध्ये एक नंबर केवळ भुलथापां मारुन लोकांना टोप्या घालण्याचे काम गेली पंचवीस वर्षे झाली या मतदारसंघात झाली असून या निवडणुकीत रमेश महाराज वाघ हे तुम्हाला टोपी घालून विजयी झाल्याशिवाय राहणार नाही असे शेवटी पत्रकार परिषदेत बोलताना वाघ महाराज यांनी सांगितले यावेळी मानेपुरीचे माजी सरपंच शिवाजी वाघ, उपसरपंच गंजुबाबा वाघ, राष्ट्रीय समाज पक्षाचे युवक जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायसे यांची यावेळी उपस्थिती होती


(वृत्तपत्र, टीव्हीवर प्रकाशित करण्यासाठी उमेदवारासाठी
गुन्हेगारी प्रकरणांबद्दल घोषणा

(२०११ च्या....(सिव्हील) क्रमांक २३६ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ च्या निकालानुसार (पब्लिक इंटरनेट फौंडेशन आणि .... वि युनियन ऑफ इंडिया आणि.....)

उमेदवाराचे नाव आणि पत्ता : बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर)
राजकीय पक्षाने नाव : भारतीय जनता पार्टी
निवडणुकीचे नाव : विधानसभा
मतदारसंघाचे नाव : विधानसभा परतूर-९९

मी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (उमेदवाराचे नाव), वर नमूद केलेल्या निवडणुकीसाठी उमेदवार माझ्या गुन्हेगारी पूर्ववृत्तांबद्दल खालील तपशील सार्वजनिक माहितीसाठी घोषित करतो :

| अ.क्र. | प्रलंबित फौजदारी खटले | | | गुन्हांसाठी दोषी ठरलेल्या प्रकरणांबद्दल तपशील | |
|---|---|---|---|---|---|
| | कोर्टाचे नाव | प्रकरण क्रमांक आणि प्रकरणाची स्थिती | संबधित कायद्याची कलमे आणि गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन | कोर्टाचे नाव तारिख ऑर्डर | वर्णन आणि गुन्ह्याचे आणि शिक्षा |
| १) | १) निरंक<br>२) तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परभणी<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) खंडपीठ औरंगाबाद<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक | १) पो.ठा.परतूर जि.जालना (एन सी क्र.०६७/२०२४<br>२) पो.ठा.नवा मोंढा परभणी जि.परभणी (२४४, १०७/२०२०) ३) पो.ठा.नवा मोंढा परभणी जि.परभणी (३०५/२०२०)<br>४) पो.ठा.आष्टी ता.परतूर जि.जालना (३०२१/२०१४)<br>५) रिट याचिका क्रं.१७२६/२०१८<br>६) पो.ठा.सेवली ता.जि.जालना (२४९/१९९९)<br>७) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (३२७/१९९२)<br>८) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (२५/१९८६)<br>९) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (१०९/१९८५) | १) भादवी १७१ (ड) निवडणुकीत व्यक्तीमत्व संबंधी<br>२) भादवी १८८, म.पो.अ.१३५, अ.प.दा.व्यवस्थापन कायदा ५१ (ब) निवडणुकीत प्रभाव, निर्देशाचे उल्लंघन, आप्पती व्यवस्थापन कायदा कसूर<br>३) म.पो.का.१३५, भादवी १८८, २६९ सह ५१ (ब), कोविड क्रं.११, क, ३ सा.रो. आप्पती व्यवस्थापन कायदा भंग<br>४) १७१, (११) १८८ भादवी निवडणूक विषयक<br>५) निरंक<br>निरंक<br>६) भादवी १७१ (ई) आर्थिक बाबी बाबत आरोप<br>७) भादवी ३२३, ५०४ साधी दुखापत<br>८) निरंक<br>निरंक<br>९) निरंक<br>निरंक | १) निरंक<br>२) निरंक<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) निरंक<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक | १) निरंक<br>२) निरंक<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) निरंक<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक |

* राज्यपरिषदेची निवडणूक किंवा आमदारांना विधान परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत, मतदारसंघाच्या नावाऐवजी संबंधित निवडणीकाचा उल्लेख करा
टीप : (१) प्रत्येक केससाठी स्वतंत्र पत्तींमध्ये तपशील स्वतंत्रपणे द्यावा.
(२) वर्तमानपत्रातील बाबी कमीत कमी १२ च्या फॉन्ट आकारात असावी
१) ०४/११/२०२४
२) ०९/११/२०२४
३) १७/११/२०२४

स्वाक्षरीत
उमेदवाराचे निवडणुक प्रतिनिधी
सुनिल दत्तात्रय शिवनगीरीकर


# विकास कामे करणाऱ्या उमेदवारालाच आपले अमुल्य मतदान करा -आ.संतोष पाटील दानवे

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

आज भाजपा-शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार संतोष पाटील दानवे यांनी जाफ्राबाद तालुक्यातील जानेफळ (पंडित), म्हसरूळ ,घानखेडा येथे विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ मतदार बंधू-भगिनींशी संवाद साधला.



मागील दहा वर्षाच्या कार्यकाळात भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे हे ध्येय उराशी बाळगून जनतेची प्रामाणिकपणे सेवा करण्याचे काम व गोरगरिबांच्या अडचणी सोडविण्याचे काम गेल्या दहा वर्षात मतदार संघात केले आहे त्यामुळेच आपण विकास कामे करणाऱ्या आणि गरिबांच्या अडचणी सोडवणाऱ्या उमेदवारालाच मतदान करावे असे आवाहन यावेळी उमेदवार संतोष पाटील दानवे यांनी केले. पुढे बोलताना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून जनतेची आणखी प्रभावीपणे सेवा करण्याची संधी पुन्हा एकदा जनतेने द्यावी आणि हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून मला आपल्या अडीअडचणी व विकास कामे करून घ्यावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी संतोष पाटील लोखंडे, भाऊसाहेब पाटील जाधव, साहेबराव पाटील कानडजे, दगडुबा गोरे, सुधीर पाटील, राजेश म्हस्के, चंद्रकांत चौतमोल, डॉ. कैलास देशमुख, डॉ.रवींद्र कासोद, साहेबराव मोरे, गजानन लहाने, विलास इंगळे, प्रभू गाढे, केशव मकवाने, सुखदेव सपकाळ, पवन जाधव आदींसह सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य आणि भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने मतदार बंधू-भगिनींची उपस्थिती होती.

## श्रीराम सुपर १-एसआर-१४ आणि ३०३ बियाण्यांमुळे उत्तम परिणाम

मुंबई : महाराष्ट्रात गहू पिकात श्रीराम फार्म सोल्यूशन्सद्वारे विकसित 'श्रीराम सुपर १-एसआर-१४' आणि 'श्रीराम सुपर ३०३' गहू बियाण्यांनी उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. या प्रगत प्रकारांनी शेतकऱ्यांमध्ये उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हवामान परिस्थितींमध्ये अनुकूलता यांसाठी प्रसिद्धी मिळवली आहे. श्रीराम फार्म सोल्यूशन्सचे जागतिक कीर्तीचे गहू वैज्ञानिकांनी तयार केलेले गहू प्रकार, श्रीराम सुपर १-एसआर-१४ आणि ३०३, यांची अनुकूलता क्षमता आणि उत्कृष्ट उत्पादकतेमुळे शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. याचे दाणे मोठे, कठीण आणि चमकदार आहेत, तसेच याच्या गव्हापासून बनलेली पोळी उच्च गुणवत्तेची असते. आणि सर्वात विशेष बाब म्हणजे बदलत्या नैसर्गिक परिस्थितीत येणाऱ्या नवीन आव्हानांमध्येही या प्रकारांचे परिणाम उत्कृष्ट आहेत. याच वैशिष्ट्यांमुळे हे दोन्ही प्रकार भारताच्या विविध भागांतील शेतकऱ्यांची पहिली पसंती बनले आहेत.

## नवीन आउटलेटसह इझी बोबा ची उपस्थिती वाढली

पुणे- संपूर्ण भारतात पारंपारिक बबल टी अनुभव प्रदान करणारे इझी बोबा , पुण्यातील कोरेगाव पार्क या गजबजलेल्या भागात आपले नवीन आउटलेट सुरु केले आहे. हे नवीन स्टोअर, शॉप नं. ४, ए-९ बिल्डिंग, लेन नं. ७, मीरा नगर गार्डन सोसायटी येथे स्थित असून, पुण्यातील गतिमान समुदायाला विविध प्रकारचे ताजेतवाने बबल टी पर्याय उपलब्ध करून देईल.मुंबईतील नऊ यशस्वी आउटलेट्सनंतर इझी बोबा चा पुण्याकडे प्रवास म्हणजे ब्रँडच्या विस्ताराच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने इझी बोबा ने खास ऑफर सादर केली आहे: ९ आणि १० नोव्हेंबर रोजी कोणतेही पेय फक्त रु. ५० मध्ये उपलब्ध आहे.

## 'इंडिया इंटरनॅशनल ईव्ही शो' चे आयोजन

छत्रपती संभाजीनगर: वाहन निर्मिती आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांचे भारताचे केंद्र असलेल्या पुण्यात 'इंडिया इंटरनॅशनल ईव्ही शो' (आयआयईव्ही) या देशातील सर्वात भव्य ईव्ही प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ६ ते ८ डिसेंबर २०२४ दरम्यान हे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून या तीन दिवसांत नावीन्यपूर्ण संकल्पना, हरित तंत्रज्ञान आणि वाहन निर्मितीतील उत्कृष्टता अनुभवता येणार आहे. 'आयआयईव्ही' प्रदर्शनाचे हे चौथे वर्ष असून पुणे पिंपरी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे हे प्रदर्शन भरणार आहे. यामध्ये अद्ययावत, नावीन्यपूर्ण, पर्यावरणपूरक वाहतूकीसाठी उपाय आणि सातत्याने विकसित होत असलेल्या इलेक्ट्रिक वाहन उद्योगातील दूरदर्शी उपक्रमांचे प्रदर्शन केले जाणार आहे. 'आयआयईव्ही'च्या माध्यमातून उत्पादक, प्रयोगशील आणि नेतृत्वशील उद्योजकांना शाश्वत गतिशीलतेच्या विशाल क्षमतेचा शोध घेण्यासाठी भव्य व्यासपीठ निर्माण होणार आहे.

## कर्तव्यभावनेतून निर्माण झालेल्या नात्यामध्ये खरे प्रेम फुलू शकते?

हाच प्रश्न 'जाने अनजाने हम मिले' ह्या झी टीव्हीवरील आगामी प्राईमटाईम मालिकेतून प्रेक्षक स्वतःला विचारतील. रोचक अशा 'आटा साटा' लग्नाची परंपरा आजही गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये सुरू आहे. ह्या खास व्यवस्थेमध्ये एका घरातील मुलगी दुसऱ्या घरातील मुलासोबत लग्न करते आणि वराच्या बहिणीचे लग्न वधूच्या भावासोबत केले जाते, त्यामुळे परस्पर दायित्वातून घनिष्ठ कौटुंबिक बंध निर्माण होतात. ह्या परस्पर संबंधांमुळे दोन्ही जोड्यांचा आनंद आणि स्थैर्य परस्परावलंबी बनतो आणि एक नाजूक संतुलन प्रस्थापित होते ज्याचा प्रभाव दोन्ही परिवारांवर पडतो. ११ नोव्हेंबर रोजी 'जाने अनजाने हम मिले'चा प्रीमिअर होत असून झी टीव्हीवरील ही बोल्ड कथा अशा व्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या नातेसंबंधांमधील नाजूकपणाचा शोध घेते आणि त्यातील भावविश्वामध्ये अपारंपारिक पद्धतीने डोकावते.

## कलाकार सांगताहेत त्यांच्या करिअरमधील शिक्षणाबाबत

आपण आपल्या आवडत्या कलाकारांना पडद्यावर सर्वोत्तम अभिनय सादर करताना पाहतो तेव्हा वाटते की ते अभिनयासाठी जन्मले आहेत. पण, त्यांच्यापैकी अनेकांनी औपचारिक शिक्षणामध्ये तडजोड न करता रंगभूमीवर प्रखर प्रशिक्षण घेत आपली कला निपुण केली आहे. यंदा राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त एण्ड टीव्हीवरील सुप्रसिद्ध कलाकार त्यांच्या गाथा सांगण्यासोबत अध्ययनाप्रती आवड व शैक्षणिक उपलब्धींनी त्यांच्या जीवनप्रवासाला दिलेल्या आकाराबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत रवी महाशब्दे (मालिका 'अटल'), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'), हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन') आणि आसिफ शेख (मालिका 'भाबीजी घर पर है'). मालिका 'अटल'मध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे रवी महाशब्दे म्हणाले, जीवनाच्या सुरूवातीच्या टप्प्यात माझ्यामध्ये साहित्याबाबत आवड निर्माण झाली, ज्यामुळे मी कला विद्याशाखेमधून बॅचलर्स पदवी शिक्षण घेतले.

## लसीकरणाद्वारे पोलिओ रोखणे शक्य : डॉ. गणेश कुलकर्णी

छत्रपती संभाजीनगर, ८ नोव्हेंबर २०२४ : पोलिओमायलिटिसमुळे निर्माण होणारा सततचा धोका ओळखणे आवश्यक बनले आहे. मेघालयात पोलिओचा नवा रुग्ण सापडल्यामुळे नवी चिंता निर्माण झाली आहे. पोलिओचे सूक्ष्म विषाणू असतात. ते अन्न पाण्यामार्फत तोंडावाटे शरीरात येतात. दूषित पाणी हेच त्यांचे मुख्य वाहन आहे. यात हे विषाणू ६ महिनेपर्यंत जिवंत राहू शकतात. विष्ठेमार्फत हे विषाणू पाणी, जमीन वगैरेमध्ये पसरतात. याचा सर्वाधिक फटका पाच वर्षाखालील मुलांना प्रभावित करतो, ज्यामुळे पक्षाघात होतो आणि काही प्रकरणांमध्ये मृत्यूही होतो. छत्रपती संभाजीनगर येथील संजीवनी चिल्ड्रन हॉस्पिटलचे सल्लागार बालरोगतज्ज्ञ डॉ. गणेश कुलकर्णी म्हणाले की, पोलिओ लसी सुरक्षित, प्रभावी आहेत आणि त्यामुळे लाखो जीव वाचवले आहेत. पोलिओच्या अर्धांगवायूच्या परिणामांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी निष्क्रिय पोलिओ लस (आयपीव्ही) महत्त्वपूर्ण आहे. लसीकरण ६ आठवड्यांपासून सुरू होते. यामुळे सर्वोत्तम प्रतिकारशक्ती मिळते. भारताचा १२ वर्षांचा पोलिओमुक्त दर्जा हा व्यापक लसीकरण मोहिमांचा परिणाम आहे. डब्ल्यूएचओच्या मते, भारतात पोलिओ लसीचे जवळपास १ अब्ज डोस दरवर्षी दिले जात होते, जे निर्मूलनापर्यंत नेणाऱ्या अंतिम वर्षांमध्ये १७२ दशलक्ष मुलांपर्यंत पोहोचले.

# राहुरी मतदारसंघात विकासकामे आणि दांडगा जनसंपर्क कर्डिलेंना विजयाच्या दिशेने नेणार!

### प्रचारादरम्यान गावोगावी मिळतोय मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



राहुरी: राहुरी विधानसभा मतदारसंघात यंदा भाजप महायुतीचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार प्राजक्त तनपुरे यांच्यात सरळ लढत होत आहे. महायुती व मविआमधील या थेट लढतीत प्रचाराला वेग आला आहे. कर्डिले यांनी मागील निवडणुकीतील पराभव पुसुन काढण्यासाठी यंत्रणा सक्रिय केली आहे. राहुरी तालुक्यात त्यांनी जोरदार मोर्चेबांधणी करून तनपुरे गटातील अनेक नेते, पदाधिकारी कार्यकर्ते यांना भाजपमध्ये आणले आहे. या मतदारसंघात नगर तालुका व पाथर्डी तालुक्यातील गावांचाही समावेश आहे. या दोन्ही तालुक्यात कर्डिले यांचे राजकीय वजन अधिक आहे. त्यांनी संपूर्ण मतदारसंघात बेरजेचे राजकारण करण्यावर भर दिला आहे. राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम कर्डिलेंच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. याशिवाय मागील निवडणुकीत तनपुरेंसाठी ताकद लावणारे ज्येष्ठ नेते स्व.शिवाजीराव गाडे यांचे चिरंजीव धनराज गाडे यावेळी कर्डिलेंसाठी ताकद लावत आहेत. त्यामुळे यंदा मतदारसंघात मोठा राजकीय बदल पहायला मिळत आहे.

पाच टर्म आमदार म्हणून विजयी झालेल्या कर्डिले यांच्या घोडदौडीला सन २०१९ च्या निवडणुकीत ब्रेक लागला. मात्र पराभवानंतरही त्यांनी मतदारसंघात संपर्क कायम राखला. दररोजच्या जनता दरबारात सर्वसामान्य जनतेचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. याशिवाय जिल्हा बँकेच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी चांगल्या योजना राबविल्या. जिल्हा बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी विशेष योजना आणून दुध उत्पादकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला. राज्यात अडीच वर्षांपूर्वी सत्ता परिवर्तन होऊन भाजप महायुतीचे सरकार आले. राधाकृष्ण विखे पाटील जिल्ह्याचे पालकमंत्री झाले. त्यांच्या माध्यमातून कर्डिले यांनी मतदारसंघातील गावागावात विकासकामे करण्यावर भर दिला. वांबोरी चारीचा विषय मार्गी लावण्यात त्यांना यश आले. याशिवाय राज्य सरकारच्या लाडकी बहिण योजना, शेतकरी सन्मान योजना मतदारसंघात प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांनी सक्षमपणे योगदान दिले.

दहा वर्षे मतदारसंघात केलेली विकासकामे समोर ठेवून कर्डिले पुन्हा एकदा मतदानाचे आवाहन करीत आहेत.

याशिवाय भाजप महायुती सरकारच्या कल्याणकारी योजनांमुळेही ग्रामीण भागात भाजपला असलेले अनुकूल वातावरण कर्डिले यांच्या पथ्यावर पडू शकते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः राहुरी मतदारसंघात लक्ष घालत पक्षातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**नव्या सरकारमध्ये कर्डिले यांना मंत्रिपदाची संधी...**

राहुरी मतदारसंघात यंदा कर्डिले यांनी विजय मिळवला आणि राज्यात महायुतीचे सरकार आले तर कर्डिले यांना मंत्रिपद मिळेल अशी चर्चा मतदारसंघात आहे. कर्डिले यांचा अनुभव आणि दांडगा जनसंपर्क त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. याशिवाय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे सूर जुळलेले आहेत. भाजप नेत्या आ. पंकजा मुंडे यांच्याशी असलेले चांगले संबंध त्यांना राहुरी, नगर, पाथर्डी भागात मुंडे समर्थकांचा मोठा पाठिंबा मिळवून देऊ शकतात.

# आ. संग्राम जगताप यांनी विकास कामातून माणसं कमवली : अरुण काका जगताप

नगर : विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, आम्ही शहरात राबवलेल्या विकासाच्या योजना नागरिकांपर्यंत घेऊन जात असून विकासाच्या मुद्यावर निवडणूक लढवीत आहे. आमदार संग्राम जगताप यांनी विकास कामातून माणसं कमवली आहे. नागरिकांच्या सुखदुःखात सामील होऊन ऋणानुबंध जोपासण्याचे काम करत आहे. नगरकर नेहमीच चांगले काम करणाऱ्याच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहत असतात. भुतकरवाडी परिसरात मिळालेला प्रतिसाद पाहता आमचा विजय निश्चित झाला आहे. नगरकर देखील आमदार संग्राम जगताप यांना तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी देणार आहे. असे प्रतिपादन माजी आमदार अरुण काका जगताप यांनी केले. अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुती चे उमेदवार संग्राम जगताप यांनी भुतकरवाडी परिसरातील नागरिकांशी विकास यात्रेच्या माध्यमातून संवाद साधला यावेळी अरुण काका जगताप, आमदार संग्राम जगताप, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, मा. महापौर बाबासाहेब वाकळे, माजी नगरसेवक महेंद्र भैय्या गंधे, दगडू मामा पवार, रवींद्र बारस्कर, वंदना ताठे, पल्लवी जाधव, बाळासाहेब जगताप, संजय सत्रे, विलास ताठे, बाळासाहेब निकम, सतीश बारस्कर, बाळासाहेब भुजबळ, संजय खामकर, संजय भुतकर, नितीन शेलार, अरुण शिंदे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महायुती सरकारच्या माध्यमातून नगर शहरांमध्ये भरीव विकासाची कामे उभे राहत आहे. या कामासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाठपुरावा करत मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे शहरातील सर्वच भागात कामे सुरू आहे. त्यामुळे नागरिकही समाधान व्यक्त करीत आहे. विकास कामामुळे आमचा विजय निश्चित झाला आहे. अशी भावना माजी नगरसेवक महेंद्र भैय्या गंधे यांनी व्यक्त केली.

भुतकरवाडी ताठे मळा भिंगारदिवे मळा परिसरातील नागरिकांनी माझ्यावर असलेल्या प्रेमापोटी एवढ्या मोठ्या उत्साहात स्वागत केले. ते पाहून मन भारावून गेले नागरिकांनी मतरुपी दिलेल्या आशीर्वादाच्या माध्यमातून मी केलेल्या विकास कामावर शिक्का मोर्तब होत असल्याचे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

# अक्षय कर्डिले यांच्या नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे राहुरी मतदारसंघात भाजपला अनुकूल परिस्थिती !

### युवा वर्गाचे मोठे संघटन ठरणार निर्णायक...

राहुरी: राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजप महायुतीचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचाराला वेग आला आहे. यंदाच्या निवडणुकीत कर्डिलेंसाठी त्यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांनी मोठी जबाबदारी स्वीकारून गाठीभेटी वाढवल्या आहेत. मागील काही काळात अक्षय कर्डिले यांनी युवकांचे मोठे संघटन निर्माण करीत मतदारसंघात चांगली मोर्चेबांधणी केली आहे. त्याचा मोठा लाभ भाजपला होण्याची शक्यता आहे.

माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यंदाच्या निवडणुकीत चांगलेच सक्रिय झाले आहेत. वडिलांचा समाजकारणाचा वारसा पुढे नेताना त्यांनी युवा वर्गात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. मतदारसंघातील राहुरी तालुक्यासह नगर तालुका, पाथर्डी तालुक्यात त्यांनी मागील सहा महिन्यांपासून दौरे करून युवकांची फळी उभी केली आहे. स्वतः शिवाजीराव कर्डिले प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेत असताना अक्षय कर्डिले यांनी विविध घटकांशी संवाद साधत प्रचारयंत्रणा अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने सक्रिय केली आहे. सर्वांशी आपुलकीने संवाद साधत त्यांनी मतदार जोडण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

राहुरी येथे अक्षय कर्डिले यांनी केलेल्या भाषणाचीही चर्चा होत आहे. वडिलांनी कायम जनतेसाठी वेळ दिला. मी २८ वर्षांचा झालोय. पण या काळात वडील नेहमीच मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेसाठी सक्रिय आहेत. प्रसंगी कुटुंबियांना वेळ न देता वडील जनतेसाठी आपला वेळ खर्च करतात. आजही हीच जनसेवा



**अक्षय कर्डिले यांचा साधेपणा मतदारांना लावतोय**

युवा नेते म्हणून अक्षय कर्डिले यांचा साधेपणा, सर्वांशी आपुलकीने संवाद साधण्याची हातोटी सर्वसामान्य जनतेला भावत आहे. निगर्वी स्वभाव व समाजकारणावर अधिक भर देत असल्याने त्यांच्या प्रती जनतेतून आपुलकीची भावना वाढत आहे. युवा वर्गाला त्यांनी मोठ्या प्रमाणात संघटीत करून प्रचारात सक्रिय केले आहे. त्याचे अतिशय दृष्य परिणाम निवडणुकीच्या निकालात पहायला मिळतील अशी चर्चा रंगली आहे.

**मतदार करणे प्रत्येकाचा हक्क आहे!**

# सत्ता दिल्यास ४८ तासात मशिदीवरचे भोंगे काढून दाखवतो : राज ठाकरे



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.७ ऑक्टोबर : आपण जी भूमिका मांडतो त्यावर अखेरपर्यंत कायम असतो, आपल्या हातात राज्याची सत्ता दिल्यास ४८ तासाच्या आत सर्व मशिदीवरील भोंगे काढायला लावतो ,अन्यथा राज ठाकरे हे नाव नाही सांगणार नाही ,असे प्रतिपादन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी गुरुवारी केले.

वरळीतील मनसेचे उमेदवार देशपांडे यांच्या प्रचारासाठी आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा परप्रांतीयांचा व हिंदुत्वाचा मुद्दा आक्रमकपणे मांडत मतदारांना आवाहन केले. ते म्हणाले की, 'संपूर्ण शहराचा विचका झाला आहे. कोणाचं लक्ष्य नाही. मागे रजा अकादमीचा मोर्चा निघाला होता. आझाद मैदानावर त्यांनी चॅलेनच्या ओबी व्हॅन फोडून टाकल्या. पोलीस भगिणीवर हात टाकले. त्या मोर्च्याच्या विरोधात कोणीही उठले नाही. फक्त मनसेने मोर्चा काढला. त्यावेळी एक कमिश्नर होते. ते सांगत होते ते काहीही करतील पण तुम्ही हात नाही उचलायचा. मग दांडके कशाला दिलेत गरबा खेळायला.'

एकदा सत्ता द्या नाही यांना सडकून काढले तर सांगा. मौलवी फतवे काढताय बघा काय वेळ आली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री कसे झाले माहितीये सगळ्यांना. काही विचारधाराच राहिलेली नाही. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर शिवसेनेच्या होर्डिंगवरचं बाळासाहेबांच्या नावापुढचं हिंदुहृदयसम्राट काढून टाकले होते. काही होर्डिंगवर तर जनाब बाळासाहेब ठाकरे आले. आज ते हयात असते तर एकेकाला फोडून काढले असले. त्याच उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेबाबत मौलाना फतवा काढत आहेत. सगळ्या मुस्लिमांनी एकत्र येऊन महाविकासआघाडीच्या पारड्यात मत टाकावी. सत्ता हातात दिल्यावर पहिल्या ४८ तासाच्या हातात सगळ्या मशिदीवरचे भोंगे काढून टाकेल. तुम्ही शांत बसता, थंड बसता, रागावत नाहीत म्हणून ही माणसं शेफारली. तुमची मतं विकली गेली. ज्यांच्यावर विश्वास टाकला ते दुसऱ्यासोबत निघून गेले. हे सगळे रोखायचे असेल तर मनसेच्या उमेदवारांना निवडून दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

# कुटे डेअरीची ३३३ कोटींच्या मालमत्ता जप्त

### ईडीची सातारा ,अहमदनगर कारवाई

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि ८ऑक्टोबर.: ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील गुंतवणूक फसवणुकीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी)मेसर्स कुटे सन्स डेअरी लिमिटेडची सातारा व अहमदनगरातील ३३३ कोटी ८२ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. टाच आणण्यात आलेल्या मालमत्तेत मेसर्स कुटे सन्स डेअरी लिमिटेडची आणि मेसर्स कुटे सन्स फ्रेश डेअरी प्रायव्हेट लिमिटेडची सातारा व अहमदनगर येथील जमीन, इमारती, प्रकल्प आणि मशीन यांचा समावेश असल्याची माहिती गुरुवारी ईडीकडून देण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत ५२ पेक्षा जास्त शाखा आहेत. त्याचे व्यवस्थापन आणि नियंत्रण सुरेश ज्ञानोबा कुटे, यशवंत व्ही. कुलकर्णी आणि अन्य संबंधित होते. विविध ठेव योजना आणून त्यांनी १२ ते १४ टक्क्यांपर्यंत व्याज देण्याचा दावा केला. वैयक्तिक कर्ज, साधे कर्ज, पगार कर्ज, मुदत कर्ज, सुवर्ण कर्ज आणि एफडीआर कर्ज अशा विविध योजना सुरू केल्या. आरोपी सुरेश कुटे आणि संबंधितांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या (डीएमसीएसएल) माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी अनेक गुंतवणूक योजना राबविल्या. त्यात चार लाख गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली होती.तपासानुसार, या प्रकरणी २,४६७ कोटी ८९ लाख रुपये इतरत्र वळवण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर, कुटे यांच्या विरोधात फसवणुकीचे नऊ गुन्हे दाखल झाले. याप्रकरणी ईडीने आतापर्यंत एकुण १४३३ कोटी ३० लाखाच्या मालमत्ता जप्त केली

## एसर प्रीडीएटोर (लॅपटॉप) स्टोअर्स सायबर पेरिफेरल प्रा.लि.चा प्रोझोन मॉल येथे शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - मुंबई, पुणे नंतर छत्रपती संभाजीनगर येथे एसर गेमिंग स्टोअर्सचा शुभारंभ नुकताचा झाला. येथे प्रिमियर लॅपटॉप खेळण्यासाठीही उपलब्ध आहे. इंजिनिअरींग विद्यार्थी, डिजीटल मार्केटिंग करणारे, व्यावसायिक वापरकर्ते यांच्यासाठी खास लॅपटॉप उपलब्ध आहेत. तसेच गेमिंग झोनचा मोफत अनुभव घेण्यासाठी एकदा शोरूमला आवश्यक भेट द्यावी असे संयोजकांनी आव्हान केले. लॅपटॉप रू.४०,९९९ ते ३ लाखांपर्यंत उपलब्ध आहे. याप्रसंगी एसरचे निरजकुमार, लंगोटी गेमिंग मास्टर शंतनु, सायबर पेरिफेरलचे संचालक प्रमोद डेरे, पारस ओस्तवाल, राजेश पाटणी, आनंद सोनी, मनोज बोरा, ओमप्रकाश अग्रवाल, अमित खांबिया, विनोद डेरे व राहुल जैन उपस्थित होते.

## सुस्साट वाहनचालकांवर काढला जालीम तोडगा!

मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. महामार्गावरून प्रवास करताना वाहतूक नियम मोडल्यास दंडात्मक कारवाई तर होतेच, पण आता त्याची अंमलबजावणी अत्यंत कठोरपणे होणार आहे. मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरून दररोज लाखो वाहने जात असतात. चालक बेदरकारपणे वाहने हाकतात. 'अतिघाई, संकटात नेई', वाहने सावकाश हाका, असं आवाहन ठिकठिकाणी करण्यात येते. पण त्याकडे सर्रासपणे दुर्लक्ष केले जात आहे. वाहनचालक कानाडोळा करून वाहने सुसाट नेतात. वाहनांचा अतिवेग आणि बेदरकारपणे ड्रायव्हिंग करणे ही खूप मोठी समस्या आहे. कारण यामुळे अपघातांच्या घटनांना आपसुकच निमंत्रण मिळते.



| अ. क्र. | | | |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

| (ब) | | |
|---|---|---|
| १ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 102-Badnapur | Narayan Tilakchand Kuche | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble District Judge-1 And Addl. Sessions Judge, Jalna. SC No. 262/2023 Pending. | U/s. 143, 149, 188, 447, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act, u/s.11 Maharashtra State Statue Defacement Act . | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 102 - Badnapur**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# कुटेवर मोठी कारवाई; ३३३ कोटींच्या मालमत्ता जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी घोटाळा प्रकरणी ईडीच्या (सक्तवसूली संचालनालय) मुंबई कार्यालयाने ज्ञानराधा व सुरेश कुटे व अन्य व्यक्तींच्या ३३३ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत.ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळा प्रकरणी जिल्ह्यात ४९ गुन्हे नोंद आहेत. सध्या ज्ञानराधाचा अध्यक्ष सुरेश कुटे, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी व अन्य कोठडीत आहेत.



राज्यासह इंदौर अशा ५० शाखा असलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को - ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीत पावणेचार लाख ठेवीदारांचे तीन हजार कोटी रुपयांहून अधिक ठेवी आहेत. ठेवीदारांच्या फसवणूक पकरणी जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांसह जालना, संभाजीनगर आदी ठिकाणी सुरेश कुटे व अन्य संचालकांसह अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंद झाले आहेत. सध्या सुरेश कुटे, यशवंत कुलकर्णी आदी कोठडीत आहेत.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या बीडच्या पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने सुरेश कुटेसह अन्य नातेवाईक आणि ज्ञानराधा तसेच त्याच्या कुटे समुहाच्या पाच हजार कोटी रुपयांच्या मालमत्तांचा शोध घेऊन त्या अटॅच केल्या आहेत. मात्र, ज्ञानराधातून परदेशात पैसा नेल्याने आणि परदेशी गुंतवणूक कुटे समुहात येण्याच्या मुद्द्याने आता ईडीनेही या प्रकरणात लक्ष घातले आहेत. यापूर्वीही ईडीने त्याच्या संपत्तीवर जप्तीची कारवाई केली होती.

आता सुरेश कुटेच्या कुटे डेअरी, कुटे सन्स फ्रेश डेअरी या कंपन्यांच्या जमिनी, इमारती, प्रकल्प आणि मशिनरी असा सातारा व अहमदनगर जिल्ह्यात संपत्ती जप्त केली आहे. यापूर्वी ईडीने दि. १० ऑक्टोबर रोजी १००२ कोटी ७९ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली होती. त्यावेळी जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये मुंबई, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना येथील काही इमारती आणि भूखंडांचा समावेश होता.सप्टेंबर महिन्यात ईडीने सोसायटीची ८५ कोटी ८८ लाख रुपयांची अचल मालमत्ता जप्त केली होती. यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि बीड येथील काही फ्लॅट, कार्यालयांची जागा आणि भूखंड आदींचा समावेश होता. आतापर्यंत सोसायटीची एकूण १०७९ कोटी ८७ लाख रुपयांची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे. सुरेश कुटेने २३१८ कोटी रुपयांचा अपहार करत ते पैसे आपल्या अन्य कंपन्यांत कर्ज रूपाने वळविल्याचा ठपका ईडीने ठेवला आहे. हे पैसे नंतर रोखीने काढून घेत त्याद्वारे त्यांनी वैयक्तिक मालमत्तांची खरेदी केली.

# पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी संगीता ठोंबरे यांनी कंबर कसली

## साठे व ठोंबरे यांच्या संयुक्त दौऱ्याला होत आहे गर्दीच गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ नोव्हेंबर**

केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीतून उमेदवारी माघारी घेतल्यानंतर आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यांच्यावर राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्षाची जिम्मेदारी मिळतात पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासाठी माजी आमदार संगीताताई ठोंबरे ह्या मतदारसंघात आपल्या जिवाचे रान करताना दिसून येत आहे. बीड जिल्ह्याचे खा. सोनवणे यांच्या उपस्थितीत माजी आ. संगिता ठोंबरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी ठोंबरे यांना पक्षाच्या वतीने मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांची निवड होतात त्यांनी केज विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारासाठी चांगली कंबर कसली आहे त्यांनी मतदारसंघातील अनेक गावांना भेटी दिल्या आहेत

# शासनाची उदासीनता: माजलगाव मतदारसंघातील ऊसतोड कामगारांच्या दयनीय परिस्थितीची तीव्रता

## मतदानाच्या हक्काची खिल्ली उडवणारी परिस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.८ नोव्हेंबर**

माजलगाव मतदारसंघात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने सुरू झाली आहे. या मतदारसंघात माजलगाव, वडवणी आणि धारूर तालुक्यांचा समावेश आहे. सध्या सर्वत्र प्रचाराची चहलपहल पाहायला मिळत असून, राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी जोरदार तयारी करत आहेत.

विशेषत: धारूर आणि वडवणीमध्ये भौगोलिक परिस्थितीमुळे या भागाला गेल्या ४- ५० वर्षांपासून लागलेला ऊसतोड कामा मधील कलंक अजूनही दूर झाला नाही. प्रत्येक वर्षी येथे ६० ते ७० टक्के लोक ऊसतोड काम करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात आणि कर्नाटकमध्ये जातात. हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे की, या प्रदेशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार असूनही, त्यांच्या रोजगाराच्या शोधात बाहेरच्या राज्यात जाणं त्यांच्या हक्कांवर पडत आहे.

सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होत आहेत आणि या निवडणुकीची प्रक्रिया दर पाच वर्षांनी सुरु होते. प्रशासनाने मतदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी लाखो



रुपये खर्च केले आहेत, ज्यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शाळा,जाहिराती, भाषण स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा गणपती महोत्सव मध्ये देखावे, महाविद्यालयांमध्ये मतदानाचे महत्त्व क्लिप दाखवले जाते. तरीही, या सर्व प्रयत्नांनंतरही, धारूर व वडवणीमधील लोकांचे ऊसतोड कामाच्या शोधात बाहेर जाणे थांबत नाही, हे अत्यंत चिंताजनक आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे, ऊसतोड कामगारांना खाजगी मुकदम ऊस तोडण्यासाठी मजबुरीने नेतात या अन्यायावर नियंत्रण ठेवणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य आहे. कामगारांचे हक्क, स्वातंत्र्य आणि रोजगार संरक्षण करून, त्यांना स्थानिक पातळीवर आर्थिक स्थिरता संधी दिली पाहिजे.जर या समस्यांचे समाधान झाले तर कामगारांना दिलासा मिळेल आणि स्थानिक आमदारांसाठी योग्य उमेदवारांची निवड करणे शक्य होईल. लोकशाहीतील मतदानाचा हक्क बजवण्यासाठी आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. एकंदरीत, जर प्रशासन वेगाने आणि प्रभावी उपाययोजना राबवित असेल तरच माजलगाव, धारूर आणि वडवणीचा विकास साधण्याचा मार्ग सुकर होईल. ऊसतोड कामगारांच्या भलेमोठ्या संख्येने बाहेर जाण्याच्या बाहेर काढण्यासाठी आणि त्यांच्या अधिकारांची सुरक्षितता करण्यासाठी प्रशासनात गरज आहे. या निवडणुकीमध्ये, लोकशाहीवर विश्वास ठेवून, योग्य उमेदवारांची निवड केली जाईल.

# ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या सभेस हजारोच्या उपस्थित रहा-शेख मंजूर


**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ नोव्हेंबर**

दलित,वंचित,मुस्लिम,गोरगरीब मराठा,बहुजन यांचा बुलंद आवाज असणारे बाळासाहेब (प्रकाश)आंबेडकर यांची जाहीर सभा रविवार दि.१० रोजी दुपारी एक वाजता जुना मोंढा मैदान माजलगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.या एल्गार सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजूर यांनी केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते ऍड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या (जोशोबा महासंकल्प)जाहीर सभेस विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. माजलगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर हे वंचित बहुजन आघाडी कडून माजलगाव विधानसभेचे उमेदवार आहेत.पक्ष प्रवेश केल्यानंतर अल्पावधीत त्यांनी मतदारसंघात पक्षाचे विचार दलित,मुस्लिम,गोरगरीब मराठा, बहुजन समाजापर्यंत नेण्याचे काम केले आहे.निवडणुकीच्या रणधुमाळीत पक्षाचे वातावरण निर्माण केले आहे.दरम्यान मतदार संघात बहुरंगी लढत होत आहे.या लढतीत प्रकाश आंबेडकर यांच्या रविवार दि.१० रोजी होणाऱ्या जाहीर(जोशोबा महासंकल्प सभेने) वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.त्यामुळे या जाहीर सभेत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार शेख मंजूर यांनी केले आहे.

# जनी जनार्दन,थोरले पाटांगण येथे वार्षिक उत्सवास आजपासून प्रारंभ







**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

प्रतिवर्षाप्रमाणे जनार्दन थोरले पाटांगण येथे वार्षिक उत्सवास दिनांक नऊ नोव्हेंबर शनिवार पासून प्रारंभ होत आहे. गेल्या चारशे चोवीस ,(४२४)वर्षापासून अखंड आणि अविरतपणे हा उत्सव सुरू आहे. दिनांक नऊ नोव्हेंबर रोजी शनिवारी सकाळी ठीक सहा पासून सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण सुरु होणार आहे. दिनांक १० नोव्हेंबर रविवारी सकाळी ठीक साडे सात वाजता बहुसोमयाज्ञी यज्ञ मार्तंड यज्ञेश्वरजी श्री सेलुकर महाराज यांच्या शुभहस्ते अग्नीमंथन होईल आणि दुपारी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ठीक साडे चार वाजता श्री सुक्त हवन होणार आहे.

दिनांक ११नोव्हेंबर रोजी सोमवार पासून दररोज श्री जनी जनार्दन महाराज यांच्या पादुकांना महा अभिषेक सेवा,आणि चार वेदांच पारायण सेवा होणार आहे. दिनांक १६नोव्हेंबर रोजी शनिवारी सकाळी ठीक नऊ वाजता महंत महामंडलेश्वर डॉ.अमृताश्रम स्वामी महाराज यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन होईल. आणि दुपारी एक ते पाच या वेळेत महा प्रसादाचे आयोजन केले आहे. दिनांक १७नोव्हेंबर रोजी रविवारी सकाळी श्री विनायक महाराज पाटांगण कर यांचे काल्याचे कीर्तन होईल आणि प्रसाद वाटप होऊन उत्सवाची सांगता होईल. तरी जनी जनार्दन संस्थान थोरले पाटांगण येथील होणाऱ्या सर्व कार्यक्रमास सर्व शिष्य मंडळी, आणि थोरले पाटांगण वर प्रेम करणाऱ्या भक्तांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे अशी श्री विनायक महाराज पाटांगणकर ,थोरले पाटांगण आणि सर्व पाटांगणकर परिवार यांनी विनंती केली आहे.

# अंबाजोगाईत सामुहिक श्रीसूक्त हवन

## योगेश्वरी मंदिरात महिलांचा मोठा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ नोव्हेंबर**

येथील माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीतर्फे गुरुवारी (दि.७) सायंकाळी योगेश्वरी मंदिरात परमपूज्य यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक श्रीसूक्त हवन झाले. यात महिला भाविकांनी मोठा सहभाग घेतला.

सायंकाळी ५ वाजता यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराजांचे आगमन झाले. आचमन, प्राणायाम, संकल्प व प्रार्थना होऊन या श्रीसूक्त हवनास प्रारंभ झाला. महाराजांच्या वाणीतून हवनाच्या मंत्रासोबत उपस्थित सर्व भाविकांनी प्रज्वलित केलेल्या अग्निकुंडात हवन केले. भक्तिमय वातावरणात एक तास हे श्रीसूक्त हवन सुरू होते.

राष्ट्रभावनेची शिकवण - सोमराज

अग्नी हे देवाचे मुख आहे. या यज्ञकुंडात आहुती देणे म्हणजेच देवाला जेवण देणे असेच असते. या श्रीसूक्त हवनाने आरोग्याबाबतच राष्ट्र भावना जोपासण्याची शिकवण दिल्याचे सोमराज सेलूकर यांनी सांगितले. या श्रीसूक्त हवनातील संस्कृत मंत्राचा अर्थ सांगून मानवजातीच्या आरोग्यासाठी ते महत्वाचे असल्याचेही ते म्हणाले.

सामुहिक श्रीसूक्त हवनासाठी लागणारे साहित्य व साधणे आयोजकांनी उपलब्ध केले होते. यात ४०० महिला व इतर भाविकांनी सहभाग घेतला. माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीने सेलूकर महाराजांचे स्वागत केले. पेशवा महिला संघटनेतर्फेही महाराजांचा सत्कार झाला.

# दहा वर्षांत एकाही विरोधी कार्यकर्त्यांची व त्यांच्या कामाची कधीच अडवणूक केली नाही - आ.लक्ष्मण पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ नोव्हेंबर**

मतदारसंघातील जनतेने दोन वेळा सेवा करण्यांची संधी दिली, या काळात मी विकास कामे करताना कोणत्याच गावच्या बाबतीत हेवा दावा न करता प्रामाणिक काम केले. तसेच या दहा वर्षाच्या आमदारकीच्या काळात मतदारसंघातील एकाही विरोधी गटातील कार्यकर्त्यांची अथवा त्यांच्या कामाची कधीच अडवणुक केली नसल्याने या सर्व जनतेचे आशीर्वाद आपल्यालाच मिळतील असा विश्वास आ. लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केला.



गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणूक प्रचारार्थ कुरणपिप्रि, बोरगाव, नवे बोरगाव, मालेगाव खु., मालेगाव बु., गायकवाड जळगाव, उमापुर, बोरी पिंपळगाव,यासह परिसरातील अनेक गावात जाऊन मतदारांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

यावेळी जे.डी.शहा, आबेद पटेल, राजेंद्र भंडारी, शाम कुंड, दादासाहेब गिरी, याहिया खॉन, अरविंद जाधव, विजय डरपे, ऍड.सुरेश पवार, प्रकाश गाडे, महेश चेके,बंडु गवारे, विश्वास निंबाळकर, चेअरमन गंगाधर, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले कि, विरोधकांकडे निवडणुकीत मत मागायला जाताना कुठलेच मुद्दे नाहीत, निवडणुकीच्या तोंडावर नुसते नारळ फोडून खोटी आश्वासने द्यायचे अन निवडणूक संपली की पाच वर्षे मतदारांचे तोंडही बघायचे नाही ही त्यांची जुनीच प्रथा आहे. निवडणुकीत लोकांना दमदाटी करून विजय मिळवता येते नाही तर त्याससाठी काम करावं लागतं असा टोला आ.लक्ष्मण पवार यांनी विरोधकांना लागावला. या निवडणुकीत आपण दहा वर्षात गावागावात केलेल्या विकास कामाच्या जोरावर सामोरे जात आहोत. त्यामुळे गेवराई तालुक्यातील सुज्ञ मतदार आपल्यालाच आशीर्वाद देणार असल्याचे विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. तर मागील दहा वर्षात आपण विरोधी गटातील एकाही कार्यकर्त्याची अडवणूक करून त्यांना त्रास दिला नाही म्हणून आज त्यांच्या रूपाने आपल्या पाठीशी एक मोठी अदृश्य शक्ती उभा असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी सांगितले.

त्यांच्या प्रचार दौऱ्याला ग्रामीण भागात मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युनुस पठाण,संदिप कु-हाडे,विनोद गोर्डे,दत्तात्रय पवार, भरत खराद,विनोद खराद,मधुकर खराद,पंकज गंगाधर, भगवान दुधसागर,बबलु गरड,दिपक औटे,रणजीत औटी,भास्कर गंगाधर, महादेव गंगाधर, मधुकर गंगाधर, महादेव गंगाधर, काकासाहेब काकडे महाराज,माऊली जाधव, किशोर जाधव,मोहन काका जाधव, भरत जाधव,दादासाहेब जाधव, रावण जाधव, शिवाजी कोकाटे,शिवाजी जाधव, अनिल जाधव, सत्यजित जाधव, विनायक जाधव,जिजा नलावडे ,अनिल लिबोरे,नारायण सुपेकर, आय्युब शेख,रवी जाधव आदि उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील राजकारणाचे समीकरणे बदलणार

## आ.संदीप क्षीरसागरांसाठी आज शरद पवार साहेब बीडला

**पवार साहेबांच्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा-आ.क्षीरसागर**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**



बीड जिल्ह्याच्या राजकारणाची सर्व समीकरणे बदलणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे अध्यक्ष महाविकास व इंडिया आघाडीचे प्रमुख नेते खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या बीड जिल्ह्यात सभा होणार आहेत. आपल्या सर्व उमेदवारांसाठी पवार साहेब 'वारं फिरविणार' आहेत. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान एकनिष्ठ आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासाठी खा.शरद पवार आज शनिवारी (दि.९) रोजी बीड शहरात जाहीर सभा घेणार आहेत. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

आ.संदीप क्षीरसागर यांनी केली सभा स्थळाची पाहणी

शुक्रवार दि.८ नोव्हेंबर रोजी सभास्थळी जावून स्वत: पाहणी करून नियोजनाचा आढावा घेतला. सभेचे नियोजनात कसलीही कसर राहणार नाही याची दक्षता स्वत: आ.संदीप क्षीरसागर घेत आहेत.

# देशाचे नेते शरद पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-ॲड.कल्पनाताई देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ नोव्हेंबर**

परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, काँग्रेस, शिवसेना उबाटा प्रणित महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष देशाचे मा.कृषी मंत्री खा. शरद पवार यांच्या जाहीर सभेचे परळीत आज दि.९ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या विराट सभेस महाविकास महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तसेच परळी विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या परळी शहराध्यक्ष ॲड.कल्पनाताई सतीशराव देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष देशाचे मा. कृषिमंत्री खा. शरद पवार यांची ९ नोव्हेंबर रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे दुपारी १ वा. जाहीर सभा होणार आहे. महाविकास आघाडीचे परळी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ होणाऱ्या जाहीर सभेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा महिला आघाडी खा.फौजिया खान, बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर, परळी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख, केज विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासह पक्षाचे नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. परळी शहरात होणाऱ्या या सभेसाठी परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष, काँग्रेस व मित्र पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी तसेच परळी विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला आघाडी परळी शहराध्यक्ष ॲड.कल्पनाताई सतीशराव देशमुख यांनी केले आहे.

# महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठका



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठकांचा धडाका लावला आहे. त्यांना प्रत्येक प्रभाग व वार्डावार्डातून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारादरम्यान त्यांनी काझी नगर, बाळराजे नगर, झमझम कॉलनी आदी परिसरात बैठका घेतल्या. डॉ.योगेश यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी आहे. त्यांनी कधीही गुंडगिरी किंवा गुंड प्रवृत्तीला थारा दिला नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या, डॉ.योगेश हे उच्च विद्याविभूषित व्यक्तीमत्व असून त्यांच्याकडे विकासात्मक कामाची दृष्टी आहे. आजवर त्यांनी बीड विधानसभेच्या कार्यक्षेत्रात अनेक कामे केली.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप पथक तैनात

तभा वृत्तसेवा

कन्नड : लोकसभा निवडणुकीच्या वेळी काही मतदान केंद्रावर ५०% पेक्षा कमी मतदान झाले होते अशा मतदान केंद्रावर या वेळी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी कन्नड स्वीप पथकाच्या वतीने ग्रामीण भाग,वस्ती व तांड्यावरील विविध मतदान केंद्र तसेच मतदारांच्या भेटी घेण्यात येत आहेत. मतदार जनजागृतीचा भाग म्हणून नागद, पांगरा,भोपेवाडी तसेच नागद तांडा या परिसरात स्वीप पथकाच्या वतीने जोरदार प्रयत्न निवडणुक अधिकारी संतोष गोरड सहाय्यक निवडणूक अधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहेत. या परिसरातील अनेक मतदार हे ऊसतोड कामगार आहेत, ऊसतोडीला जाण्याआधी मतदानाचे कर्तव्य पूर्ण करावे असे आव्हान स्वीप सदस्य प्रवीण दाभाडे यांनी केले,यावेळी भाऊसाहेब सोननिस दीपक सोनवणे यांचे बीलओ एस डी वारूळे, संभाजी पाटील, विशाल महाजन,ए.डी.पाटील राम कोळी,पी.आर.धोंडकर आदी उपस्थित होत.

## मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद

छत्रपती संभाजीनगर, दि.८ : विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया बुधवार दि.२० नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. ही प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी मतदानाच्या दिवशी म्हणजेच बुधवार दि.२० नोव्हेंबर रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्यात यावे, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्गमित केले आहेत.


## सौ.कविता कोथिंबीरे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .८ नोव्हेंबर सौ. कविता दिगंबर कोथिंबीरे वय ४० वर्ष रा. माळी गल्ली बिडकीन ता .पैठण यांचे दि .७ रोजी दु:खद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर आज दि .८ शुक्रवार रोजी दुपारी चार वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आली त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, देर, सासू ,असा मोठा परिवार आहे बिडकीन शिवसेना सर्कल प्रमुख दिगंबर तुळशीराम कोथिंबीरे यांच्या पत्नी होत्या.

## भरत शिंनगारे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.८ नोव्हेंबर सोयगाव तालुक्यातील मोलखेडा येथील भरत कडूबा शिंनगारे (वय.४८) यांचे दि.७ गुरुवार रोजी सायंकाळी वेळ ७:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वा.मोलखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,नातवंडे,असा परिवार आहे.ते समाधान काळे व योगेश काळे यांचे पाहुणे होत.

## चंद्रभागाबाई बाराहाते यांचे निधन



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.८ : तालुक्यातील पिंप्री येथील रहिवासी चंद्रभागाबाई भानुदास बारहाते वय ८० यांचे गुरुवारी (दि.०७) रोजी सायंकाळी सात वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले त्यांच्यावर पिंप्री येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली असा परिवार आहे. गंगापूर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बद्रीनाथ पाटील बाराहाते यांच्या त्या मातोश्री होत.

## १०८-औरंगाबाद(पश्चिम);चार मतदान केंद्रांचे ठिकाण तर पाच मतदान केंद्रांच्या नावात बदल

छत्रपती संभाजीनगर, दि.८(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १०८ औरंगाबाद(पश्चिम) विधानसभा मतदार संघातील चार मतदान केंद्रांचे ठिकाण व पाच मतदान केंद्रांचे नावात बदल करण्यात आला असून या बदलास निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे असे निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी यांनी कळविले आहे.

**ठिकाणात बदल झालेले मतदान केंद्र**

१. मतदान केंद्र क्रमांक १७८ पुर्वीचे केंद्र प्रगती विद्यालय पडेगाव खो.क्र.१ पूर्व बाजू ऐवजी आता इंडो माईंडस प्रेस्कूल पडेगाव खोली क्रमांक १ मध्ये असेल.

२. मतदान केंद्र क्रमांक १७९ पुर्वीचे प्रगती विद्यालय पडेगाव खो.क्र.२ पूर्व बाजू ऐवजी आता इंडो माईंडस प्रेस्कूल पडेगाव खोली क्रमांक २ मध्ये असेल.

३. मतदान केंद्र क्रमांक २४१ पुर्वीचे तलत उर्दू माध्यम प्रा. शा. शहानूर वाडी खोली क्रमांक १ पूर्व बाजू ऐवजी आता इंडोब्रेन्स प्रेस्कूल , प्रतापनगर खोली क्रमांक १ मध्ये असेल.

४. मतदान केंद्र क्रमांक २४२ पुर्वीचे तलत उर्दू माध्यम प्रा. शा. शहानूर वाडी खोली क्रमांक २ पुर्व बाजू ऐवजी आता इंडोब्रेन्स प्रेस्कूल प्रतापनजगर ,खोली क्रमांक २ मध्ये असेल.

**नावात बदल झालेले मतदान केंद्र**

१. मतदान केंद्र क्रमांक १७ पुर्वीचे नाव सह्याद्री टेक्निकल इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्स खो.क्र.१ पूर्व बाजू ऐवजी आता माता रमाबाई आंबेडकर महिला विधी कॉलेज, वाळुज महानगर-१, खोली क्रमांक १ असे असेल.

२. मतदान केंद्र क्रमांक १८ पुर्वीचे नाव सह्याद्री टेक्निकल इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्स खो.क्र.२ पूर्व बाजू ऐवजी आता माता रमाबाई आंबेडकर महिला विधी कॉलेज, वाळुज महानगर-१, खोली क्रमांक २ असे असेल.

३. मतदान केंद्र क्रमांक १९ पुर्वीचे नाव सह्याद्री टेक्निकल इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्स खो.क्र.३ पश्चिम बाजू ऐवजी आता माता रमाबाई आंबेडकर महिला विधी कॉलेज, वाळुज महानगर-१, खोली क्रमांक ३ असे असेल.

४. मतदान केंद्र क्रमांक २० पुर्वीचे नाव सह्याद्री टेक्निकल इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्स खो.क्र.४ पूर्व बाजू ऐवजी आता माता रमाबाई आंबेडकर महिला विधी कॉलेज, वाळुज महानगर-१, खोली क्रमांक ४ असे असेल.

५. मतदान केंद्र क्रमांक २१ पुर्वीचे नाव सह्याद्री टेक्निकल इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्स खो.क्र.५ पश्चिम बाजू ऐवजी आता माता रमाबाई आंबेडकर महिला विधी कॉलेज, वाळुज महानगर-१, खोली क्रमांक ५ असे असेल.

असे १०८- औरंगाबाद पश्चिमचे निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी यांनी कळविले असून अधिक माहितीसाठी त्यांचे कार्यालय शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## छटपूजा उत्सवाला उत्साहात सुरुवात, सूर्याला दिले अर्घ्य

छत्रपती संभाजीनगर : छटपूजेच्या उत्सवाचा शहर परिसरात उत्साह दिसून येत आहे. छटपूजा व्रतामध्ये महिला ३६ तास उपवास करून मनोभावे पूजा करतात. कार्तिक शुक्ल चतुर्थीपासून छठ उत्सव सुरू होतो आणि कार्तिक शुक्ल षष्ठीच्या दिवशी मावळत्या सूर्याला अर्घ्य देण्याची प्रथा आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी उगवत्या सूर्याला अर्घ्य दिल्यावर छटपूजा पूर्ण झाली असे मानले जाते.

ही परंपरा यंदाही कायम असून, गुरुवारी, ७ रोजी सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी सूर्याला अर्घ्य देण्यात आले. उद्या, शुक्रवारी सकाळी सूर्यास्ताला सूर्याला अर्घ्य देऊन पूजा करण्यात येणार आहे. त्यामुळे या उत्सवाची सर्वत्र जोरदार तयारी सुरू आहे.

छटपूजेचा उपवास कुटुंबाच्या हितासाठी आणि बालकांच्या आरोग्यासाठी केला जातो. यामध्ये उपवास करणाऱ्या महिलांना अनेक तास पाण्यात उभे राहून सूर्याला अर्घ्य द्यावे लागते. त्यासाठी सर्वत्र तयारी देखील करण्यात आली आहे.

छटपूजा देवळाई, बजाजनगर, रामलीला मैदान, गणेश विश्वकर्मा मंदिर बाळापूर, सिडको एन-८ अयोध्यानगर यासह रांजणगाव वाळूज या ठिकाणी जोरदार तयारी करण्यात आली आहे. रांजणगावात भाजपा उत्तर भारतीय मोर्चा आयोजित छट पूजा कार्यक्रमात उत्तर भारतीय मोर्चाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमात उपस्थित राहून ग्रामपंचायत शेणपूंजी रांजणगाव परिसरात छटपूजा करण्याचे आवाहन उत्तर भारतीय नागरिक तसेच कैलाश यादव, राजेश सिंह, मनोज तिवारी, अरुण गोंडब, रमेश गिरी, प्रमोद सिंग, अमोघ प्रजापती, राम कुमार, सूर्यभान माळी, राजेश कुशवाह, राजाराम यादव, बच्चा सिंह, शिव शंकर भरतध्वाज, अरविंद सिंह, उपेंद्र श्रीवास्तव, प्रदीपसिंग, प्रमोद सिंग, सुनील सिंग, धर्मेंद्र प्रसाद, अजय सिंग, राजेश कुंवर, बहादूर सिंग, जयकुमार बाजपेयी, राजेश सुनील सिंग, पार्थनाथ सिंग, रमेश शर्मा, वैद्यनाथ दास, कोषाध्यक्ष महेंद्र पाठक, राहुल सिंग, सुरेंद्रसिंग ढेक, अनिलकुमार सिंग, अजय राजपूत आदींनी केले आहे.

या गोष्टींकडे द्या लक्ष

छटपूजेत स्वच्छता आणि शुद्धतेची खूप काळजी घेतली जाते. महिलांनी स्वच्छ धुतलेले कपडे घालावेत आणि पूजेसाठी नैवेद्य देण्यापूर्वी जागा व्यवस्थित स्वच्छ करावी तसेच ज्या ठिकाणी पूजा करायची आहे, ती गंगाजलाने शुद्ध करावी. छठ पूजेच्या वेळी भोग आणि प्रसाद बनवताना साधे मीठ वापरू नका, फक्त खडे मीठ घालावे. या काळात आंघोळीनंतर घरातील महिलांनी केशरी रंगाचा शेंदूर रोज लावावा. पूजा करताना सूर्य आणि छठी मातेला दूध अर्पण करावे. पूजेमध्ये फाटलेली किंवा जुनी टोपली वापरू नका. नेहमी स्वच्छ आणि नवीन टोपलीने पूजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सफाई कामगारांचे काळ्या फिती लावून काम ठेकदार मनमानी करीत असल्याचा आरोप

छत्रपती संभाजीनगर : महापालिकेच्या कंत्राटी सफाई कामगारांना ऐन दिवाळीत ठेकेदाराने पगार दिला नाही. ठेकेदारांच्या मनमानीमुळे कामगारांवर काळी दिवाळी करण्याची वेळ आली. कामगारांनी ऐन दिवाळीत शहरवासीयांना बेठीस न धरता, काळ्या फिती लावून काम करत निषेध केला. शहरातील सफाईचे काम पी. गोपीनाथ रेड्डी कंपनी दिलेले आहे. रेड्डी कंपनीच्या सफाई कामगारांना मागील दोन महिन्यापासून वेतन मिळालेले नाही. किमान दिवाळीत वेतन मिळेल, अशी अपेक्षा नसताना केवळ दीड हजार रुपये बोनस देऊन कामगारांची बोळवण करण्यात आली. कामगारांनी आपला संताप व्यक्त करण्यासाठी काम बंद आंदोलनाचाही पवित्रा घेतला, मात्र कचऱ्यांच्या प्रश्नांमुळे शहरवासियांच्या आनंदावर विरजण पडेल, या विचाराने संघटनांच्या नेत्यांनी दिवाळीला काळ्या फिती लावून काम करुन कंपनीचा निषेध केला. मात्र, त्यानंतरही कामगारांचे वेतन मिळाले नाही. परिणामी या कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात गेली. ठेकेदारांमुळे दिवाळी सण अंधारात गेला, अशी खंतही कामगारांनी व्यक्त केली.

## कपड्याचे दुकान फोडले

छत्रपती संभाजीनगर : सेव्हन हिल परिसरातील टिंबरवाला टॉवर कॉम्प्लेक्स येथे असलेले कपड्याचे दुकान फोडून चोरट्याने ६७ हजार रुपये किंमतीचे कपडे लंपास केले. याप्रकरणी जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील हनुमानलाल कालानी रा. महेशनगर जालना रोड यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ५ ते ६ नोव्हेंबर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी टीमरेवाला टॉवर कॉम्प्लेक्स कालानी किड्स हब दुकान दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला. ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

## नीळ, शाईच्या गोदामाला आग

छत्रपती संभाजीनगर : घाटी रुग्णालयाजवळील प्रगती कॉलनीत असलेल्या नीळ, शाई, स्पंज साहित्याच्या गोदामाला गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास आग लागली. दोन अग्निशमन बंबाद्वारे आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन विभागाला यश आले..

घाटी बुद्धविहाराजवळील शेजारील प्रगती कॉलनी येथे नीळ, शाई, स्पंज, साहित्याचे खोके असलेले आठशे चौरस फुटांचे सचिन अंभोरे यांचे गोदाम आहे. याठिकाणी वीज जोडणी नव्हती. बंद गोदामामधून दुपारी तीनच्या सुमारास धूर निघू लागला. तोच परिसरातील नागरिकांना अग्निशमन विभागाला तीन वाजेच्या सुमारास फोन केला.

अग्निशमन विभागाचे दोन बंब घेऊन इन्चार्ज लक्ष्मण कोल्डे, दीपराज गंगावणे, फायरमन दीपक गाडेकर, अजिंक्य भगत, संग्राम मोरे, किसन घाडगे, छत्रपती केकान, दिनेश मुंगसे, उमेश भोसले, त्र्यंबक सावंत, वाहनचालक प्रशांत गायकवाड, जगदीश सलामबाद घटनास्थळी पोचले.

त्यांनी अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले. स्पंज असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले होते. बघ्यांची गर्दीही यावेळी जमली होती. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाट नाही. या आगीत एक ते दीड लाख रूपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती अग्निशमन दलाच्या वतीने देण्यात आली. या प्रकरणाची नोंद बेगमपुरा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## महायुतीला तिसऱ्यांदा संधी द्या : अतुल सावे

### शहराच्या निरंतर विकासासाठी महायुला मतदान करा..

छत्रपती संभाजीनगर :- शहराच्या पूर्व मतदारसंघातील नागरिकांनी महायुतीला साथ देऊन शहराचा निरंतर विकास साधावा, असे आवाहन महायुतीचे उमेदवार श्री अतुल सावे यांनी केले. गुरुवारी कैलास नगर येथील वार्ड क्रमांक ५६ संजय नगर मध्ये पदयात्रा काढत नागरिकांच्या भेटीदरम्यान ते बोलत होते. संजयनगरमधील स्मशान मारुती मंदिरापासून सुरू झालेल्या या पदयात्रेत श्री सावे यांनी मतदारांसोबत भेट घेत, संवाद साधत विकासकार्याची माहिती दिली.



२०१४ आणि २०१९ मध्ये आपण माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात आणि मतदारसंघाचा विकास करण्याची संधी दिली. या काळात रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण आणि आरोग्य सुविधा उभारण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. मात्र, हा विकास निरंतर ठेवण्यासाठी आणि अधिक प्रगती साधण्यासाठी आपण तिसऱ्यांदा महायुतीला पाठिंबा द्यावा, असे श्री सावे यांनी मतदारांना सांगितले.

महायुतीला पुन्हा निवडून देऊन शहराच्या प्रगतीला गती देण्याची संधी आहे, असेही ते म्हणाले. नागरिकांनी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करून विकासाची गती थांबू नये यासाठी कटीबद्ध होण्याचे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी अनिल मकरीये, शिवाजी दांडगे, मनोज बल्लाळ, सखाराम पोळ, नागेश भालेराव, रामचंद्र जाधव, मयूर सोनवणे, चंद्रकांत हिवराळे, संगीता सांगळे, सुप्रियाताई चव्हाण, मंगल ताई कस्तुरे, दिनेश कावळे, विनोद पवार, बाळासाहेब महाडजे, मनोज सरिन, वसंत देशमुख, योगेश महानोर धीरज वर्मा, निखिल महाले, किशोर लोखंडे, शाहू पाटणी, दशरथ मानवतकर, यादवराव सूर्यवंशी, सुरेंद्र विरगावकर, आनंद लोखंडे, भाऊसाहेब अवचारमल, सोनू परदेशी, भीम धरमे, केदार बनसोड, कृष्णा मोहिते, राजेश गादिया, सागर वाडेकर, रितेश बरविकर, यश वाघ, सुमित बावचिवार, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

वार्ड क्रमांक ६२ मथुरा नगर आणि वार्ड क्रमांक ६३ आविष्कार कॉलनी येथे पदयात्रा

पूर्व मतदार संघातील वार्ड क्रमांक ६२ मथुरा नगर आणि वार्ड क्रमांक ६३ आविष्कार कॉलनी येथे गुरुवारी काढण्यात आलेल्या पदयात्रे दरम्यान ते नागरिकांशी बोलत होते.

पुढे त्यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर शहराचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी, विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि प्रगतीला नवीन आयाम देण्यासाठी महायुतीला सशक्त पाठबळ देणे आवश्यक आहे. महायुतीच्या माध्यमातून महाराष्ट्रात अभूतपूर्व विकासाच्या संधी निर्माण होत आहेत. शासनाच्या धोरणांमुळे पायाभूत सुविधांचा विकास, आणि रोजगाराच्या नवीन संधी यांसारख्या अनेक महत्वपूर्ण विषयांवर लक्ष केंद्रीत केले जात असल्याचे श्री अतुल सावे यांनी सांगितले.

यावेळी अभिजीत देशमुख, शिवाजी दांडगे, किरण पाटील, किशोर शितोळे, दत्ता भांगे, नागेश भालेराव, नितीन खरात, अरुण पालवे, हुशार सिंग चव्हाण, नारायण अण्णा सुरगनेवार, गणेश तेलोरे, अरविंद कामटीकर, विजय शिंदे, बद्रीनाथ ठोंबरे, अविनाश पवार, सौरभ तोतरे, मयूर वंजारी, दिगंबर खरात, अजित प्रसाद, सरिता घोडतूरे, लक्ष्मी गायकवाड, प्रवीना राजपूत, विद्या गायकवाड, छाया हरपाले, शुभांगी दाभाडे, संगीता राऊत, आशा वानखेडे, राहुल बोरोले, सचिन चव्हाण, दीपक शिंदे, अनिल बर्डे, शुभम पवार, किशोर शेळके, महेश राऊत, चेतन राठोड, मार्टिन दास, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

## अवैध दारु सह साडे चार लाखाच्या मुद्देमाल जप्त

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची कार्यवाही

तभा वृत्तसेवा

दि ८ नोव्हेंबर : डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रसाद सुर्वे सह आयुक्त (अ.व.द.), राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई, . संगीता दरेकर विभागीय उप-आयुक्त रा.उ.शु. छ. संभाजीनगर . संतोष झगडे साहेब, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, छ. संभाजीनगर गुणाजी क्षिरसागर उप- अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर यांचे मार्गदर्शना खाली विधान सभा २०२४ च्या आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने दि ०६ नोव्हेंबर रोजी गुन्हा अन्वेषन कामी गस्तीवर असतांना निरीक्षक. ऋषिकेश फुलझळके, राज्य उत्पादन शुल्क एफ विभाग छत्रपती संभाजीनगर यांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने निलजगाव फाटा बिडकीन ता पैठण वाहन तपासनी दरम्यान वाहन चालक अशोक दत्तात्रय रकटे वाहन क्रमांक एमएच-१६-बीएच-६४५६ पांढऱ्या रंगाची मारूती सुझुकी कंपनीची ब्रीझा चारचाकी वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनामध्ये देशी दारू भींगरी संत्राची १८० मी.ली. क्षमतेच्या एकूण ९६ सिलबंद दारु बाटल्या, विदेशी दारू मॅकडॉल नं. ०१ व्हीस्कीच्या १८० मी. ली. क्षमतेच्या एकूण ४८ बाटल्या, दोन कागदी खोक्यामध्ये टुबर्ग स्टाँग बिअर ६५० मी.ली. क्षमतेच्या २४ सिलबंदी बाटल्या व वाहन, ताब्यात घेण्यात आले मुद्देमालाची एकूण किंमत ४,५४,०८०/- रू. ऐवढी आहे.सदर प्रकरणी आरोपी अशोक दत्तात्रय रकटे यांचे यांचे विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम चे कलम ६५ (अ) (ई) अन्वये निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क एफ विभाग छ. संभाजीनगर या कार्यालयात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक . ऋषिकेश फुलझळके यांचेसह दुय्यम निरीक्षक गोकुळ कंखरे. पोपट टकले, बाबुराव खुरासने सहाय्यक दुय्यम निरीक्षक प्रविण पुरी, जवान शारेक कादरी यांनी केली. सदरील गुन्ह्याचा तपास निरीक्षक ऋषिकेश फुलझळके हे करीत आहेत.

## सर्वांनी मोठ्या संख्येने लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

### जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली एमजीएम रेडिओवरती मुलाखत

छत्रपती संभाजीनगर, दि.८ : आपल्या देशाची लोकशाही समृद्ध असून लोकशाही जिवंत आहे तर आपण जिवंत आहोत. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदारांनी मतदान करणे आवश्यक आहे. लोकशाहीचा महोत्सव सुरू झालेला असून यामध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग घेत इतरांना मतदान करायला प्रेरित केले पाहिजे. माझा जिल्ह्यातील सर्व मतदारांवर विश्वास असून बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी ते निश्चितपणे मोठ्या संख्येने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत विक्रमी मतदान करून लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होतील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी केले.

आज एमजीएम रेडिओ ९०.८ एफएम तर्फे महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ जनजागृतीपर कार्यक्रमात जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या विशेष मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एमजीएम रेडियोचे केंद्रप्रमुख सुनिल शिरसिकर यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी दिली.



पुढे बोलताना जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले, सध्या सार्वत्रिक निवडणुकीचे वातावरण सुरू आहे. आपल्या या जिल्ह्यामध्ये एकूण ९ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३२७३ मतदान केंद्रे आपण तयार केलेले आहेत. जिल्हाभरामध्ये जे मतदान हक्क बजावू शकतात असे जवळजवळ ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत. यामध्ये जवळजवळ १६ लाख ६३ हजार हे पुरुष असून १५ लाख ३९ हजार ४२१ या महिला मतदार आहेत. भारत निवडणूक आयोगाने लोकसभेच्या वेळेस पासूनच ज्यांचे वय ८५ पेक्षा जास्त आहे अशा मतदारांना आणि जे दिव्यांग आहेत; अशा मतदारांना मतदान केंद्रापर्यंत जाण्याचा त्रास होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी होम वोटिंग'ची व्यवस्था केलेली आहे. आपल्या जिल्हाभरामध्ये ८५ पेक्षा जास्त वयाचे ४० हजार ४६९ मतदार असून २७ हजार ६७१ मतदार हे दिव्यांग आहेत. या ६८१४० मतदारांपैकी केवळ ४४२४ मतदारांनी आपल्या घरून मतदान करण्यास मंजूरी दिली आहे. बाकी सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण जिल्ह्यामध्ये आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होत असून मला खात्री आहे की, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही अंमलबजावणी अशाच पद्धतीने राहील. आचारसंहिता ही या काळामध्ये राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनाच आहे असे नाही तर मीडिया, अधिकारी, प्रिंटिंग प्रेस अशा सर्वांसाठीच एक नियमावली आयोगाने घालून दिलेली आहे. यामध्ये निवडणूक आयोगाचा उद्देश असा आहे की, जे सर्वसामान्य नागरिक आहेत त्यांना त्यांना मतदान प्रक्रियेत कुठलाही त्रास होता कामा नये. तसेच त्यांना मतदान मुक्त वातावरणामध्ये मतदान करायला मिळावे, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले, आपला देश स्वतंत्र झाला त्यावेळेस झालेल्या पहिल्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी आणि आताच्या मतदान टक्केवारीमध्ये खूप फरक आहे आणि याच पद्धतीने जर टक्केवारी घसरत गेली तर ते अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढवावी यासाठी भारत निवडणूक आयोग सातत्याने प्रयत्न करत आहे. आम्ही आमच्या पातळीवर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत असून त्यामध्ये आम्हाला यश मिळेल असा विश्वास मी व्यक्त करतो.

मुलाखत संपन्न झाल्यानंतर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी एमजीएम विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीस भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने व रेडियोचे केंद्रप्रमुख सुनिल शिरसिकर उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना महात्मा गांधी मिशनची गृहपत्रिका असलेल्या 'गवाक्ष' या नियतकालिकेच्या दिवाळी अंकाची भेट दिली.

**गोपीनाथ मुंडे यांचा बालेकिल्ला असलेला बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात कधी गेला, हे भाजपला कळलेच नाही. लोकसभा मतदारसंघावर भाजपचे वर्चस्व होते, ते ही आता संपले. विधानसभा, जिल्हा परिषदेसह अन्य सत्तास्थाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात होती. फोडाफोडी करून जिल्हा परिषद भाजपने ताब्यात घेतली होती. या जिल्ह्यामध्ये आता विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सहा प्रमुख पक्षांपैकी काँग्रेस आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे नामोनिशाण राहिलेले नाही.**

# बीडमधून हात आणि धनुष्यबाण गायब

एके काळी मित्रपक्ष असलेल्या भाजपने शिवसेनेची ताकद हळूहळू घटवत पक्षाचा 'वाघ' बीडच्या पिंजऱ्यात कैद केला होता. आता या एकमेव जागेवरही नव्याने मित्रपक्ष झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने कब्जा केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर ताकद क्षीण झालेल्या काँग्रेसची परळीतील एकमेव जागादेखील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने कायमची आपल्याकडे घेतली. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेचा 'बाण' आणि महाविकास आघाडीतील ५ठा पक्ष काँग्रेसचा 'पंजा' या विधानसभा निवडणुकीत नाही. १९८५ मध्ये युतीची स्थापना झाली. तेव्हा जिल्ह्यामध्ये रेणापूर, चौसाळा, केज, माजलगाव, आष्टी, गेवराई आणि बीड हे सात मतदारसंघ होते. सुरूवातीला भाजपला केवळ दोन तर शिवसेनेला पाच जागा असत. पुढे भाजपने कोकण किंवा मुंबईची जागा शिवसेनेला द्यायची आणि शिवसेनेची जिल्ह्यातील एकेक जागा आपल्याकडे घ्यायची, असा शिरस्ता सुरू केला. सरतेशेवटी युतीमध्ये केवळ बीड शिवसेनेकडे आणि उर्वरित सर्व विधानसभा मतदारसंघ भाजपकडे असे चित्र झाले. गोपीनाथ मुंडे यांच्या काळामध्ये बीडच्या शिवसेनेचे कंट्रोलही त्यांच्याकडेच असत. दरम्यान, दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली, तर वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून एक पक्ष महायुतीमध्ये सहभागी झाला. अगोदर एका मित्राने शिवसेनेच्या वाघाला जेरबंद केले होते. आता दुसऱ्या मित्रानेही या वाघाच्या पिंजऱ्यालाच आपल्या कैदेत घेतले आहे. महायुतीमधील बीडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने पदरात पाडून घेतली आहे. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसने ज्या पक्षाचा आमदार त्या पक्षाचा उमेदवार, असे सूत्र मांडून कब्जा केला असला, तरी येथील आमदार मुळात त्यांच्या पक्षात नाही, हे विशेष. एकनाथ शिंदे राजकारणातील मुत्सद्दी मानले जातात; मात्र एखाद्या जिल्ह्यामध्ये त्यांच्या पक्षाचे चिन्हच निवडणुकीमध्ये नसतानाही त्यांची ही सैल भूमिका शिवसैनिकांचे खच्चीकरण करणारी आहे. शिवसेनेप्रमाणेच काँग्रेसचीही गत झाली आहे. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस स्थापनेनंतर जिल्ह्यातील काँग्रेसचे सर्व तत्कालीन दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. खासदार रजनी पाटील, अशोक पाटील, राजकिशोर मोदी, पंडितराव दौंड अशी मोजकी मंडळी काँग्रेसमध्ये थांबली. नंतर आघाडी स्थापन झाल्यानंतर जिल्ह्यातील पाच जागा राष्ट्रवादी काँग्रेसला तर परळीची जागा काँग्रेसला असे. मागच्या निवडणुकीत तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने ही जागाही आपल्या पदरात पाडून घेतली. आताही या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असलेल्या राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली; मात्र ती तुतारी चिन्हाची. त्यामुळे आता विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचे चिन्ह नसणार आहे.

**लक्षवेधी लढत**

बीडसह जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील चित्र स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून लोकसभा निवडणुकांमधील यशाचा आधार घेत आणि अपयशाला पाठीशी टाकत राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यातच थेट सामना होणार आहे. काही ठिकाणी मनसे आणि वंचितसह इतर पक्षही रिंगणात आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये तीस जागांवर विजय मिळवणारी महाविकास आघाडी तर १७ जागांवर विजय मिळवणाऱ्या महायुतीमध्ये लढाई आहे; मात्र मराठा आरक्षणाचा मुद्दा अद्यापही पूर्णतः निकालात न निघाल्याने मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठवाड्यात लोकसभा निवडणुकांमध्ये मनोज जरांगे पाटील इम्पॅक्ट दिसून आला. त्यात, बीड लोकसभा मतदारसंघामध्ये बीडचा खासदार बदलण्यातही मराठा आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. त्यामुळे, आता बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये काय घडामोडी घडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरत आहे. जरांगे स्वतः बीड जिल्ह्यातील आहेत. बीड जिल्ह्यामध्ये वंजारी विरुद्ध मराठा असा टोकाचा संघर्ष सुरू आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारी देतानाही जात या घटकाचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे.





मराठवाड्यातील कायम चर्चेत असणाऱ्या परळीमध्ये यंदा एकूण ११ उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून प्रामुख्याने अजित पवार गटाचे धनंजय मुंडे आणि शरद पवार गटाचे राजेसाहेब देशमुख या दोघांमध्ये प्रमुख लढत होणार आहे. त्यात येथे पवार गटाच्या नेत्याने उमेदवारी न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली. पवार गटातील वाद इतका उफाळून आला होता, की उमेदवारी न मिळालेल्या नेत्याच्या समर्थकांनी पवार यांचे पोस्टर फाडले. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रशासनासह पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. परळी मतदारसंघ हा राज्याच्या राजकारणात पहिल्यापासूनच केंद्रबिंदू राहिलेला आहे. या निवडणुकीत येथील मतदारसंघात पहिल्यांदाच महायुतीमुळे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे या दोघा बहिण भावात लढत होणार नाही; मात्र राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना रंगणार आहे. परळी मतदारसंघातील १२२ मतदान केंद्र संवेदनशील आहेत आणि याच मतदान केंद्रावर निवडणूक विभागासह पोलिस प्रशासनाची करडी नजर असणार आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान बूथ कॅप्चरिंगचा प्रकार समोर आला होता. विधानसभा निवडणुकीमध्ये हा प्रकार टाळण्यासाठी निवडणूक विभाग सज्ज आहे. संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रशासनाची नजर असणार आहे.

बीड जिल्ह्यावर पहिल्यापासून दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडेंचा दबदबा राहिला आहे, त्यानंतर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्याकडे जिल्ह्याचे नेतृत्व आले. बीड विधानसभा मतदारसंघामध्ये ओबीसी विरुद्ध मराठा असा सामना पाहायला मिळू शकतो. क्षीरसागर भावांमध्ये लढत होणार असून यात जरांगे फॅक्टरदेखील परिणामकारक ठरू शकतो. जरांगे पाटील यांनी आवाहन करूनदेखील अनिल जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे क्षीरसागर व्यतिरिक्त अनिल जगताप आणि ज्योती मेटे यांचे बंड कायम आहे. जगताप हे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आहेत; मात्र पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून त्यांनी बंडखोरी केली.

■■■





# मंदा म्हात्रे यांच्यासाठी नाईकांची 'व्यवस्था'!

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे नवी मुंबईतील शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांची बंडखोरी कायम असताना महायुतीत बेलापूर विधानसभेतील राजकीय समीकरणांचा विचार करण्यात आला आहे. बेलापूर मतदारसंघामध्ये भाजप नेते गणेश नाईक यांचे माजी आमदार पुत्र संदीप हे शरद पवार यांच्या पक्षातून निवडणूक रिंगणामध्ये आहेत. संदीप यांचा हा निर्णय भाजपसह शिंदे यांनाही पटलेला नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मंदा म्हात्रे यांच्यामागे संपूर्ण ताकद उभी करण्याचा निर्णय शिंदे-फडणवीस यांनी घेतला आहे. गणेश नाईक हे ऐरोलीत अडकून पडतील अशी 'व्यवस्था' करण्यात आली आहे.**

शिवसेनेमध्ये बंड झाल्यानंतर विजय चौगुले हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. नवी मुंबईतून शिंदे यांच्या बंडाला साथ देणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये चौगुले यांचा समावेश होता. शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद आणि पुढे शिवसेना हा पक्ष येताच त्यांनी नवी मुंबईतील पक्षाचे जिल्हाध्यक्षपद चौगुले यांच्याकडे सोपवले. सत्तेच्या सावलीत राहणे चौगुले यांच्यासाठीही सोयीचे असल्याने तेही शिंदे यांना घट्ट धरून राहिले. शिंदे यांच्या मदतीने चौगुले यांनी गेल्या पाच वर्षात नवी मुंबईमध्ये आपले आर्थिक साम्राज्यही बऱ्यापैकी उभे केले आहे. मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतले असते तर त्यांना चौगुले यांचे बंड थोपवणे सहज शक्य होते. यासंबंधी ठाण्यातील काही नेत्यांनी चौगुले यांच्याशी चर्चाही केली; परंतु आपली उमेदवारी मंदा म्हात्रे यांच्यासाठीही कशी सोयीची ठरेल हे पटवून देण्यात चौगुले यशस्वी ठरल्याचे समजते. तसेच 'गणेश नाईक यांनी मुख्यमंत्र्यांकडे विनंती केल्यास मी माघार घेईन', असा निरोपही चौगुले यांनी मुख्यमंत्र्यांकडे पोहचवला होता; मात्र नाईक यांनी या आघाडीवर कोणतीही हालचाल केली नसल्याने चौगुले यांच्यावर मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षित दबाव थेट कारवाई करण्यात आलेली नाही. भाजप नेत्यांकडून यासाठी फारसा दबाव नाही. नवी मुंबईतील ऐरोली विधानसभा क्षेत्रातील प्रभावी नेते तसेच माजी नगरसेवकांनाही 'चौगुले यांना मदत करू नका' असा कोणताही संदेश दिला गेलेला नाही हे विशेष. ऐरोली मतदारसंघातील बंडाविषयी आतापर्यंत कोणतीही भूमिका घेत नसलेले शिंदेसेनेचे नेते बेलापूरमध्ये मात्र मंदा म्हात्रे यांच्यासाठी जोर बैठका काढण्याची तयारी करत आहेत. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी बेलापूरच्या मोहिमेवर निघावे आणि तेथील पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र्य बैठक घ्यावी अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. संदीप नाईक यांच्या उमेदवारीमुळे नाराज असलेल्या महाविकास आघाडीतील नेत्यांना गळाला लावण्यासाठी पक्षाची वरिष्ठ पातळीवरील यंत्रणा कामाला लागल्याचे सांगितले जाते. काँग्रेसचे नवी मुंबईतील जिल्हाध्यक्ष अनिल कौशीक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राजू शिंदे यांना पक्षात घेताना भाजपच्या ठाणे, डोंबिवलीतील नेत्यांना सक्रिय केले गेल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, ही मोहीम फत्ते करत असताना बेलापूरच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांनाही दूर ठेवले आहे.

**राज्य वार्तापत्र**

भाजप नेत्यांना नवी मुंबईमध्ये गणेश नाईक कुटुंबीयांच्या ताकदीची पूर्णपणे जाणीव आहे. संदीप नाईक यांनी बेलापूरमधून बंडखोरी करत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करताच भाजपच्या या भागातील २५ पेक्षा अधिक नगरसेवकांनीही त्यांच्यासोबत तुतारी हाती घेतली. २०१४ नंतर नवी मुंबईतील काही उपनगरांमध्ये भाजपचा प्रभाव वाढला आहे. वाशी सेक्टर १७ सारख्या गुजरातीबहुल भागामध्ये भाजपला मोठे मताधिक्य मिळते. या भागातील संपत शेवाळे, विजय वाळुंज यासारखे माजी नगरसेवकदेखील संदीप नाईक यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. बेलापूर मतदारसंघामध्ये आगरी समाजाचा एक मोठा मतगड्डा आहे. या समाजातील एका मोठ्या घटकावर नेरुळ भागातील क्रिकेट मैदानाच्या जागेचे आरक्षण बदलण्यावरुन झालेल्या वादाचा मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भाजपच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांना ही निवडणूक आव्हानात्मक मानली जात आहे. हे लक्षात घेऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी बेलापूरमधील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून या भागातील महाविकास आघाडीतील नाराजांना थेट गळाला लावण्याची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष हाती लागत असल्याने स्थानिक नेत्यांना याची कल्पना शेवटपर्यंत देण्यात आली नव्हती. अखेरच्या क्षणी उमेदवार मंदा म्हात्रे आणि पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांना या प्रक्रियेची कल्पना दिली गेली. ऐरोली मतदारसंघामधून भाजपच्या तिकीटावर रिंगणात असलेले गणेश नाईक यांना याची कोणतीही खबरबात लागणार नाही याची दक्षता घेतली गेली होती.



मंदा म्हात्रे

टाकण्यात आला नाही.

म्हात्रे यांना बेलापूर विधानसभा क्षेत्रातून उमेदवारी देताच संदीप नाईक यांनी बंडाचा निर्णय घेतला. बेलापूर मतदारसंघामधून आपण इच्छुक असल्याचे संदीप यांनी चार महिन्यांपूर्वीच जाहीर केले होते. त्यांनी पक्षाच्या काही नेत्यांपर्यंत 'मला टोकाचा निर्णय घ्यायला भाग पाडू नका' असा निरोपही पोहचवला आहे. 'जिल्हाध्यक्ष म्हणून माझे काम पाहा. हवे तर विद्यमान आमदाराच्या कामाशी त्याची तुलना करा', असेही संदीप यांचे म्हणणे होते. त्यानंतरही भाजपने म्हात्रे यांना उमेदवारी देताच संदीप यांनी शरद पवार यांच्या पक्षाची तुतारी हाती घेण्याचा निर्णय घेतला. या घटनाक्रमामुळे भाजप नेते कमालीचे दुखावले आहेत. ऐरोलीमधून भाजपकडून गणेश नाईक यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. राज्यातील सध्याची राजकीय गणिते लक्षात घेता भाजपने त्यास हरकत घेतली नसली, तरी गणेश नाईक ऐरोलीत एक भूमिका घेतात आणि त्यांचा मुलगा याच मतदारसंघाला जोडून असलेल्या दुसऱ्या मतदारसंघामध्ये वेगळी भूमिका घेतो. यामुळे भाजपच्या गोटातही अस्वस्थता आहे. गणेश नाईक यांना ऐरोलीतून निवडणूक अगदीच सोपी झाली, तर त्याचा परिणाम बेलापूरातही दिसू शकेल अशी शक्यता शिंदेसेनेच्या काही नेत्यांनी मुख्यमंत्र्यां५ा कानावर घातली होती. 'गणेश नाईकांना मोकळे सोडणे योग्य होणार नाही. शिवाय ते आपल्या पदाधिकाऱ्यांशी साधा संवादही साधू इच्छित नाहीत' असेही मुख्यमंत्र्यांना पटवून देण्यात आले. ऐरोलीमुळे बेलापूरचे गणितही भाजपसाठी कठीण होऊ शकते हे लक्षात येताच म्हात्रे यांच्याशी सल्ला मसलत करुनच पुढील पावले उचलली गेली. बंड केल्याबद्दल चौगुले यांच्यावर

■■■

**जळगाव जिल्ह्यातील रावेर मतदारसंघ वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. काँग्रेसकडून आमदार शिरीष चौधरी यांचे पुत्र धनंजय चौधरी तर, त्यांच्या विरोधात भाजपचे दिवंगत माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे पुत्र अमोल जावळे रिंगणात आहेत. काँग्रेस आणि भाजपने रावेरमध्ये प्रथमच चौधरी आणि जावळे परिवाराच्या युवा राजकीय वारसदारांना संधी दिली आहे.**

# चौधरींची चौथी पिढी लढतीमध्ये

शिरीष अमोल जावळे यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये रावेरमधून उमेदवारी मागितली होती; मात्र त्या वेळी भाजप पक्षश्रेष्ठींनी विधानसभेच्या उमेदवारीचे आश्वासन देऊन त्यांची समजूत घातली होती. ठरल्यानुसार जावळे यांना भाजपने रावेरमधून विधानसभेसाठी उमेदवारी दिली असून, ते वडिलांच्या निधनानंतर पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुकीला सामोरे जात आहेत. अमोल हे भाजपच्या पूर्व भागाचे म्हणजेच रावेर लोकसभा मतदारसंघ क्षेत्राचे जिल्हाध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांचा रावेर मतदारसंघामध्ये जनसंपर्क आहे. रावेरमधील २०१९ च्या निवडणुकीत त्यांचे वडील हरिभाऊ जावळे यांना काँग्रेसचे उमेदवार शिरीष चौधरी यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला होता. काँग्रेसचे आमदार शिरीष चौधरी यांनी या वेळी स्वतःसाठी उमेदवारी न मागता पुत्र धनंजय चौधरी यांना पुढे आणले आहे. काँग्रेसनेही धनंजय यांना रावेरची उमेदवारी जाहीर केल्याने चौधरी परिवाराची चौथी पिढी यंदा रावेरच्या राजकारणात सक्रिय झाली आहे; परंतु धनंजय यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेसचे जुने निष्ठावंत पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेसचे रावेर येथील माजी नगराध्यक्ष दारा मोहंमद यांनी चौधरी परिवारावर घराणेशाहीचा आरोप केला असून, अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे चौधरी परिवारापुढे दारा यांना थोपविण्याचे आव्हान आहे. प्रहार जनशक्ती पक्षातर्फे अनिल चौधरी रिंगणात आहेत. चौधरी यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढवली होती. चुरशीच्या लढतीत त्यांना सुमारे ४४ हजार ८४१ मते मिळाली होती. वंचित बहुजन आघाडीकडून शमिभा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शमिभा या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार आहेत. मधुकरराव चौधरी यांच्या पश्चात पाल येथील सातपुडा विकास मंडळासह खिरोदा, फैजपूर येथील शैक्षणिक संस्था आणि रावेर तालुक्याच्या राजकारणाची धुरा शिरीष चौधरी यांनी खांद्यावर घेतली. शिरीष हे २००९ मध्ये रावेर मतदारसंघातून पहिल्यांदा निवडून गेले. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार हरिभाऊ जावळे यांचा पराभव करून रावेर तालुक्यावरील चौधरी परिवाराचे वर्चस्व सिद्ध केले होते. तसे बघता, गेल्या वर्षीच एनएसयुआयच्या प्रदेश सरचिटणीसपदी निवड झाल्यानंतर धनंजय हे रावेरच्या राजकारणात सक्रिय झाले होते. काही महिन्यांपूर्वी दिवंगत मधुकरराव चौधरी यांच्या कृतज्ञता सोहळ्याच्या निमित्ताने आमदार शिरीष यांनी काँग्रेसमध्ये धनंजय यांना पुढे आणले होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात आणि सतेज पाटील हेही त्या वेळी उपस्थित होते.



**जिल्हा वार्तापत्र**

चौधरी परिवाराच्या चौथ्या पिढीची राजकारणातील सुरुवात कशी होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर हा विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो; मात्र मागच्या पंचवार्षिकमध्ये या ठिकाणी काँग्रेसने बाजी मारली होती. काँग्रेसचे विद्यमान आमदार शिरीष या ठिकाणी विजयी झाले होते. नवयुवक आणि प्रथमच विधानसभा निवडणूक लढणार आहेत. धनंजय यांना रावेर विधानसभेत यश मिळते का ते बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. माजी खासदार भाजपचे निष्ठावंत स्व हरिभाऊ जावळे यांच्या मुलाच्या हातात भाजपने उमेदवारी दिली आहे. अमोल हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांना लोकसभेसाठी उमेदवारी हवी होती; मात्र पक्षाने त्यांना थांबवून विधानसभेसाठी आता उमेदवारी दिली आहे. हरिभाऊंचा मतदारसंघावर मोठा प्रभाव आहे. त्यांच्या स्वर्गवासानंतर मुलाने ही जबाबदारी सांभाळली आहे. रावेर मतदारसंघात पाटील समाजाचे सर्वाधिक वर्चस्व आहे. त्यानंतर आदिवासी आणि मुस्लिम समाज या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आहे. चौरंगी लढतीमध्ये चौधरी जागा टिकवतात की जावळे पराभवाचा वचपा काढतात, हे पाहायचे.

■■■

# भाजपाची रंगीबेरंगी खेळी

विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपा हर तऱ्हेने प्रयत्न करताना दिसतो आहे. पक्षाने यावेळी 'कलरकोड प्लॅन'ची वेगळी रणनीती आखली आहे. त्यानुसार भाजपने जिंकण्याची सर्वाधिक शक्यता, मध्यम शक्यता आणि अतिशय कमी शक्यता याआधारे मतदारसंघांना अनुक्रमे पिवळे, हिरवे आणि लाल असे रंग निश्चित केले आहेत. पिवळे मतदारसंघ हिरवे कसे होतील तसेच लाल मतदारसंघ पिवळ्या रंगात परावर्तीत होतील, याकडे लक्ष दिले जात आहे.




प्रत्येक मतदारसंघात नेमकी कशी परिस्थिती आहे, तिथल्या नागरी समस्या काय आहेत, त्यावर काय तोडगा काढायला हवा याचा आढावा भाजपच्या स्थानिक नेत्यांना या प्रणाली अंतर्गत सादर केला जात आहे. ज्या मतदारसंघात स्थिती वाईट आहे, तिथे सुधारणा करण्यासाठी आवश्यक पावले टाकण्यावर भर दिला जात आहे. या मतदारसंघातील रंगबदलाकडे दररोज लक्ष दिले जात असून पिवळे मतदारसंघ हिरवे आणि लाल मतदारसंघ पिवळे करण्यासाठी काम केले जात आहे. या माहितीला खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच दुजोरा दिला आहे. एकूणच भाजपामध्ये आता रंगारंग कार्यक्रम चालू झाला आहे हे नक्की. आता त्याला कसे यश मिळते याची सगळ्यांनाच उत्सुकता आहे.

■■■

नंदुरबारमधल्या गावित कुटुंबाचे नाव मोठे आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघ आहेत. या प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या परिवाराचा एक सदस्य उमेदवारी करीत असून, सर्वजण प्रमुख शर्यतीत आहेत असे म्हणायला हरकत नाही. एकाच परिवारतलेभाऊ भाऊ आणि मुलगी या निवडणुकीत उभे असल्याचे आश्चर्य पाहायला मिळते आहे. मंत्री

# निवडणुकीच्या रिंगणात एकाच घरातले चार उमेदवार




डॉ. विजयकुमार गावित भाजपकडून, त्यांचे एक बंधू भरत गावित काँग्रेसकडून तर दुसरे बंधु शरद गावित अपक्ष उमेदवार म्हणून उभे आहेत. त्यातच डॉक्टर हीना गावित यांनीदेखील महायुतीबरोबर बंडखोरी करून अपक्ष उमेदवार म्हणून उभ्या आहेत. कुणीही हरले तरी पद घरातच राहणार हे नक्की असल्यामुळे या घरगुती लढतींची राज्यभरात चर्चा रंगत आहे.

■■■

# खरी लढत आदित्य आणि राज ठाकरे यांच्यातच

एकीकडे उंच इमारती आणि दुसऱ्या बाजूला चाली आणि मध्यमवर्गीयांच्या चाळी. हा मतदारसंघ नेहमीच सर्वच राजकीय पक्षांसाठी महत्वाचा राहिला आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत तर युवराज आदित्य ठाकरे यांच्यासाठी या मतदारसंघाची निवड झाली होती. तेव्हा शिवसेना एकाच होती. त्यांनी सारे बळ आदित्यच्या पाठीशी उभे केले होते. पुतण्याला विरोध करायचा नाही या प्रामाणिक भावनेने तेव्हा राज ठाकरेंच्या 'मनसे'नेही तिथे आदित्यच्या विरोधात उनेदवार दिला नव्हता. पण या वेळी सगळी गणिते बदलली आहेत. राज ठाकरेंनी नात्यांचे बांध तोडून आदित्याच्या विरोधात उमेदवार उभा केला आहे. मनसेचे संदीप देशपांडे आदित्याच्या विरोधात दंड थोपटून उभे आहेत. त्यातच कोंग्रेसच्या मुरली देवरांचे पुत्र मिलिंद देवराही आपले नशीब अजमावणार आहेत.



■■■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी सामान्य माणसाची जीवनशैली उंचावत आहेत- पंकजा मुंडे

## भाजप-महायुतीचे उमेदवार तान्हाजी मुटकुळे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ नोव्हेंबर**

ग्रामीण भागात महिलांची कुचंबणा थांबविण्यासाठी शौचालये बांधून देण्याचा संकल्प केला. महिलांना धुरा-पासून मुक्ताता मिळावी यासाठी गॅस सिलेंडर दिले. आज गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील हजारो महिला लखपती दिदी बनल्या आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य माणसाची जीवनशैली उंचावण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केले.

सेनगाव येथे शुक्रवार दि ८ नोवहेंबर रोजी भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलतांना पंकजा मुंडे म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य सरकार समान विचाराचे असेल तर योजनांची अंमलबजावीण प्रभावीपणे होते. केंद्रात एनडीए आघाडीचे सरकार आणि राज्यात महायुतीचे सरकार असल्यामुळे प्रत्येक घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या असून त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे. राज्यातही महायुतीचे सरकार मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनासारख्या कल्याणकारी योजना राबवत आहे. या योजनांचा लाभ लाभार्थी घेत आहे. म्हणूनच भाजप महायुती ही सर्वसामान्यांचा विकास करणारी आणि समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेवून चालणारी आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात मेट्रो ट्रेन, वंदे भारत ट्रेन, मेट्रो सिटी, नॅशनल हायवे, इन्फ्रास्ट्रक्चर, विकास झपाट्याने होत आहे. ग्रामीण भागापर्यंत रस्त्यांचे जाळे विणले जात आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना दळण-वळणाची साधने उपलब्ध होत आहेत. डीजीटल पध्द-तीने व्यवहार ग्रामीण भागातील शेतकरी, महिला करीत असतांना दिसत आहे. हा बदल केवळ पंतप्रधान मोदी यांच्या दृढसंकल्पामुळे झाला आहे. जगात भारताला स्थान मिळाले आहे. राज्यातही आपल्याला महायुतीचे सरकार आणण्यासाठी भाजप- महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे लागणार आहे. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यावर स्व गोपीनाथराव मुंडे यांची कृपादृष्टी होती. आणि माझीही आहे. त्यामुळेच मी आज याठिकाणी त्यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेण्यासाठी आले आहे. तान्हाजी मुटकुळे यांच्या माध्यमातून हिंगोली विधानसभा मतदारसंघात मोठमोठी विकास कामे झाली आहेत. आम्हीही मंत्री असतांना त्यांना कधीही निधी कमी पडू दिला नाही. यापुढेही तान्हाजीराव मुटकुळे यांना हिंगोली विधानसभेतील जनता भरभरून मतदान करून पुन्हा एकदा विधानसभेवर पाठवणार यात मुळीच शंका नाही असा विश्वास यावेळी माजी मंत्री आ. पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर आ. महंत बाबुसिंह महाराज, भाजप महायुतीचे उमेदवार तान्हाजी मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, भाऊराव देशमुख, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर,रिपाईचे जिल्हाध्यक्ष दिवाकर माने, डॉ विठ्ठल रोडगे, मिलींद यंबल, हिंमत राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# हिंगोली जिल्हा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पूर्वपीठीकेचे विमोचन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ नोव्हेंबर**



भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने हिंग-ोली जिल्हा प्रशासन हे विधानसभेची निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तयारीला लागलेले असून, त्याच अनुषंगाने प्रसार माध्यम कक्षामार्फत जिल्ह्या-तील तीन मतदारसंघांची सन १९८५ ते २०१९ पर्यंतची पूर्वपीठिका- माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेचे विमोचन जिल्हा नियोजन समिती सभागृहात निवडणूक निरीक्षक श्रीमती वंदना राव यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी ९२- वसमतचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने, ९३- कळमनुरीच्या निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रतिक्षा भुते, ९४- हिंगोलीचे निवडणूक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी तथा ईव्हीएमच्या नोडल अधिकारी मंजुषा मुथा, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी प्रभाकर बारहाते, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी उपस्थित होते.

यावेळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ पूर्वपीठिका-माहिती पुस्तिकेचे कौतुक करत ही पुस्तिका सर्व प्रसार माध्यमे, अभ्यासकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरणार असल्याचे सूतोवाच म ान्यवरांनी केले. पूर्वपीठिकेमध्ये निवडणूक आदर्श आचारसंहिता, पेड न्यूज, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, विधानसभा मतदारसंघ निवडणूक कार्यक्रम, सर्व विधानसभा मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे संपर्क क्रमांक, तसेच मतदारांची संख्या, म तदान केंद्रांची संख्या आणि सन १९८५ ते सन २०१९ पर्यंत हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा म तदार संघात पार पडलेल्या निवडणुकांची सविस्तर माहिती संकलीत करण्यात आलेली आहे.

या पूर्वपीठिकेसाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्या श्रीमती आशा बंडगर, कैलास लांडगे, प्राचार्य सुरेश कोल्हे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी मार-ोतराव पोले आदी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# ब्रम्हवाडी, हत्ता परिसरात मुटकुळेंच्या प्रचार सभांना लोकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ नोव्हेंबर**



हिंगोली मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि ७ नोव्हेबर रोजी मतदारसंघातील ब्रम्हवाडी, हत्ता या गावांना भेट देत तेथील लोकांशी सुसंवाद साधला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी मतदारसंघात जोरदार प्रचाराला सुरूवात केली असून त्यांच्या प्रचार सभांना मोठी गर्दी होत आहे. मागील दहा वर्षाच्या काळात केलेल्या विविध विकास कामांमुळे आणि केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांमुळे मतदारसंघात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे.

दि ७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ब्रम्हवाडी आणि हत्ता या गावांसह इतर गावांना भेटी देत तेथील नागरिकांशी संवाद साधला. ब्रम्हवाडी आणि हत्ता याठिकाणी झालेल्या प्रचारसभांमधून त्यांनी नागरिकांना केलेल्या विकास कामांची माहीती देत उर्वरित विकास कामे पूर्ण करण्यासाठी निवडून देण्याचे आवाहन कले. यावेळी माजी आ. रामराव वडकुते, नारायण खेडेकर, के के शिंद, हिंमत राठोड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- अग्रवाल महिला मंडळ व बहू मंडळाच्यावतीने दिपावली निमित्त मनोमिलनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांनी दीपोत्सव साजरा करीत एकमेकींना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अध्यक्षा अंजू देवडा, सचिव नीतू देवडा यांच्यासह बहू मंडळाच्या अध्यक्षा रोली, सचिव सोनाली अग्रवाल, वंदना कागलीवाल, चित्रा भारूका आदींची प्रमुख उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### उमेदवारांना आचारसंहिता पालनाच्या सूचना

हिंगोली- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततेत, भयमुक्त व निपक्षपणे पार पाडण्यासाठी ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघातील उमेदवारांना निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना ९४- हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी आज येथे आयोजित आढावा बैठकीत दिल्या. या बैठकीत ईव्हीएम मशिन्स व्दितीय सरमिसळ, होम वोटींग, मतदान केंद्रावरील सोयी सुविधा, टपाली मतदान, ईव्हीएम कमिशनींग, आदर्श आचार संहिता व इतर निवडणूक अनुषंगीक महत्वाच्या प्रक्रियेबाबत सूचना व निवडणूक प्रकिया अंतर्गत होणारे कामकाजाची आवश्यक माहिती श्री. घुटुकडे यांनी दिली. या बैठकीस विविध राजकीय पक्षांचे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून परवानगी घेऊनच पाठवा बल्क व व्हाईस एसएमएस

हिंगोली- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. आचारसंहिता कालावधीत उमेदवारांकडून मतदारांना मतदान करण्याबाबत विना परवानगी बल्क एसएमएस देण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या उमेदवारांना प्रचारासाठी बल्क एसएम एस किंवा व्हाईस एसएमएस पाठवायचे आहेत, त्यांनी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची परवानगी घेऊनच एसएमएस पाठविण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अभिनव गोयल यांनी केले आहे. निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे बल्क एसएमएस, ई-पेपर, व्हीडीओ, ऑडीओ, रेडीओ चॅनेलवरील कोणत्याही जाहिरातीला परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी शिवाय इलेक्ट्रॉनिक्स फॉरमॅटवरील कोणतीही जाहिरात दिल्यास कारवाई केली जाईल.

### नगर परिषदेत स्वच्छता मोहीम



हिंगोली- येथील नगर परिषद परिसरातील कचरा तसेच अस्ताव्यस्त वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संपूर्ण परिसर स्वच्छ केला. यावेळी शाम माळवटकर, बाळू बांगर, देवीसिंह ठाकूर, संदीप घुगे, नाईक यांच्यासह कर्मचारी, सफाई कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता.

### प्रचार कार्यात सहभागी ग्रामसेवकाचे निलंबन

हिंगोली- कळमनुरी विधानसभा मतदारसंघात राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यासोबत प्रचार करतांना ग्रामसेवकाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर निवडणुक विभागाने याची दखल घेत निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते यांनी तातडीने कळमनुरीच्या गटविकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवले. सदर कर्मचारी आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त असून त्यांच्याविरूध्द कार्यवाही करावी तसेच त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानंतर कळमनुरीचे गटविकास अधिकारी गणेश बोथीकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे याबाबतची माहीती सादर केली. त्यानंतर ग्रामसेवक शिवशंकर गुठ्ठे यास तडकाफडकी निलंबीत करण्यात आले असून त्याच्या निलंबनाचे आदेश दि ७ नोव्हेंबर रोजी उशिरा गटविकास अधिकारी बोथीकर यांनी काढले आहेत.



**हिंगोली- सेनगाव येथील जाहीर सभेत भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांच सत्कार करण्यात आला. यावेळी अप्पासाहेब देशमुख यांच्यासह कार्यकर्ते. छाया- विजय गुंडेकर**

# अपक्ष उमेदवार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या सभांना प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ नोव्हेंबर**



हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू केला असून त्यांच्या प्रचार सभेला जनतेकडून प्रतिसाद मिळत आहे.

भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी विधानसभा मतदारसंघातील केसापूर, खुडज, गोंडाळा, खिल्लार, लिंगदरी, नर्सी नामदेव आदी गांवाना भेटी देत असून त्यांच्या प्रचारसभांना प्रतिसाद मिळत आहे. यावेळी एका गावाला भेट दिली असता त्यांचेकडे गावकऱ्यांनी तेथील अवैध दारूविक्री बंद करण्याची मागणी केली. तसेच यावेळी बोलतांना त्यांनी गावकऱ्यांना गावातील दारू बंद करण्याचे आश्वासन दिले तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांना सत्ताधारी लोकांचे पाठबळ असल्याचा आरोप केला.

त्यानंतर निराधार महिला व पुरूषांनी त्यांचेकडे गाऱ्हाणे मांडले. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की माझ्या काळात हिंगोली आणि सेनगाव या दोन तालुक्यातून तब्बल ३२ हजार निराधारांना अनुदान मिळत होते परंतु आता त्यांचे बेहाल होत आहे. मी निवडून आल्यानंतर निराधारांचा प्रश्न सोडविणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मतदान यंत्रांचे द्वितीय सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ नोव्हेंबर**



विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १ हजार १५ मतदान केंद्र आणि ८ सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी आवश्यक मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळीकरण प्रक्रिया आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहामध्ये निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती वंदना राव यांच्या उप-स्थितीत पार पडली. यामध्ये मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांचे क्रमांक निश्चित झाले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल, वसमत विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, कळमनुरी विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, हिंगोली विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, ईव्हीएम मशीनच्या नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मंजुषा मुथा, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी बारी सिध्दीकी यांच्यासह जिल्ह्यातील तिनही विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार, तसेच उम ेदवारांचे आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या दिशानिर्देशान-ुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी मतदान केंद्रांच्या २० ते ३० टक्के अतिरिक्त बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट मशीन देण्यात आल्या आहेत. तसेच ९३-कळमनुरी आणि ९४-हिंगोली मतदारसंघात उमेदवारांची संख्या जास्त असल्याने प्रत्येक मतदान केंद्रांवर २ बॅलेट युनिट लावण्यात येणार असल्याने त्या प्रमाणात बॅलेट युनिटचे वितरण करण्यात आले आहे.

९२-वसमत विधानसभा मतदारसंघातील ३२७ म तदान केंद्र आणि १ सहाय्यकारी मतदान केंद्रांसाठी ४८८ बॅलेट युनिट, ३९५ कंट्रोल युनिट आणि ४२९ व्हीव्हीपॅट मशीन, ९३-कळमनुरी विधानसभा म तदारसंघातील ३४५ मतदान केंद्र आणि ७ सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी ८८४ बॅलेट युनिट, ४२८ कंट्रोल युनिट आणि ४६२ व्हीव्हीपॅट मशीन आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातील ३४३ मतदान केंद्रांसाठी ८८१ बॅलेट युनिट, ४१५ कंट्रोल युनिट आणि ४४९ व्हीव्हीपॅट मशीन वितरीत करण्यात आल्या आहेत. मतदान यंत्रांच्या दुसऱ्या सरमिसळीकरणानंतर कोणत्या क्रमांकाचे बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट मशीन कोणत्या मतदान केंद्रावर जाणार आहे, ही निश्चित झाले आहे.

या सरमिसळीकरण प्रक्रियेबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी अभिनव गोयल म्हणाले, ही सरमि सळीकरणाची प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या निरीक्षणाखाली सॉफ्टवेअरद्वारे राबविण्यात येत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत आहे. या मशीन तयार करण्याचे काम संबंधित विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या देखरेखीखाली व आपल्या उप-स्थितीत दि. १३ व १४ नोव्हेंबर रोजी तयार करून त्याचे सिलींग करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची चलतचित्रण (व्हिडिओ शुटींग) करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी गृहभेटीद्वारे मतदान (होम वोटींग) दि. ९ व १० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार असून याचा रुट प्लॅन संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तयार केला असून ते उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींना देतील. तसेच कर्मचाऱ्यांचेही सरमिसळीकरण होणार असल्यामुळे कोणता कर्मचारी कोणत्या मतदान केंद्रावर जाणार याची संबंधित कर्मचाऱ्याला शेवटपर्यंत माहिती नसते. निवडणुकीसाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण ११ व १२ नोव्हेंबरला घेण्यात येणार आहे. यावेळी त्यांचे टपाली मतदान घेण्यात येणार असल्याचे सांगून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार असल्याची माहिती यावेळी सर्व उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यांना दिली. तसेच त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे समाधान केले.

## इति-उवाच...



अजित पवारांच्या जाहीरनाम्यात कदाचित प्रिंटिंग मिस्टेक झाली आहे. त्यात आम्ही तुम्हाला चंद्र आणून देऊ, ही ओळ छापायची राहून गेली. महाराष्ट्र राज्यावर तब्बल साडेआठ लाख कोटींचे कर्ज असताना, अशा प्रकारे सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. हे त्यांनी कशासाठी केले, असा प्रश्न निर्माण होतो.

**डॉ. अमोल कोल्हे**, राकाँशप खासदार



पुरुष गरोदर राहणे व बाहेर आलेली टूथपेस्ट पुन्हा ट्यूबमध्ये घालणे, या दोन गोष्टी सोडल्या, तर या जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. महाराष्ट्र समृद्ध व प्रगत करणे शक्य आहे. पण, सध्याचे राजकारणी या प्रगतीच्या मार्गातील अडथळा ठरत आहेत. **राज ठाकरे**, मनसेप्रमुख



अजित पवार मर्द माणूस आहे. ते जो शब्द देतात, तो पाळतात. आमच्या कठीण काळात ते पाठीशी उभे राहिले आणि आम्हाला उमेदवारी दिली. कोणीही माझ्याविरोधात असले तरी जनता माझ्यासोबत आहे.

**नवाब मलिक**, राकाँ नेते



संजय राऊत, तुमच्यात इमानदारपणा आहे का शोधा आणि कुत्र्याएवढा जरी इमानदारपणा असता, तर महाराष्ट्राने तुमचे कौतुक केले असते. तरीही मला त्याच्यावर जास्त काही बोलायचे नाही. कारण, डुकराला कितीही साबण, शाम्पू लावला, तरी डुक्कर गटारीतच जाते.

**सदाभाऊ खोत**, रयत क्रांती संघटन



महिला कधीच कुणाचे उधार ठेवत नाही, पैसे बुडून देशातून पळून गेलेले सर्व पुरुष आहेत. महिलांच्या हातात देशाचे अर्थकारण असेल आणि प्रोत्साहन दिले तर, त्यांच्याकडे आलेले पैसे पुन्हा अर्थव्यवस्थेतच जाणार आहेत आणि हे प्रगतीचे लक्षण आहे.

**पंकजा मुंडे**, आमदार

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रात

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**


पंतप्रधान नरेंद्र मोदींचा महाराष्ट्र दौरा निश्चित झाला असून, विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारासाठी नरेंद्र मोदी शुक्रवारी महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात ८ तारखेला महायुतीची पहिली मोठी सभा होणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभांचा नारळ फुटणार आहे.

नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात उत्तर महाराष्ट्रात दोन सभा होणार आहेत. त्यापैकी नाशिकला एक आणि धुळ्याला एक सभा होईल. नाशिकच्या ग्राऊंडला नरेंद्र मोदी ग्राऊंड असे नाव दिले आहे. येथे भव्य सभा होणार आहे. भाजपाने केंद्रीय मंत्र्यांनाही महाराष्ट्राच्या प्रचार यंत्रणेत उतरवले आहे. त्यामुळे भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या यादीत असलेल्या केंद्रातील नेत्यांच्या सभा होणार आहेत.

नरेंद्र मोदी महाराष्ट्रात जास्तीत जास्त वेळ देणार आहेत. याशिवाय, ते धुळे आणि नंदुरबारलाही जाणार आहेत. अहमदनगरसह ५ जिल्ह्यांत मोदींच्या सभांचे नियोजन आहे. (वृत्तसंस्था)

### चार दिवसांत नऊ सभा होणार

नियोजित कार्यक्रमानुसारण ८ नोव्हेंबरला धुळे, नाशिक, ९ नोव्हेंबरला अकोला, चिमूर, १३ नोव्हेंबरला सोलापूर, कोल्हापूर आणि १४ नोव्हेंबरला संभाजीनगर, नवी मुंबई व मुंबई या ठिकाणी मोदींच्या सभा होणार आहेत.



# अमित ठाकरेंना काकांकडून छुपी मदत?

### उद्धव ठाकरेंची माहीममध्ये सभा नाही

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

माहीम विधानसभा निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. बारामतीनंतर माहीम विधानसभेची निवडणूक सर्वांत महत्त्वाच्या लढतींमध्ये आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे पहिल्यांदाच येथून निवडणूक लढवत असून, त्यांच्यासमोर ठाकरे गटाचे महेश सावंत आणि शिवसेनेचे सदा सरवणकर यांचे आव्हान आहे. अमित ठाकरे यांना ही निवडणूक सोपी होण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. अशातच अमित ठाकरे यांना काका आणि चुलत भावाची छुपी मदत मिळते का, अशी चर्चा सुरू आहे. याचे कारण माहीममध्ये तूर्तास उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांची एकही सभा होणार नसल्याचे समोर आले आहे.



ठाकरे गटाचा सभांच्या वेळापत्रकात १८ नोव्हेंबरपर्यंत दादर माहीमचा उल्लेख नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत वरळीत आदित्य ठाकरेंविरोधात मनसेने उमेदवार न देऊन अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिला होता. त्यामुळे माहीममध्येही असेच काहीसे चित्र पाहायला मिळेल, अशी शक्यता होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी अमित ठाकरेंच्या विरोधात महेश सावंत यांना उमेदवारी दिली. पण, १८ नोव्हेंबरपर्यंत दादर माहीम मतदारसंघात उद्धव किंवा आदित्य ठाकरे यांची एकही सभा होणार नाही. ठाकरे गटाच्या सभांच्या वेळापत्रकातून ही माहिती पुढे आली आहे. त्यामुळेच उद्धव आणि आदित्य हे अमित ठाकरेंना पाठिंबा देत आहेत का, असा प्रश्न विचारला जात आहे. मात्र, माहीम हा आमचाच मतदार संघ असून, तिथे सहभाग घेण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्टीकरण उद्धव ठाकरे यांनी दिले. (वृत्तसंस्था)

# अपघाताने मुख्यमंत्री झाले होते बाबासाहेब भोसले

**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, ८ नोव्हेंबर**

बाबासाहेब भोसले यांनी काही काळासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवले होते. भोसले काँग्रेसचे नेते असले तरी, काँग्रेसच्या नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड केल्यानंतर सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.



डॉ. मनमोहनसिंग यांच्यावरील 'ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' हे पुस्तक खूप गाजले. तसेच बाबासाहेब भोसले यांचे वर्णन त्यावेळी 'ॲक्सिडेंटल चीफ मिनिस्टर' असे केले जात होते.

सिमेंट घोटाळ्यात सापडल्यानंतर बॅ. अब्दुल रहमान अंतुले यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर अचानक मुख्यमंत्री म्हणून बाबासाहेब भोसले यांची झालेली निवड सगळ्यांसाठीच धक्कादायक होती. गंमत म्हणजे, बाबासाहेब भोसले यांच्यासाठी हा आश्चर्याचा धक्का होता. आपण कधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनू, याची स्वप्नातही त्यांनी कल्पना केली नव्हती. पण, 'आले इंदिरा गांधींच्या मना तेथे कोणाचे चालेना' असे भोसलेंच्या बाबतीत घडले.



बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री कसे झाले, याबाबतचा एक किस्सा तेव्हाच्या राजकीय वर्तुळात चर्चिला जात होता. यात कितपत तथ्य आहे, हे माहिती नाही, पण तो किस्सा तेव्हा खूप गाजला होता. अंतुले यांच्यानंतर महाराष्ट्राला मराठा मुख्यमंत्री द्यावा, अशी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची इच्छा होती आणि त्यांना साताऱ्याचे अभयसिंह राजे भोसले यांना मुख्यमंत्री करायचे होते, असे म्हणतात. पण, भोसले नावावरून काही तरी घोटाळा झाला आणि मुख्यमंत्रिपदाची माळ बाबासाहेब भोसले यांच्या गळ्यात पडली.

२१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३ असे जवळपास वर्षभर भोसले मुख्यमंत्री होते. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी काही चांगले निर्णय घेतले होते. नागपूरचे डॉ. श्रीकांत जिचकार भोसले यांच्याच मंत्रिमंडळात होते.

मुख्यमंत्री म्हणून निवड झालेले नेते आधी दिल्लीत काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेत, त्यानंतर आपल्या राज्यात जाऊन मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत. बाबासाहेब भोसले हे काँग्रेसचे असे बहुधा पहिले मुख्यमंत्री होते, ज्यांनी आधी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि नंतर दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतली होती. भोसलेंना जशी इंदिरा गांधींना भेटायची इच्छा होती, तशीच आपण कोणाची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून निवड केली, याची मोठी उत्सुकता तेव्हा इंदिरा गांधींना लागली होती, असे म्हणतात.

भोसले तसे मनमोकळ्या मनाचे आणि हजरजबाबी होते. आधी मुख्यमंत्री झाला, मग तुम्ही काँग्रेसच्या नेतृत्वाची भेट घेतली, याबाबत प्रश्न विचारले असता, आपल्या नेहमीच्या शैलीत भोसले म्हणाले की, संधी मिळाली तर वेळेत शपथ घेतलेली बरी. ही काँग्रेस आहे, शपथ घेतल्यानंतर रजिस्टरवर स्वाक्षरी करण्याच्या वेळेतही कोणी तुमची खूर्ची हिसकवून घेऊ शकतो, हे त्यांचे उत्तर त्यावेळी खूप गाजले होते.

मुख्यमंत्री झाल्यानंतर पक्षांतर्गत गटबाजीवर त्यांना नियंत्रण मिळवता आले नाही, त्यामुळे काँग्रेस नेतृत्वाने त्यांची मुख्यमंत्रिपदावरुन उचलबांगडी केली आणि वसंतदादा पाटील यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली. ही बातमी कळताच भोसले यांची प्रतिक्रिया लक्षवेधक होती. माझे मुख्यमंत्रिपद काढून घेतले असले, तरी आता माजी मुख्यमंत्री हे पद नेहमीसाठी माझ्या नावामागे लागणार आहे, ते कोणी घेऊ शकत नाही, ही त्यांची प्रतिक्रियाही खूप गाजली होती. बाबासाहेब भोसले यांनी नंतर बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री राहिल्यानंतर शिवसेनेत प्रवेश करणारे ते काँग्रेसचे पहिले मुख्यमंत्री असावे.

# पाय जायबंदी असलेल्या लाडक्या 'बाळा'च्या भेटीला राज ठाकरे



◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

मनसे नेता बाळा नांदगावकर गेल्या काही दिवसांपासून शिवडीत जोरदार प्रचार करीत आहेत. याचदरम्यान त्यांच्या पायाला दुखापत झाली. याविषयी कळताच मनसेप्रमुख राज ठाकरेंनी त्यांच्या घरी जाऊन विचारपूस केली.

राज ठाकरेंच्या भेटीनंतर बाळा नांदगावकर पुन्हा प्रचारासाठी उतरले. सुरुवातीला वॉकरच्या सहाय्याने आणि नंतर व्हीलचेअरवरून प्रचार करीत आहेत. विधानसभेसाठी शिवडी मतदारसंघातून मनसेकडून बाळा नांदगावकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवडी मतदारसंघात मनसेचे बाळा नांदगावकर आणि महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे अजय चौधरी यांच्यात थेट लढत होणार आहे. बाळा नांदगावकरांना भाजपाने जाहीर पाठिंबा दिला आहे.

त्यामुळे बाळा नांदगावकर आणि अजय चौधरींची लढत रंगतदार होणार आहे. शिवडीत प्रचारादरम्यान पायऱ्यांवरून घसरल्याने नांदगावकर यांना दुखापत झाली होती. आता राज ठाकरेंच्या भेटीने आपल्याला नवसंजीवनी मिळाल्याचे ते सांगतात. (वृत्तसंस्था)

# अजित पवारांच्या होणार ६० सभा

◆ **पुणे, ८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांनी राज्यभरात प्रचारसभांचा मोठा धडाका लावला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवारांच्या शुक्रवारपासून राज्यभरात सभांचा धडाका सुरू होणार आहे. महाराष्ट्रात अजित पवारांच्या जवळपास ६० सभा होणार असल्याची माहिती आहे.



अजित पवारांच्या दररोज पाच सभा होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दोन-तीन सभांना अजित पवार उपस्थित असणार आहेत. ज्या ठिकाणी मोदींची सभा असेल, तिथे राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा नेता व्यासपीठावर असणार आहे. पंतप्रधान मोदींच्या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा होणार आहेत. अजित पवार यांच्या पक्षाने राज्यातील ५० मतदारसंघासाठी वेगवेगळे ५० जाहिरनामे प्रसिद्ध केले आहेत. अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच राज्याच्या निवडणुकीत घडत आहे. (वृत्तसंस्था)

# घरात बसून कारभाराची सवय गेली नाही : बावनकुळे

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर विविध राजकीय पक्ष आपापले जाहीरनामे, आपल्या पक्ष कार्यालयात किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये प्रसिद्ध करीत आहेत. मात्र, उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी आपल्या घरी जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावर घरात बसून कारभार करायची सवय अजून गेली नाही, अशा शब्दांत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी ठाकरेंना खोचक टोला लगावला.

प्रचारासाठी अवघा एक आठवडा राहिला असल्यामुळे सर्व राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. दिल्लीतील अनेक नेते राज्यात प्रचारासाठी तंबू ठोकून बसले आहेत. तसेच जाहीरनामे देखील प्रसिद्ध केले जात आहेत. यावेळी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. मातोश्री या ठाकरेंच्या खाजगी निवासस्थानावरून उद्धव ठाकरे यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यावरून चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

बावनकुळे म्हणाले की, अडीच वर्षे घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीत बसून जाहीरनामा प्रकाशित केला. अडीच वर्षे फक्त 'माझं कुटुंब माझी जबाबदारी' म्हणत स्वतःच्या कुटुंबापुरते राजकारण केले. आताही घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी प्रत्येक जाहीरनामा शिवसेना भवनात प्रकाशित केला. कारण, त्यांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचे हित होते. पण सच्चा शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यासमोर फक्त आणि फक्त कुटुंबच आहे. नेता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो, असा टोला त्यांनी लगावला. (तभा वृत्तसेवा)

### काय आहे जाहीरनाम्यात

छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर प्रत्येक जिल्ह्यात बांधू, मुंबई व महाराष्ट्राचे गृहनिर्माण धोरण ठरवणार, इतर शहरांतील झोपडपट्ट्यांचा विकास, महाविकास आघाडी सरकारच्या काळात धारावी पुनर्विकास प्रकल्प रद्द केला जाईल, कोळीवाडाची ओळख पुसू देणार नाही, राज्यातील बेरोजगारी दूर करू, भूमिपुत्रांना नोकरी, मुलांना मोफत शिक्षण, जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू, आदी आश्वासने उद्धव ठाकरेंनी दिली.

# संविधानाचा अपमान करणाऱ्या काँग्रेसला जनता माफ करणार नाही

## संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांचा विश्वास

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

संविधानाची अनेकदा मोडतोड करणाऱ्या आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायम अवमान करणाऱ्या काँग्रेसला जनता माफ करणार नाही, असे सांगत आतापर्यंत केलेल्या संविधानाच्या अवमानाबद्दल आधी काँग्रेसने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी गुरुवारी केली.



भाजपा मिडिया सेंटरमध्ये झालेल्या पत्रपरिषदेत रिजिजू बोलत होते. देशाची अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र आणि आर्थिक राजधानी मुंबईचे योगदान महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले.

मागास वर्गातून आलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीवर पंतप्रधानांनी आतापर्यंत मोठी जबाबदारी सोपवल्याने मी जबाबदारीने सांगू शकतो की, जी व्यक्ती संविधानाचा सन्मान करीत नाही, त्याच्या हातात संविधानाची प्रत आणि तोंडून संविधान शब्द निघणे निषेधार्ह आहे. निळ्या रंगाऐवजी लाल रंगाचे मुखपृष्ठ घालून आत कोरे कागद असलेल्या नकली संविधानाची प्रत राहुल गांधी यांनी नागपुरात नाचवली. त्यांच्या या कृत्याने डॉ. आंबडेकरांच्या आत्म्याला वेदना झाल्या असतील, असे रिजिजू म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात घेतले जाऊ नये, यासाठी जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचे नाव यादीतून वगळले होते. महात्मा गांधी आणि इतर काहींनी हे पहिले सरकार निवडणुकीद्वारे होत नसल्याचे त्यांच्या लक्षात आणून दिले, तेव्हा कुठे त्यांना देशाचे पहिले कायदा मंत्रिपद देण्यात आले. तेव्हापासून नेहरू यांनी डॉ. आंबेडकर यांचा कायम अपमान केला. अखेरीस डॉ. आंबेडकर यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर डॉ. आंबेडकर यांनी जिथे-जिथे निवडणुका लढवल्या, तिथे काँग्रेसने प्रयत्नपूर्वक त्यांचा पराभव केला. २०१५ पर्यंत काँग्रेसने संविधान दिन का साजरा केला नाही, असा सवालही रिजिजू यांनी उपस्थित केला.

मुस्लिमांचा कायमच वोट बँक म्हणून वापर करीत काँग्रेसने त्यांचे सर्वांत मोठे नुकसानच केले. त्यामुळे मुस्लिम कायम गरीब राहिले आणि फायदा मात्र काँग्रेसचा झाला. त्या पृष्ठभूमीवर भाजपा समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालत आहे आणि त्यांचा विकास साधत आहे. काँग्रेसचा खोटारडेपणा आता उघड झाला असून, अल्पसंख्यकांची मते महायुतीच्या पारड्यात पडतील, असा ठाम विश्वास रिजिजू यांनी व्यक्त केला. (तभा वृत्तसेवा)

### कलम ३७० पुन्हा येणार नाही

जम्मू-काश्मीर विधिमंडळात ३७० लागू करण्याबाबतचा ठराव संमत केल्याच्या घटनेवर रिजीजू म्हणाले, संसदेत ३७० कलम हटवण्यात आले आहे, ते पुन्हा लागू होणार नाही. भारत हा एकसंधच राहील.

# पाणी नाही... मतही नाही!

## अंबरनाथमध्ये मतदार बहिष्काराच्या भूमिकेत

◆ **ठाणे, ८ नोव्हेंबर**

अंबरनाथ शहरातील पाण्याच्या समस्येला त्रासलेल्या मतदारांनी पाणी नाही, तर मत नाही, अशी भूमिका घेतली आहे अंबरनाथ पश्चिम येथील पटेल प्रयोशा योगिनिवास या गृह संकुलातील नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत मतदानावर बहिष्काराचा इशारा दिला. गेल्या आठ वर्षांपासून पाण्याच्या समस्येने येथील लोक त्रासले असून, शासकीय यंत्रणांकडे वारंवार पाठपुरावा करूनही आमचे प्रश्न सुटले नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

अंबरनाथ पश्चिमच्या फुले नगर परिसरात पटेल प्रयोशा योगीनिवास हे गृहसंकुल असून, तिथे १२ इमारतींमध्ये ४७० कुटुंब वास्तव्यास आहेत. सुमारे दीड हजार लोकवस्ती असलेल्या या गृह संकुलात गेल्या आठ वर्षांपासून पाण्याची समस्या आहे. मुबलक पाणी येत नसल्याची तक्रार नागरिक करतात. कधी एक दिवसाआड तर कधी दोन दिवसाआड येथील नागरिकांना पाणी मिळते. त्या पाण्याची वेळही अवघ्या दहा मिनिटांची आहे. त्यामुळे आठ वर्षांपासून पाणी टंचाईचा सामना रहिवाशांना करावा लागत आहे. या समस्येबाबत येथील रहिवाशांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पालिका, स्थानिक आमदार आणि खासदार यांनाही निवेदन दिले, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. मात्र, सर्व सोपस्कार करूनही पाण्याची समस्या सुटू शकली नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय रहिवाशांनी घेतला आहे. पाणी नाही तर मत नाही, अशी भूमिका येथील रहिवाशांनी घेतली आहे. त्यामुळे येथे प्रचारासाठी जाणाऱ्या उमेदवारांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)




# उमेदवार भीमराव धोंडे विसरले स्वत:चेच चिन्ह

◆ **बीड, ८ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील राजकारण नेहमीप्रमाणे उत्सुकतेचे होणार असल्याचे दिसत आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे बंडखोर उमेदवार व माजी आमदार भीमराव धोंडे हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. ते भाषण करीत असताना त्यांना आपले निवडणूक चिन्हच लक्षात आले नाही, त्यामुळे एकच गोंधळ उडाला.

भीमराव धोंडे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. प्रचारसभेत त्यांनी आपले निवडणूक चिन्ह विसरून कार्यकर्त्यांना तुतारी वाजवण्याचे आवाहन केले. व्यासपीठावर उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांना याची जाणीव करून दिल्यावर त्यांनी तातडीने सुधारणा केली. आता आष्टी मतदारसंघात या घटनेचा व्हिडीओ आणि यावरील चर्चा जोरात सुरू आहे. भीमराव धोंडे यांना शिट्टी चिन्ह देण्यात आले असून, त्यांना महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांचे आव्हान आहे तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवार गटाकडून मेहबूब शेख निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे येथे तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. (वृत्तसंस्था)

# बापासाठी लेक उतरली प्रचाराच्या मैदानात

## जामनेरमध्ये गिरीश महाजनांची लेक सक्रिय

◆ **जळगाव, ८ नोव्हेंबर**

जळगावात भाजपाचे मंत्री गिरीश महाजन यांचा जोरदार प्रचार सुरू आहे.



गिरीश महाजन यांच्या प्रचारासाठी त्यांच्या कन्या आणि पत्नी मैदानात उतरल्याचे पाहायला मिळत आहे.

जामनेर मतदारसंघात त्यांच्या प्रचाराची धुरा त्यांच्या पत्नी साधना महाजन आणि कन्या प्रिया यांनी सांभाळली आहे. गिरीश महाजन जामनेर मतदारसंघातून सहा वेळा विजयी झाले आहेत. यावेळी गिरीश महाजन विजयी होऊ शकणार नाहीत, असा दावा महाजनांच्या विरोधात उभे असलेल्या महाविकास आघाडीचे उमेदवार दिलीप खोडपे यांनी केला आहे. त्यामुळे जामनेर मतदारसंघाचा इतिहास पालटणार की कायम राहणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. (वृत्तसंस्था)

### राजकन्याही प्रचारात



दुसरीकडे, साताऱ्यात भाजपाचे उमेदवार छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांची कन्यादेखील प्रचारासाठी पहिल्यांदाच मैदानात उतरली आहे. आपल्या बाबासाठी मृणालीराजे मैदानात उतरली असून, साताऱ्यातील भाजी मंडईतून भल्या सकाळी तिने प्रचाराला सुरुवात केली.